Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख २ माहे आक्टोबर सन १९१६ ई० [ अंक ३९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


### अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने,

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३ ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥:

कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— **मगनलाल के. आणि कंपनी,**
गिरगांव मुंबई.

---

वाचा आणि मित्र मंडळीला दाखवा.

### सुबोधमाला.

[illegible]तीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.

आपलेपणाची खरी ओळख पटविणाऱ्या बोधपर गोष्टी. नामांकित लेखकांचे विचारपरिप्लुत निबंध अनुकरणीय चरित्रें, हृदयंगम कविता, चालू कादंबरी, अकलेचे हिशोब व कूटप्रश्न वगैरेनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६ वार्षिक वर्गणी ट. ख. सह १॥≈

**मालेच्या वर्गणीदारांस बक्षिसें.**

वार्षिक परिक्षेंत पास होणाऱ्या कोणत्याही इयत्तेंतील विद्यार्थी वर्गणीदारांस दरसाल बक्षिस रुपये ५००

अकलेचे हिशोब किंवा कूटप्रश्न सोडविणाऱ्या वर्गणीदारास दरमहा बक्षिस रुपया १

या संबंधाची तपशीलवार माहिती माहे मे १९१६ च्या अंकांत पहा. श्री एल. आर. बावडेकर हे आकोल्याचे एजंट आहेत.

गांवोगांवीं एजंट पाहिजेत— कमीशन भरपूर देऊं.

के. बी. देशमुख
संपादक—सुबोधमाला
उमरावती.

नो० नं० ३१८

---

### खात्रीचा तयार केलेला.

**ताजा अनंत मूळ.**

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुट्न अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं ६

---

### अस्सल अंगुरी.

## हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १८३ आणि १८७ तो. खालिस कस्तुरी रु२५ तो. शुद्ध शिलाजीत ८९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५**

---

### चांदीचीं भांडीं.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ४


---

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, पान भरत्याचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय,
सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---


दिवाळीकरितां सुगंधी मालाची प्रचंड लूट. !!

# आर्यवनौषधालय—मुर्डी.

स्वदेशी. **दिपावली.** ॐ नमः श्रीगणेशाय. **दिवाळी.** स्वदेशी.

**सावध रहा.** **फसूं नका.**

## अति उंची सुगंधि अत्तरांच्या पेट्या.

**प्रत्येक पेटीची किंमत पो. ख. सह ( १८१० )**

या पेट्या उत्तम सागाच्या लांकडाच्या मजबूत तयार करून त्यावर उत्तम पॉलिश केलेलें आहे. यामुळें पेटी विशेष मनोहर बनली आहे. या पेटींत गुलाब, हिना, वाळा, केवडा इत्यादी अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, उंची बेलिया बाटली एक, सुगंधी उटणें, गंधाचे रवे, स्त्रियांकरितां लालभडक कुंकू व हळद, असे एकंदर सुगांधि अकरा पदार्थ ठेविले आहेत. पेटींतील सर्व सुगांधि माल फार उत्तम ठेविला असून, तो सर्वांना घेण्यास जबर वाटूं नये ह्मणून आह्मी आपला कोणत्याहि तऱ्हेचा फायदा ठेविला नसून प्रत्येक पेटीची किंमत पो. ख. सह अवघी १८१० ठेविली आहे. वरील वर्णनावरून पेटीची किंमत किती अल्प ठेविली आहे, हें पेटींतील सर्व सुगांधि माल लक्ष्यपूर्वक पाहिल्यास सहज कळून येईल. या पेट्या आह्मी अगदीं अल्प किंमतीला देत असल्यानें त्यांचा अतिशय खप होणें अगदां स्वाहाजिक आहे. यामुळें आमच्याशीं स्पर्धा करण्याकरितां इकडे कांहीं ठिकाणीं याहूनाहि सवंग सवयाच्या भिकार मालांनीं भरलेल्या पेट्या निघालेल्या आहेत. करितां मोहक वर्णनाला न भुलतां खऱ्या उत्तम पेट्या आमच्याशिवाय इतरत्र मिळत नाहींत हें अवश्य लक्ष्यांत ठेवून सर्वांनीं याच पेट्या उपयोगांत आणाव्या. इतकेंच आग्रहपूर्वक सांगणें आहे.

## उंची बादशाही अत्तरांच्या पेट्या.

**पेटीची किंमत पो. ख. सह तीन रुपये**

ही पेटी सागाच्या लांकडाची फारच सुबक बनवून वर सुरेख पॉलिश केलें आहे या पेटींत सुरंगी, मालती, राजविलास, इत्यादि बादशाही अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, बादशाही केशसौगंधिनी तेल बाटली एक, उटणें, गंधाचे रवे व स्त्रियांकरितां कुंकू, हळद व काजळ असे एकंदर बारा बादशाही सुगंधि पदार्थ ठेविले आहेत. इतकें असूनही या पेटीची किंमत अगदीं अल्प पो. ख. सह ३ तीन रुपये ठेविली आहे. पेटींतील प्रत्येक मालाचे निरीक्षण केल्यास आह्मी ही ठेविलेली किंमत फारच अल्प ठरेल. तरी सर्वांनीं पेट्यांचा अवश्य उपयोग करावा. पेटींतील सर्व माल अति उंची असाच वापरला आहे. पाहिल्यावर सहज खात्री होईल.

**बादशाही अत्तरें**—सुरंगी, मालति, पुष्पराज, गंधराज, लक्ष्मिविलास, मदनविलास हीं प्रत्येकीं दर तोळ्यास ३ रुपये.

**सुगंधि अत्तरें**—गुलाब, हिना, केवडा, अंबर, मोतिया, बकुल वगैरे दर तोळ्यास १ रु.

**जीवनपुरी तेलें**—बेलिया, चमेली, हिना मसाला दर १० तोळ्यांस १ रुपया.

**विशेष सूचना**—वरील अत्तरांच्या पेट्या एकदम चार घेणारास एक पेटी, सात घेणारास दोन पेट्या, बारा घेणारास चार पेट्या, कमिशन दाखल फुकट देऊं. तरी एकदम गटानें पेट्या मागवून आपला फायदा करून घ्यावा. अत्तर पाव तोळ्याचे आंत मिळणार नाहीं. कित्येक आपला बनावट माल दुसऱ्याची निंदा करून खपाविण्याची प्रयत्न करीत आहेत. तथापि आमचा माल खरा उत्तम असल्यानें, तो खपविण्यास आह्मांस विशेष स्तुति किंवा दुसऱ्याची निंदा करण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण खऱ्यामालाचें सर्वत्र चहाते असावयाचेच. सबब दिवाळीचे सणास लागणारा सर्व माल आमचे कडूनच मागवावा. सर्व माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं.

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य मुर्डी**
**पोष्ट हर्णे जि० रत्नागिरी**

नो. नं. ३९०

## नोटीस

ती. रा. आण्णाजी त्रिंबक वैद्य रा. मलकापूर ता. मजकूर जि. बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणार बळवंत आण्णाजी वैद्य राहणार मलकापूर यांजकडून कळविण्यांत येते कीं, तुह्मास मी ता. १७-७-१६ इ. रोजीं आकोला येथील वऱ्हाडसमाचार पत्रांतून वडिलोपार्जित इस्टेटीची आफरातफर न करण्याबद्दल तुह्मास व मल्हार आण्णाजी यांस नोटिस दिली होती. व त्याचप्रमाणें इतर लोकांसही या इस्टेटी संबंधीं तुमच्याशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार न करण्याबद्दल नोटिस दिली होती. परंतु आतां पूर्ण विचाराअंतीं सदहू नोटिस माझे कोत्या समजुतीनें दिली गेली. व सदहू नोटिस देण्यांत माझेकडून मोठी चुकी झाली असें मला वाटत आहे. ज्या अर्थी वडिलांचे छत्र माझे शिरावर आहे, त्या अर्थी वडिलोपार्जित इस्टेटीमध्यें हल्लीं अगर तुह्मी हयात आहे तोंपर्यंत अगर तुमचे हयातीनंतरही कोणतेही प्रकारची मालकी हक्क मी सांगु इच्छित नाहीं. तुह्मी वडिलोपार्जित इस्टेटीचे पूर्ण मालक असून सदहू इस्टेटीची व्यवस्था वाटेल तशी करावी. त्या संबंधीं माझी कोणत्याही प्रकारची तक्रार नाहीं. अगर तुह्मी हयातीमध्यें केलेल्या व्यवहारामध्यें तुमचे हयातीनंतरही मी कोणतेही प्रकारची तक्रार करणार नाहीं. तुह्मास वरील तारखेस दिलेली नोटिस या नोटिशीनें रद्द करीत आहे. व त्याप्रमाणें पूर्वीची नोटिस रद्द झाल्याबद्दल माझा धाकटा बंधू मल्हार आण्णाजी व त्याचप्रमाणें इतर लोक यांस पूर्ण माहिती व्हावी ह्मणून सदहू नोटिस वऱ्हाडसमाचार पत्रांतूनच प्रसिद्ध केली जात आहे. ता० १७-९-१६

सही

बळवंत आण्णाजी वैद्य द. खुद

नो. नं. ३४९

---

**वऱ्हाडसमाचार**

मिति आश्विन शुद्ध ५ शके १८३८

## हिंदुस्थानांतील गुप्त पोलिसखातें.

ज्यांना आदर्श राज्यव्यवस्था शोधण्यासाठीं हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाकडे वळण्याचा मोह पडतो त्यांना हें कबूल करावें लागेल कीं गुप्तपोलिस ही संस्था रामराज्याचे काळीं सुद्धां होती. राज्यव्यवस्थेचें तें एक जरूरीचें अंग आहे व इंग्रजी राज्यांतच त्याचा उगम आहे असें नाहीं. त्याच्याबरोबर हेंही सांगितलें पाहिजे कीं १९०५ सालापूर्वी ह्मणजे बंगालच्या फाळणीसंबंधाची चळवळ सुरू होण्यापूर्वी गुप्त पोलिसखातें हिंदुस्थानांतल्या कांहीं प्रांतांत मुळींच नव्हतें, व ज्या ठिकाणीं तें होतें तेथें ही तें इतक्या सूक्ष्म प्रमाणावर होतें कीं सामान्यातः त्याचें अस्तित्व फारच थोड्यांना ठाऊक होतें, आणि ह्मणूनच त्या खात्याला 'गुप्तपोलिस खातें' हें नांव सार्थ होतें. पण गेल्या १०-१२ वर्षांत बहुधा प्रत्येक प्रांतांत या खात्याचें स्वरूप विस्तृत होऊन खर्चाचें प्रमाण मनस्वी वाढलें आहे. उदाहरणार्थ मद्रास घ्या. १९०४ सालीं येथें हें खातें मुळींच नव्हतें. १९१४ सालीं या खात्याचा खर्च ११६१७९ रु. झाला आहे. मुंबई इलाख्यांत १९०४ सालीं या खात्याप्रीत्यर्थ ५८४१९ रु. खर्ची पडले होते. दहा वर्षांत हा खर्च २१३०३९ रु. वर गेला! बंगाल्यांत १० वर्षांमागें या खात्याचा खर्च ५७९२७ रु. होता. १९१४ सालीं तो ४९०३९१ रु. झाला. मध्यप्रांतात १९०४-०५ सालीं हें खातेंच नव्हतें. १९११-१२ सालीं या खात्यांत फक्त १८ आफिसर व २० कान्स्टेबल होते. दोन वर्षांत ही संस्था २० आफिसर व १७ कान्स्टेबल अशी झाली व खर्च ५७४८४ रुपये झाला. बिहार पंजाब, संयुक्तप्रांत, आसाम वगैरे सर्व प्रांतांचे आंकडे पाहिले तर हाच प्रकार सर्वत्र दिसून येतो. असें कां असावें? सरकारला या खात्यावर येवढा खर्च करण्याची अवश्यकता कां वाटावी? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. गेल्या १० वर्षांत शिक्षणाचा प्रसार अधिक होऊन लोक सरकारच्या विश्वासाला अधिक पात्र झाल्यामुळें कायदेकौंसिलांत वगैरे त्यांची प्रतिष्ठा वाढली आहे, आणि त्या बरोबरच गुप्त पोलिसखात्याचा हा विस्तार करण्याची बुद्धि सरकारला झालेली दृष्टीस पडते हा विरोध नाहीं काय? पूर्वीपेक्षां आतां गुन्ह्यांची संख्या वाढली आहे काय? असल्यास त्या वाढीचीं कारणें काय? लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीपासूनच या खात्याच्या विस्ताराला आरंभ होण्याचें विशेष प्रयोजन काय? वगैरे गोष्टींचा विचार करूं लागलों आणि गतकालांतल्या गोष्टी क्रमाक्रमानें दृष्टिपटावर आणूं लागलों ह्मणजे वर सांगितलेल्या विरोधाचा धागा कसा लागतो तें कळतें. प्रथम लार्ड कर्झन यांनीं कलकत्ता युनिव्हर्सिटीपुढें केलेल्या भाषणानें सुशिक्षित हिंदी लोकांच्या चारित्र्याला असत्यवादित्वासारख्या आरोपाचें काजळ फासून त्या वर्गाला असंतुष्ट केलें. नंतर प. वा. व्हिक्टोरिया महाराणी साहेबांच्या जाहिरनाम्याला अशक्य सनद असें नांव देऊन कायदेशीर राजकीय चळवळीच्या मुळाशीं कुऱ्हाडीचा घाव घातला, आणि कायदेशीर चळवळीचा कांहीं उपयोग नाहीं, कुटिल अथवा वाममार्गच स्वीकारला पाहिजे अशा गैरसमजुतीचें बीजारोपण उच्छृंखल, तरुण आणि अविचारी पण महत्त्वाकांक्षी अशा लोकांच्या मनांत उत्पन्न करून अराजकतेला वाव करून दिला. नंतर हिंदु व मुसलमान या दोन स्त्रियांत मुसलमान ही आपली आवडती स्त्री आहे असें उघडपणें सांगणारे अविचारी अधिकारी निघून हिंदुच्या मनांत वैमनस्य उत्पन्न झालें, व त्यांना स्वसंरक्षणार्थ दांड, पट्टा वगैरे खेळ गुप्तपणें खेळण्याची बुद्धि होऊं लागली. पुढें स्वदेशी चळवळ सुरू झाली, तेव्हां कित्येक अधिकाऱ्यांनीं मनाचा शांतपणा न राखतां 'वंदेमातरम्' चा केवळ उच्चार करणारावर सुद्धां खटले केले, आणि कित्येक लोकप्रिय पुरुषांच्या तसबिरी किंवा 'वंदेमातरम्' छापाचे हातरुमाल वापरणें हा सुद्धा गुन्हा समजला जाण्यापर्यंत त्यांच्या अविचाराची मजल गेली. त्यामुळें अराजक लोक चिडून उघड उघड दरोडे घालूं लागले. या दरोडेखोरांचा बंदोबस्त पोलीस करूं लागले. तेव्हां पोलीस आफिसरावर गोळ्या घालण्यांत येऊं लागल्या. अर्थात् गुन्हेगारांचा तपास करण्यासाठीं सरकारला गुप्त पोलीस ठेवावे लागले. ही बंगालची स्थिति कमी अधिक मानानें व कांहीं निराळ्या स्वरूपानें सगळ्या प्रांतांत दिसूं लागल्यामुळें सर्वत्र या गुप्त पोलीस खात्याचा खर्च वाढूं लागला. हळू हळू सरकारची संशयी वृत्ति इतकी अतिरेकाला गेली कीं ना. गोखले, ना. सुरेंद्रनाथ ब्यानर्जी, ना. श्रीनिवासशास्त्री, यांच्यासारख्या राजमान्य व लोकमान्य सुशिक्षित व वजनदार लोकनायकांच्या मागें सुद्धां अहोरात्र पोलीस लागूं लागले. अशा रीतीनें गुप्त पोलिसांची संख्या वाढत गेली व तिच्या बरोबर अर्थात् खर्च ही वाढत गेला. या एकंदर गतकालीन इतिहासाच्या सिंहावलोकनावरून एक गोष्ट चांगली व्यक्त होते, आणि ती ही की लोकांत असंतोष उत्पन्न होण्यासारखे अविचारमूलक उद्गार, जाती जातींत पक्षपात दर्शविण्यांत अधिकाऱ्यांचे हातून घडलेली चूक आणि अधिकाऱ्यांची साशंकवृत्ति या तीन गोष्टी या अनर्थांच्या मुळाशीं आहेत. पैकीं पहिल्या दोन लॉर्ड कर्झन यांच्या बरोबरच सुदैवानें गेल्या, व तिसरीचा ही जोर लॉर्ड हार्डिंज यांच्या कारकीर्दींत पुष्कळ कमी झाला. हा अजिबात नाहींसा करून लोकांच्या पुढाऱ्यांना विश्वासांत घेण्याचें धोरण सरकारी अधिकारी जितकें ज्यास्त स्पष्टपणानें आपल्या वर्तनांत दाखवितील तितकें सरकारच्या विश्वासास आपण पात्र आहों हें दाखविण्याची बुद्धि ही लोकाग्रणींना ज्यास्त ज्यास्त होत जाईल. मग राहतां राहतां फक्त अराजकांचा लहानसा वर्ग राहील. त्याच्यावर बारीक नजर ठेवण्याकरितां थोडेसे गुप्त पोलीस ठेविलें ह्मणजे पुरें आहे. आणि तेवढें ठेविल्याबद्दल कोणीही समंजस मनुष्य सरकारला कधीं दोष देणार नाहीं. पण थोड्याशा अराजकां बरोबर पुष्कळशा सद्वर्तनी, राजनिष्ठ आणि कायदेशीर चळवळ करणाऱ्या लोकांना ही जें आजपर्यंत गुरफाटण्यांत आलें तें जर यापुढें येणार नाहीं, तर हिंदुस्थानांतला असंतोष जो लॉर्ड हार्डिंज यांच्या कारकीर्दींत बहुतेक मावळला आहे व राजनिष्ठेचा प्रखर तेजोनिधि त्याला दिपवून टाकीत आहे तो असंतोष कायमचा नष्ट होईल व सरकारला ही यापुढें गुप्त पोलिसाच्या पायीं येवढा खर्च निष्कारण करण्याचें प्रयोजन उरणार नाहीं.

---

## सरकार आणि व्यापार.

सरकारानें व्यापारांत पडावें कीं नाहीं, आणि पडणें झालें तर केव्हां तें न्यायाचें होईल या बाबतींत सुधारलेल्या राष्ट्रांत बहुधा मतभेद नाहीं. होतां होईल तों व्यापार हा स्वतंत्र असावा, सरकारानें त्यांत पडून खाजगी धंदेवाले लोकांच्या स्पर्धेंत शिरूं नये, असेंच मत सर्वमान्य आहे. याला अपवाद येवढाच आहे कीं जेथें उत्तम प्रकारची प्राप्ति होण्याचा संभव असून लोकांत धाडस नसल्यामुळें राष्ट्राची हानि होत आहे तेथें लोकांची उदाहरणानें खात्री करून देण्यासाठीं सरकारनें कांहीं दिवस वस्तुपाठ घालून देण्यापुरतें व्यापार धंद्यांत शिरावें. इंग्रजी राज्यांत हा नियम इतक्या कडक रीतीनें पाळला जात आहे कीं प्रधानमंडळांतल्यापैकीं एखाद्याचा एखाद्या व्यापारी पेढीशीं अप्रत्यक्ष संबंध जरी असला तरी त्याला तो सोडावा लागतो. याच तत्त्वावर इंडियन कॉन्सॉलिडेशन आक्टमधलें व्यापारी लोकांना सरकारी हुद्दा देण्याच्या कलमाला आयते वेळीं छाट बसला हें सर्वांना ठाऊकच आहे. वर जो अपवाद सांगितला त्या खालीं रेल्वे, इरिगेशन, किंवा जंगलांतल्या वस्तूंची विक्री वगैरे गोष्टी येतात. त्याच प्रमाणें युद्धासारख्या प्रसंगीं कांहीं विशेष प्रकारचा माल खरीद करणें किंवा विकणें ही गोष्ट सरकारला आपल्या हातीं ठेवावी लागते. पण या शेवटच्या सारख्या प्रसंगीं सरकारानें स्वतःसाठीं लागणारे जिन्नस खरीद करण्याचा ठेका एखाद्या कंपनीला देणें इष्ट नाहीं. कारण, त्यांत त्याचसारख्या बाकीच्या कंपन्यांचें नुकसान करणें आहे. हल्लीं कलकत्त्याच्या व्यापारी वर्गांत हाच विषय फार मोठ्या चळवळीचा होऊन बसला आहे. अशी बातमी आहे कीं विलायतेंत युद्धासाठीं लागणारे थैले तयार करण्यासाठीं कलकत्त्याहून जाणारी सगळी अंबाडी एकट्या राली ब्रदर्सनीं खरीद करावी असा पूर्ण हक्क सरकारनें त्या कंपनीला दिला आहे. कलकत्त्याच्या बाजारांत अंबाडीचा माल जितका येतो त्यांतला निंमे सरकारला लागतो. यामुळें या निम्याला येवढें मोठें एक गिऱ्हाईक मिळाल्यावर या गिऱ्हाइकाचे हातींच बहुधा भाव ठरविण्याचें काम जातें यांत आश्चर्य नाहीं. हा हक्क राली सारख्या व्यापारी कंपनीच्या हातीं गेल्यावर ती कंपनी शिरजोर होऊन इतर कंपन्यांना बुडविण्यास पाहणार ह्मणून व्यापारी वर्गांत बरीच खळबळ उडाली आहे. दुसरी आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं राली ब्रदर्सची कंपनी ही ब्रिटिश कंपनी नाहीं, ग्रीक आहे. तेव्हां बाकीच्या साऱ्या ब्रिटिश कंपन्या टाकून या ग्रीक कंपनी विषयींच सरकारला इतकें प्रेम कां वाटलें याचा खुलासा इंग्रज व्यापारी विचारीत आहेत.

---

## विद्याखातें

आमचें स्थानिक विद्याखातें सांप्रतच्या कालाला अगदीं अपूर्ण असून प्रगमनशील नाहीं. कदाचित् हा दोष सर्व इंडियन राष्ट्राच्या विद्याखात्याच्या मूलतत्त्वांमधलेच आहे असेंही आह्मीं कबूल करितों. विद्याखातें जितकें चांगलें तितकें राष्ट्राला न्यायखात्याची, पोलीसखात्याची, अबकारी खात्याची व तशाच प्रजेच्या दौर्बल्यावर अधिकार चालविणाऱ्या इतर खात्यांची जरूरी कमी कमी होत जाईल. हल्लीं आह्मांमध्यें

कमी कमी व्हावयाला पाहिजे असणारीं खातीं मोठ्या जोमावर व वाढीवर आहेत. आणि त्यांच्या उत्कर्षाच्या व्युत्क्रम गतीनें विद्याखातें अधोमुख होऊन अपकर्षाकडे चाललें आहे. जेथें विद्यावृक्षाची वाढ होऊन सुंदर चित्रविचित्र पुष्पांची व मधुर फळांची समृद्धी व्हावयाला पाहिजे त्या ठिकाणीं त्या वृक्षांची निपज व वाढ खुंटवून टाकणारे कांटेरी झाडें व इतर गवतें यांची रेलचेल झाली आहे. प्रारंभीं किंवा इंग्रजीच्या पहिल्या आमदानींत निवळ सुव्यवस्था आणण्यासाठीं हा क्रम उपयुक्त होता पण कालचक्राच्या प्रगतीबरोबर हा क्रम मात्र अद्याप बदललेला नाहीं. स्वराज्यवादी हा प्रश्न हातीं घेतात तेव्हां विद्याखात्याला पाहिलें अग्रस्थान देतात. किंबहुना विद्याखात्याच्या धोरणानें व अनुशासनानें इतर खात्यांचीं यंत्रें प्रचलित ठेवावयाचीं आहेत. आतां आमच्या देशांत विद्यार्थी विद्या शिकण्याला तयार आहेत तर विद्यार्थ्यांच्या स्वभावानुरूप त्यांना शालागृहेंच उपलब्ध नाहींत. फक्त कांहीं विद्यांचे दरवाजे खुले आहेत तर तेथें आमचें सरकार विद्यार्थ्यांच्या बहुसंख्येकडे पांहून आपले दरवाजे पुष्कळांना बंद करितात. आणि सरकारचें ह्मणणें असें कीं आह्मी नमुन्यासाठीं ह्मणून शाळा उघड्या ठेवतो. बाकीच्या गरजा लोकांनीं भागवाव्या. विद्याखात्याचे असे हातपाय बांधले गेल्यामुळें तें तसलें पंगु व लुलें खातें वर्तमान कालाला नसलें तरी चालण्यासारखें आहे. हें असलें खातें बंदच होईल तर आह्मास पक्की उमेद आहे कीं लोकांचीं विद्याखातीं स्वराज्य संत्राच्या आश्रयाखालीं वाटेल तितकीं नवीं उत्पन्न होतील असें हिंदी राजकीय आकाशांत नवें नवें उदय पावणारे तारे आपल्या तेजानें व प्रभेनें जगास विदित करीत आहेत. विलायतचे विद्याखातें जरी आमच्यापेक्षां पुढें असले तरी ते सुद्धां आह्माला नमुना ह्मणून या पुढें नको आहे. तिकडील दोष हिंदी वातावरणांत उतरतात तेव्हां ते आमच्या इकडील स्वराज्याच्या अभावीं सर्व राष्ट्राला भलतीच कडे नेवून दूर फेंकून देतात. विद्याखातें पैशानें व त्याच्या कार्यशक्तीनें जर या पुढें जोमदार, तेजस्वी व कर्तृत्ववान होणार नाहीं तर लढाई नंतरच्या ब्रिटिश साम्राज्याच्या नवीन घटनेंत त्याला खोच मिळण्याचा मोठा संभव आहे. विद्यार्थी जसे वाढतात तशीं विद्यामंदिरें वाढलीं पाहिजेत असें वर्तमानकाल सुचवीत आहे आणि सांप्रतच्या महायुद्धांत जें पुष्कळसें अपयश प्रारंभीं आलें त्याचीं कारणें विद्याभिवृद्धीच्या लघुपणांतच निगुडित आहेत.

## बालमृत्यूंचें भयंकर प्रमाण.

हिंदुस्थानांतल्या कोणत्याही प्रांताचे आरोग्यविषयक रिपोर्ट घ्या, त्यांत बालमृत्यूंचें प्रमाण अतिशय मोठें आढळून येईल. उदाहरणार्थ, नुकता प्रसिद्ध झालेला मध्यप्रांत व वऱ्हाड यांचा रिपोर्ट घ्या. पांच वर्षांच्या आंतल्या मुलांच्या मृत्यूंची संख्या एकंदर मृत्यूसंख्येच्या निम्याहून अधिक आहे! उन्हाळ्यांत मुलांचे मृत्यु विशेषतः घडतात, या वरून भयंकर उष्णता मान हें एक कारण ठरवितां येतें. खेडेगांवांतल्यापेक्षां शहरांत मृत्युसंख्या सरासरीनें ज्यास्त असते, असें आढळून आलें आहे. शहरांत बाळंतपणाचे वेळीं साह्य करण्यासाठीं शिकलेल्या सुईणी सरकारनें ठेवून पाहिल्या, पण त्यांचा कांहीं विशेष परिणाम मृत्युसंख्येवर घडला नाहीं असें रिपोर्टांत कबूल केलें आहे; आणि याला खरा उपाय ह्मणजे लोकांत शिक्षणाचा प्रसार करणें हा आहे असें ना. चीफकामिशनर साहेब यांनीं ह्मटलें आहे तें अगदीं खरें आहे. आमच्या लोकांत पूर्वापार चालत आलेल्या बाळंतपणांत वागण्याच्या रीती इतक्या वेडगळ आणि शास्त्रविरुद्ध आहेत कीं त्यांच्यापायीं इतकीं अर्भकें कशीं मृत्यु पावतात याचें आश्चर्य वाटावयास नको; तर उलट अशा वेडगळपणाच्या चालीरीतींतून ही बरींच अर्भकें वाचतात याचें खरोखर आश्चर्य वाटावयास पाहिजे. सरकारानें दायांची संख्या वाढवून त्यांना चांगल्या कामाबद्दल इनाम देण्याची वहिवाट जबलपूर येथें सुरू केली आहे. हा प्रयोग कितीसा यशस्वी होतो तें पाहणें आहे. पण आमच्या स्त्रियांचें आरोग्य विषयक अज्ञान जोंपर्यंत दूर झालें नाहीं तोंपर्यंत बिचाऱ्या दाया तरी काय करणार? हिंदुस्थानच्या स्त्रीवर्गाच्या आरोग्याला लागलेली अज्ञानाची कीड शिक्षण प्रसारानेंच नाहींशी होईल. मग तें शिक्षण शाळेंत द्या, किंवा घरगुती समाज भरवून त्यांच्या पुढें अगदीं सोप्या शद्बांनीं चित्रांच्या साह्यानें व्याख्यानांच्या द्वारें द्या. पण शिक्षण हा एकच यावर रामबाण उपाय आहे.

## कल्पना आणि व्यवहार दृष्टि.

सिमल्याच्या युरोपियन समाजापुढें नुकतींच सरदार जोगेंद्रसिंग आणि सर व्हलेंटाईन चिरोल या दोघांचीं जीं भाषणें झालीं, तीं गमतीचीं होतीं. सरदार साहेब प. वा. मलबारी साहेबांच्या विचाराच्या तालमींतले आहेत; तेव्हां संदिग्धपणाचें भाषण करून सरकार व लोक या दोघांपाशीं मान्यता ठेवण्याचा त्यांनीं प्रयत्न केला याचें कोणाला आश्चर्य वाटावयास नको. दोघांपाशीं मान्यता ठेवणें हें आमच्या मतें वाईट आहे असें नाहीं, पण तें सत्यवादित्वाची हानि करून केवळ प्रियवादित्वानें साधू पाहणें गैर आहे असें आह्मी समजतों. हिंदुस्थानांत सध्या राजकीय जागृति चालली आहे व लोकांच्या महत्त्वाकांक्षेचें क्षेत्र विस्तृत झालें आहे या गोष्टीचा सरदार साहेबांनी उल्लेख केला, पण या महत्वाकांक्षा कशा पुऱ्या कराव्या, किंवा हिंदुस्थानापुढें कोणतें भवितव्य आहे याविषयीं त्यांनीं मुग्धपणा धारण केला. इतकेंच नाहीं तर लक्ष्मी, उच्चकुलांत जन्म आणि अधिकार या तिघांचा ही मिलाफ जेथें होईल अशा प्रकारचें एक कौंसिल स्थापन करावें अशी एक वेडगळ योजना मांडिली. सरदार साहेबांच्या दृष्टीनें बडेबापके बेटे व अधिकारी हे काय ते हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें चालविण्यास खरे पात्र होत, आणि सामान्य लोकांमध्यें मिळून मिसळून त्यांच्या सुखदुःखाशीं तादात्म्य करून घेणारे सुशिक्षित पुढारी कुचकामाचे असा भावार्थ त्यांच्या व्याख्यानापासून काढल्यास तो अन्यायाचा होईल असें आह्मांस वाटत नाहीं. हिंदुस्थानांत लोकमत प्रबळ झालें पाहिजे व त्या मताला धरून राज्यपद्धतींत सुधारणा झाली पाहिजे तरच लोक संतुष्ट राहतील ही साधी गोष्ट सूर्य प्रकाशा इतकी स्पष्ट असतां सरदार साहेबांच्या ती गांवीं ही नाहीं. दुसरें भाषण सर व्हॅलेंटाईन चिरोल यांचें झालें. तें अरेरावीपणाचें ह्मणून तितकेंच टाकाऊ ह्मटलें पाहिजे. सरसाहेबांचे हिंदुस्थानच्या खऱ्या स्थितीबद्दलचें ज्ञान आंवळ्या येवढें पूज्य आहे. त्यांची माहिती ह्मणजे सेक्रेटरीएटमधल्या फाइलांतली, किंवा युरोपियन समाजापासून प्राप्त झालेली. यांनीं पांचसात वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांतल्या अशांततेविषयींची केलेली मीमांसा कशी साफ चुकीची होती तें सर्वांस विदितच आहे. त्यांना प्रत्येक चळवळींत जातिद्वेष, राजद्रोह आणि राज्यकर्त्यांना अडथळा करण्याची लोकांची इच्छा दिसते. ना. गोखल्यासारख्या खऱ्या खऱ्या कळकळीच्या लोकनायकाच्या सहवासांत पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्यें राहून सुद्धां त्यांच्या विचारांत विशेषसा फरक पडलेला दिसत नाहीं. हिंदुस्थानची राजनिष्ठा साऱ्या युरोपखंडांत दुमदुमत आहे तरी तिच्या डंक्याचा ध्वनि सरसाहेबांच्या कर्णरंध्रांत प्रविष्ट झालेला नाहीं. हिंदुस्थानचे लोक कल्पना तरंगांत वाहत जाणारे व युरोपियन अधिकारी मात्र खऱ्या खऱ्या वस्तुस्थितीकडे व्यावहारिक दृष्टीनें पाहणारे ही त्यांची समजूत अद्याप कायम आहे. न्यायखातें व विधायक खातें यांच्या मिलाफापासून होणारे दुष्परिणाम दिसत असतां ही हीं खातीं निराळीं करण्याची व्यावहारिक सुधारणा, लोकांना शिक्षणाच्या अभावीं सामाजिक, आरोग्यविषयक, धार्मिक, सर्वच प्रकारें हानि सोसावी लागते ह्मणून तें अज्ञान नाहींसें करण्यासाठीं सार्वत्रिक व मोफत शिक्षण करण्याची ना. गोखले यांची सूचना, सध्याच्या स्थितींत लोकांना लष्करी शिक्षण देण्याची अवश्यकता, इ. व्यावहारिक उपयुक्ततेच्या लोकांच्या मागण्यांना सरकारी अधिकाऱ्याकडून कसा विरोध होत असतो हें घडघडीत दिसत असून ही जेव्हां ते हिंदी लोकांना कल्पनातरंगांत वाहत जाणारे व युरोपियनांना व्यावहारिक दृष्टीचे समजतात, तेव्हां डोळे उघडे ठेवून पाहावयाचें नाहीं, आणि कान उघडे ठेवून ऐकावयाचें नाहीं, असा त्यांचा हट्टच आहे असें ह्मटलें पाहिजे. अशा माणसाच्या उद्गाराची किंमत किती समजावयाची तें समंजस माणसांना सांगावयास नकोच.

## उज्ज्वल भवितव्य.

यंदा अमेरिकेंतलें कापसाचें पीक बुडाल्यामुळें हिंदुस्थानच्या गिरणीवाल्यांपुढें उज्ज्वल भवितव्य आहे असें कलकत्त्याच्या 'कॅपिटल' पत्रांत एक लेखक ह्मणतो. गेल्यासालीं हिंदुस्थानच्या गिरणीवाल्यांना त्यांच्या कल्पनेच्या बाहेर फायदा झाला, पण या पेक्षां ही ज्यास्त फायदा चालू सालीं होईल असें या लेखकाचें ह्मणणें आहे. यंदाचें कापसाचें उत्पन्न ९० लक्ष गांठडी होईल असा अंदाज आहे. गतवर्षीच्या मानानें हें फारसें ज्यास्त आहे असें नाहीं, पण युद्धामुळें युरोपखंडांतली कापडाची मागणी पुरी पाडण्यास कापसाच्या टंचाईमुळें ल्यांकाशायरच्या गिरण्या असमर्थ होतील. शिवाय इराण, व मेसोपोटेमिया ही दोन गिऱ्हाइकें हिंदुस्थानला सहज मिळवितां येण्यासारखीं आहेत. तीं त्यानें मिळविल्यास हिंदुस्थानच्या गिरण्या रात्रंदिवस चालू राहिल्या तरी पाहिजे तेवढा पुरवठा हिंदुस्थानाच्यानें करवेल कीं नाहीं याची शंका आहे. हिंदुस्थानाला अशी संधी फार वर्षांनीं मिळालेली आहे पण हिंदी लोकांना व्यापार वाढविण्याच्या सुधारलेल्या पद्धति ठाऊक नसल्यामुळें वाहत्या गंगेंत हात धुऊन घेण्याची संधी ते लोक फुकट दवडतील अशी भीती वाटते.

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठ दहा दिवसांपासून महायुद्धाचें केंद्र बदलून ट्रान्सासिल्वानिया व डिब्रूजाकडे गेलें आहे. ट्रान्ससिल्वानियामध्यें रुमानियन लोक पुढें सरकत गेले आहेत; इतकेंच नाहीं तर तेथें बराचसा मुलुख ही त्यांनीं काबीज केला आहे. झेकेलीउडवार हेली हें ठिकाण रुमानियानें हस्तगत केल्यामुळें ट्रान्ससिल्वानियामधला एक तृतीयांश भाग त्याच्या हस्तगत झाल्यासारखा आहे. या मुलुखांत युद्धाची तीव्रता सध्या किती आहे याची कांहींशी कल्पना एका गोष्टीवरून करतां येण्यासारखी आहे. ती गोष्ट ही कीं या रणक्षेत्रांत गेल्या एका आठवड्यांत ४८ आफिसर व ६८३६ शिपाई कैदी करण्यांत आले. ज्यू दरींत शत्रूचे हल्ले परतविण्यांत आले व दोन यांत्रिक तोफाही घेतल्या. सारांश, रुमानिया युद्धांत सामील झाल्यापासून मित्रराष्ट्रांना बरीच बळकटी आली आहे.

## पश्चिम रणक्षेत्र.

व्हर्डुन हस्तगत करून पारिसवर चाल करून जाण्याच्या उमेदीनें जर्मनीनें आतांपर्यंत लढण्याची शिकस्त केली, आणि लाखों लोकांच्या प्राणांचे बळी दिले, पण शेवटीं हताश होऊन तो नाद त्याला सोडून द्यावा लागला आहे. थियामांट, फ्लुरि व सेविलि हीं ठिकाणें तर जर्मनीच्या हातांतून कधींच गेलीं. इंग्रज लोक एकामागून एक जर्मनचे कचाट्यांतून फ्रेंच ठिकाणें सोडवीत चालले आहेत. इंग्रजांनीं कोर्सलेट व दुसरीं कित्येक ठिकाणें मोठ्या बहादुरीनें घेतलीं. कोर्सलेट हें ठिकाण फार महत्त्वाचें आहे. हें घेण्या [illegible] लढावें लागलें [illegible] लढाईतला जय [illegible] जर्मनशत्रूंच्या म[illegible] नाश करण्याची [illegible] साधली [illegible]

अलीकडच्या विजयपरंपरेचें कारण सांगतात. मोर्वल हा विलक्षण मजबूत किल्ला इंग्रजांनीं सर केला आहे. इकडे इंग्रजांनीं जर्मनांना सळो कीं पळो करून सोडलें असतां फ्रेंच ही शत्रूला जेरीस आणीत आहेत. फ्रेजिकोर्ट व १८ नं. ची टेकडी यामधला सगळा मुलुख त्यांनीं घेतला; इतर ही कित्येक ठिकाणें व खंदक घेतले. एकंदर जखमी न झालेले अस चारशेवर शत्रु कैद करण्यांत आले. सॉमवर तोफांच्या गोळ्यांचा वर्षाव चालू आहे. एका जर्मन आकाशयानानें क्रुनेविलवर बांब टाकिले. याचा वचपा फ्रेंचांनीं चांगला घेतला. त्यांनीं शत्रूंच्या चार विमानांचा नाश केला इतकेंच नाहीं, तर गिस-कार्डवर बांब टाकिले, थियोनव्हिल व रोंबाच येथील कारखाने जाळलें व एका रेल्वे स्टेशनावर बांब टाकिले.

## ग्रीसची दुर्दशा.

ग्रीसचा राजा कान्स्टांटाइन यानें लोकमताला झुगारून देऊन नियमबद्ध शासनपद्धतीचा अपमान केला आणि आतां पापांचा घडा भरत आला आहे असें पाहून त्याची पांचावर धारण बसलेली दिसत आहे. राजाच्या या कृत्यानें लोकांना इतका वीट आला आहे कीं जिकडे तिकडे राजाविरुद्ध बंडाळी माजली आहे आणि एकट्या राजधानीशिवाय त्याला माझें असें ह्मणण्यास कांहीं उरलें नाहीं. सालोनिका हें राजाविरुद्ध बंड केलेल्या पण खऱ्या कायदेशीर शासन पद्धतीला अनुकूळ असलेल्या पक्षाचें केंद्र बनलें आहे. तेथें एक कमिटी बसली आहे व राज्याचा खरा कारभार व त्यासाठीं कर्ज काढण्याची वगैरे व्यवस्था हीच कमिटी करीत आहे. ग्रीसचे आरमारसुद्धां राजाविरुद्ध बिथरलें आहे आणि एक क्रुझर सालोनिकाला जाण्यासाठीं निघाल्याची ही खबर आली आहे. लष्करांतले ३०० आफिसर तर या पूर्वींच सालोनिकाला जाऊन ही पोचले आहेत. इतके दिवस राजाला खुष ठेवण्यासाठीं मित्र राष्ट्रांशीं द्वेष करणारें प्रधान मंडळ आपली ग्रहदशा पालटलेली पाहतांच मित्रराष्ट्रांशीं लाडीगोडी करून आह्मी पूर्वींपासूनच तुमच्या पक्षाचे आहों असें भासवूं लागलें आहे. राजाविरुद्ध बंड करणारापाशीं मॉ० व्हेने झुलोस यांचें वजन मोठें आहे. त्यांनीं मनांत आणल्यास त्यांना राज्यपद सहज मिळूं शकेल. पण व्हेने झुलोस सारखे थोर मनाचे मुत्सद्दी स्वार्थासाठीं इतके उत्सुक कधीं नसतात. लोकमताला मान देऊन योग्य धोरण स्वीकारण्याची आणखी एक संधी राजाला देण्याचे व्हेने झुलोसचे मनांत आहे. लोक तर राजाविरुद्ध इतके बिथरले आहेत कीं एक गादी तर [illegible] तरी मीळ अशी [illegible] दिली आहे व [illegible] बसला आहे. [illegible] स्वाधीन होऊन [illegible]ाय दुसरा मार्गच [illegible] एकच त्राता उरला आहे आणि तो व्हेने झुलोस हा होय.

## पूर्व रणक्षेत्र.

यांत कांहीं गडबड नाहीं. कोव्हेलपासून ३० मैलांवर एक लढाई झाली, पण विशेष कांहीं परिणाम घडला नाही. ता. ३१ आगष्टपासून एका महिन्यांत राशियानें शत्रूचे २९००० शिपाई कैद करून २२ तोफा घेतल्या. जर्मनलोकांना पुष्कळ कुमक येऊन मिळत आहे. पण राशियन लोक खंबीर आहेत. ते शत्रूला दाद न देतां मुकाट्यानें एकेक पाऊल पुढें टाकीत आहेत.

## बडोदा संस्थानांतलीं देवस्थानें.

हिंदुस्थानांत अत्यंत जरूरीचीं अशीं जीं सुधारणास्थळें आहेत त्यांत देवस्थानांना प्रमुखस्थान दिलें पाहिजे. पण याच ठिकाणीं पुष्कळवेळां मोठा अंधार दिसतो. आमचे लोक धर्मार्थ हवीं तितकीं दानें देतात पग त्या देणग्यांचा सत्पात्रीं विनियोग होतो कीं नाहीं तें पाहत नाहींत. यामुळें आळशी व व्यसनी लोकांना उत्तेजन मिळून धर्मार्थ देणग्या असत्कारणीं लागतात. ही स्थिति पाहून बडोद्याचे महाराज श्री. गायकवाड सरकार यांनीं याही बाबतींत इतर संस्थानिकांना व ब्रिटिश सरकारला उदाहरण घालून दिलें आहे. त्यांनीं देवस्थान ह्मणून एक स्वतंत्र खातें निर्माण करून त्यावर एक सुशिक्षित, व नव्या आणि उदार मताचा पदवीधर अधिकारी नेमून देवस्थानांकडे खर्च होणाऱ्या पैशाची व्यवस्था पाहण्याचें काम त्याचेकडे सोपविलें आहे. याचा परिणाम अल्प काळांतच चांगला दिसूं लागला आहे. या धर्मादायाच्या रकमेंतून या अधिकाऱ्यानें गांवोगांव धर्मोपदेशक पाठविले; देवस्थानांवर देखरेख करून शिवाय त्याबरोबर निरनिराळ्या जातींच्या चालीरीती व संस्कार यांचे विषयींची माहिती गोळा करण्याचें ही काम महाराजांनीं या अधिकाऱ्याकडून करविलें आणि अशा रीतीनें मिळविलेल्या माहितीचीं पुस्तकें देशी भाषेत प्रसिद्ध केलीं. त्यावरून आपल्या धार्मिक व सामाजिक आचारांत कोठें व्यंगें आहेत तें दिसून आलें. इतकेंच नाहीं तर जातींजातींतल्या आचारांत कोठें साम्य किंवा भिन्नता आहे तें बारकाईनें पाहून त्यावरून जातीच्या उत्पत्तीविषयींचा तपास लावण्याचें अत्यंत महत्त्वाचें काम ही सुरू आहे. अशा रीतीनें देवस्थानांच्या व्यवस्थेचा अनुभव घेतल्यावर तीं उत्तम रीतीनें कशीं चालवावीं याबद्दलचे नियम ठरवावयाचे व त्या नियमांप्रमाणें सर्वांनीं चालावें असा कायदा करून देवस्थानाविषयींचा महत्त्वाचा प्रश्न कायमचा सोडवावयाचा श्री. गायकवाड सरकारचा विचार आहे. हा विचार अत्यंत स्तुत्य असून इतर संस्थानिकांनीं व ब्रिटिश सरकारानें हा अनुकरण करण्या सारखा आहे असें कोण ह्मणणार नाहीं?

## १९१५ चा पोलीस खात्याचा रिपोर्ट.

(आमच्या एका सन्मान्य मित्राकडून.)

मध्यप्रांत व वऱ्हाड येथील पोलीस खात्याचा १९१५ सालचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्या वरून असें दिसून येते कीं दरसाल गुन्ह्यांचें प्रमाण कमी कमी होत न जातां उलट तें वाढतच चाललें आहे! हा रिपोर्ट पाहतां पोलीस खात्याची तारिफ करावी किंवा काय हेंच समजत नाहीं. दिवसें दिवस पोलीसचा बंदोबस्त चांगला होत चालला आहे याचें हें दिग्दर्शन कीं काय? सन १९१४ सालच्या गुन्ह्याचे प्रमाणापेक्षां सन १९१५ चे गुन्ह्यांचें प्रमाण शेंकडा ८ प्रमाणानें वाढलें आहे! व यंदा तर इतके गुन्हे झाले कीं गेल्या पंधरा वर्षांत इतके गुन्हे कधींच झाले नव्हते! सन १९०० सालच्या दुष्काळाच्या सालीं जितके गुन्हे झाले होते तितकेच जवळ जवळ गुन्हे यंदा झाले! दुष्काळाचे सालीं गुन्हे जास्त घडणें हें स्वाभावीक तरी आहे परंतु गेल्या वर्षीं चांगलें पीक आले असतां, इतके गुन्हे होतात ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट आहे! एकंदर २२ जिल्ह्यांपैकीं फक्त १७ जिल्ह्यांतच गुन्ह्यांचें प्रमाण वाढलें आहे. ह्यावर्षी एकंदर गुन्ह्यांपैकीं शेंकडा २९ गुन्हे एकट्या उमरावती जिल्ह्यांत झाले! वऱ्हाडांत उमरावती जिल्हा सगळ्यांत प्रमुख असा गणला जातो. त्यानें तर १९१९ सालीं गुन्हे करण्यांत सुद्धां पहिला नंबर पटकाविला आहे! रिपोर्टाचे सालीं खून गेल्या वर्षा इतकेच झाले. परंतु त्यांतल्या त्यांत मुलांचे खून बरेच कमी झाले. व दंग्या धोप्याचे गुन्हे *Riot cases* शेकडा १२ प्रमाणानें कमी झाले. मात्र दरवड्यांची संख्या शेंकडा ६० प्रमाणानें वाढली! एकंदर ८९ दरवड्यांपैकीं एकट्या वऱ्हाडांत ३२ दरवडे पडले! व दमो जिल्ह्यांत २९ पडले! घरेंदारें पीक वगैरे जाळून फस्त करण्याचे गुन्हे Arson cases शेकडा २७ प्रमाणानें वाढले व ह्या तऱ्हेच्या सबंध प्रांतांच्या गुन्ह्यांपैकीं एक सप्तमांश गुन्हे एकट्या नागपूर जिल्ह्यांत झाले! व या पैकीं पुष्कळशा आगी प्लेगमध्यें केलेल्या घरफोडींच्या गुन्ह्यांचा तपास लागू नये ह्मणून लावल्या असाव्यात असा इन्सपेक्टर जनरल साहेबांचा समज आहे. घर फोडीचे गुन्हे शेंकडा २९ या प्रमाणांत वाढले आहेत. या जातीचे गुन्हे पकडण्यामध्यें पोलीसानीं हुषारी दाखविली नाहीं असें इन्सपेक्टर जनरल साहेबांचें मत आहे, कारण तपास केलेल्या या जातींच्या गुन्हेगारांपैकीं शेंकडा १९ लोकांनाच फक्त शिक्षा देतां आल्या! बाकीच्यांना अजिबात दोषमुक्त करावें लागलें. याचें कारण असें देण्यांत आलें आहे कीं तपास करण्यास जितके लोक पाठवावयास पाहिजेत तितके पोलीस शिपाई कमी असल्या कारणानें पाठवितां आले नाहींत. सब इन्स्पेक्टर लोकांना अतिशय काम असल्याकारणानें ह्या गुन्ह्यांचा तपास करण्याचें काम अडाणी अशा हेड कान्स्टेबल लोकांवरच सोपवावें लागतें, त्यामुळें हें तपासाचें काम अतीशय गैदीपणानें केलें जातें. आमच्या मतें हें कारण दाखविण्यामध्यें जो एक कबूली जबाब इन्स्पेक्टर साहेबांनीं दिला आहे, तो सरकारनें विचार करण्यासारखा आहे. व तो हाच कीं कोणतेंही काम करण्याला सुशिक्षित मनुष्य जितक्या उपयोगीं पडतो तितका अशिक्षित मनुष्य पडत नाहीं! सर्व लोकांस सक्तीचें शिक्षण सरकारनें एकदम सुरु करावें याच्या करितां लोकांचा जो हट्ट सरकारपाशीं आहे तो याच कारणाकरितां ! सरकारी राज्य व्यवस्था सुद्धां सुयंत्रित चालण्याकारितां सुशिक्षित पोलीसांची जरुरी आहेच. इतकी शिक्षणाची महती असतांना सक्तीचें शिक्षण तर बाजूलाच राहो, परंतु जे लोक आपण होऊन शिकावयाला तयार होतात त्यांची तरी सर्वांची सरकारनें शिक्षणाची सोय कोठे केली आहे? शिक्षणाचीच जर सोय पुरेशी नाहीं तर पोलिस खात्याला सुशिक्षित पोलीस तरी कसे मिळणार व गुन्हे तरी हुशारीनें कसे पकडले जाणार? प्रस्तुत रिपोर्टांत पोलीस सब इन्स्पेक्टरच्या ट्रेनिंग स्कूल करितां या प्रांतांतील रहिवाशी मिळत नाहींत व ही बहुतेक भरती इतर प्रांतांतील लोक आणून करावी लागते व या प्रांताच्या तरुणांना ही गोष्ट शोभेशी नाहीं असे उद्गार इन्स्पेक्टर जनरल साहेबांनीं काढले आहेत. आह्मी त्यांस असें उत्तर देतों कीं इतर प्रांतांत जितक्या शिक्षणाच्या सवलती आहेत, जितक्या कमी अडचणी आहेत, जितक्या उदार देणग्या शिक्षणा प्रीत्यर्थ आहेत तितक्या या प्रांतांत आहेत काय ? हा प्रांत मागसलेल्या प्रांतांपैकीं एक आहे ही गोष्ट जर निर्विवाद आहे तर खुद मुंबई इलाख्यांत मुलगा एका इयत्तेंत कितीक वेळां नापास झाला तरी त्याला पास होईपर्यंत त्या वर्गांत बसतां येतें. अशी सवलत तेथें असतांना दोन वर्षें लागोपाठ नापास झालेल्या मुलांना शिक्षणांतून अजिबात हाकून लावण्याचा या प्रांतांतच हुकूम आहे तो कशाला ? मागासलेल्या प्रांतांत ज्यास्त शिक्षण करण्याचा हा मार्ग आहे कीं काय? तीक्ष्ण बुद्धीच्या अभावीं दोन दोन तीन तीन वर्षांत एक एक इयत्ता करून कसें बसें मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतलेले या प्रांताचे सुशिक्षित रहिवाशी सरकारी पोलिस खात्यांत उपयोगी पडणार नाहींत काय ? आमचें असें मत आहे कीं शिक्षणाकरितां या प्रांतांत विशेष सवलती दिल्याशिवाय ही ओरड कदापी बंद व्हावयाची नाहीं. पोलीस खात्यांतच नव्हे तर प्रत्येक खात्यांत बाहेरच्या प्रांतांतलि लोक आणल्या शिवाय आज जें चालत नाहीं त्याचें तरी इंगीत हेंच आहे. या शिवाय प्रांतांतील लोक उपलब्ध असून त्यांचा शिरकाव थेट पर्यंत लागणाऱ्या शिफारशींच्या अभावामुळें होत नाहीं असाही अनुभव आहे. प्रांतिक लोकांची डाळ नीटशी शिजतच नाहीं असा ही आक्षेप विचारांत घेतला पाहिजे.

रिपोर्टाचे सालीं सार्वजनीक शांतता भंग करणारे गुन्हे बरेच कमी झाले. व खोटी नाणीं करण्याचे गुन्हे २ दोनच झाले. याबद्दल पोलीसखातें शाबासकीस पात्र आहे.

अजूनही पोलिसखात्याला शिपाई जितके मिळावयास पाहिजेत तितके मिळत नाहींत.

त्यामुळें शिस्तही चांगली ठेवतां आली नाहीं. पोलीस शिपायांचा पगार व दर्जा वाढविण्या-संबंधानें ना. चीफ कमिशनर साहेबांनीं हिंदुस्थान सरकारास लिहिलें आहे. व त्यांचें ह्मणणें कबूल केलें तर हल्लींपेक्षां चांगल्या दर्जाचे लोक येतील अशी आशा या रिपोर्टांत प्रदर्शित केली आहे आमच्या मतें हल्लींचा पोलीस शिपायाचा पगार इतर मजुराचे किफायतीकडे व कामाचे वेळेकडे पाहिल्यास फारच कमी आहे. साधारण मजूर १९ ते २० रुपये दरमहा मिळवितो व तितकेंच मिळविण्या करितां पोलीस शिपायास निदान ९ वर्षें तरी ताबेदारी करावी लागते. व या कारणामुळेंच शिपाई पुरेसे मिळत नाहींत. इन्स्पेक्टर जनरल साहेबांनीं आणखी एक डेप्युटी इन्स्पेक्टर जनरलची जागा उत्पन्न करण्यासंबंधानें लिहिलें आहे तिकडें लक्ष्य न देतां सरकारनें पोलिसांचा पगार वाढवून त्यांना चांगल्या बढत्या देण्याच्या गोष्टीकडे पहिल्या प्रथम लक्ष्य द्यावें . नाहीं तर अगोदरच लोकांच्या गैरमर्जींतील खातें अगदींच अडाणी व हलक्या मनोवृत्तींच्या लोकांच्या हातांत जाऊन सरकार प्रजेचे टीकेस पात्र होईल.

प्रस्तुत रिपोर्टांत गुन्हे जास्त दिसण्याची जीं कारणें ह्मणजे महर्घता, पैशाची टंचाई, प्लेग व हल्लींची गुन्ह्यांची बातमी देण्याची व नोंद करण्याची उत्तम पद्धती हीं जीं दिलीं आहेत त्यामध्यें थोडासा तथ्यांश असला तरी एकंदरींत पाहतां हा पोलीस खात्याचा रिपोर्ट असावा तितका उत्साहजनक नाहीं व पोलीस खात्यांतील लोक लोकांचे जास्त उपयोगी पडल्या शिवाय ही स्थिती सुधारणार नाहीं.

प्रस्तुत रिपोर्टांत मागील दहा वर्षांच्या प्रत्येक तऱ्हेच्या गुन्ह्यांचे आंकडे कोष्टकांनीं न दिल्या कारणानें जो एक दोष राहिला आहे तो पुढील खेपेस दुरुस्त केल्यास चांगलें होईल असें आह्मांस वाटतें.

## यात्रेला खो.

### पटकीमुळें देऊळगांवराजा येथील यात्रेला मनाई )

श्रीबालाजी संस्थान देऊळगांवराजा येथील वार्षिक यात्रेचा महोत्सव येत्या आश्विन शुद्ध ८ मी पासून आश्विन वा ३० अखेरपावेतों होत असतो. परंतु यंदा त्या भागांत गोळीचा उपद्रव फार जोरावर असल्यामुळें सार्वजनीक आरोग्याच्या दृष्टीनें बाहेरगांवाहून येणाऱ्या हजारों यात्रेकरूंच्या प्राणाच्या सुरक्षितपणासाठीं आलिशान चीफ कमिशनर साहेबांनीं ही यात्रा यंदा बंद ठेवण्याविषयीं हुकूम केला आहे. त्या हुकुमाची जाहिरात दुसरीकडे इंग्रजींत मेहरबान डिपटी कमिशनर साहेबांच्या सहीनिशीं छापली आहे . अशा जाहिराती इंग्रजी भाषेंत कुच कामाच्या असतात, हें ऑफीसच्या मंडळीनें लक्षांत घ्यावयाला पाहिजे. किंबहुना लोकांच्या माहितीचे सर्वच कागदी सार्वजनीक व्यवहार प्रस्तुतच्या विद्येच्या स्थितींत प्रांतिक ह्मणजे मराठी भाषेंत चालूं होतील तर लोकांचा विशेष फायदा होईल.

## प्रांतिक परिषद्

गतवर्षीं वऱ्हाड व मध्यप्रांत मिळून भरलेल्या संयुक्त प्रांतिक परिषदेच्या ठरावाप्रमाणें यंदाची प्रांतिक परिषद उमरावतीस भरावयाची आहे. तिच्या संबंधानें इतके दिवस कांहीं वाद पडले होते. त्यांचा उभयपक्षांस अनकूल असा निर्णय होऊन प्रांतिक परिषदेच्या पूर्व तयारीची व्यवस्था निश्चित करण्यासाठीं एक जाहीर सभा कालरोजीं सायंकाळीं प्रांतिक कांग्रेस कमीटीनें बोलाविली होती. येत्या मोहरमच्या सुटींत हा परिषदेचा योग येईल. आणि हल्लीं राजकीय चळवळीला जें सुंदर वळण स्वराज्य संघाच्या द्वारानें येत चाललें आहे तें चांगल्या दृश्य स्वरूपाला येऊन पोंचेल व स्वराज्याच्या कल्पनेचा चांगला उदय होऊन लोक कल्याणाच्या कामांना लौकरच निराळी दिशा लागेल असें प्रस्तुतच्या धुरीण मंडळीच्या आकांक्षा निरनिराळ्या शद्बानें लोकांस प्रवर्तवीत आहेत ही आनंदाची गोष्ट होय.

## कागदाचा कारखाना.

### ( कापसाच्या पळकाड्यांचा उपयोग )

एलिचपूरचे सार्वजनिक गृहस्थ रावसाहेब गणेश नागेश सहस्त्रबुद्धे यांनीं कापसाच्या काड्यांचा उपयोग कागद तयार करण्याकडे कितपत होईल या बद्दलचा पुष्कळसा शोध चालविला आहे. आणि त्यांच्या शोधक उद्योगाला चांगलें यश येईल असें दिसतें. या संबंधांत डायरेक्टर ऑफ अग्रिकलचरल व तसेच नागपूरचे अग्रिकलचरल केमिस्ट यांच्याशीं झालेला पत्रव्यवहार ही त्यांनीं आह्माकडे धाडला आहे. इतकेंच नाहीं तर हिरव्या कापूस काड्या पासून तयार केलेल्या कागदाचा एक नमुना ही त्यांनीं पाठविला आहे. जुन्या दौलताबादी कागदा इतका हा जाड नसून पातळ व चिवट आहे. आणि प्रस्तुतच्या युद्धामुळें कागदाची जी टंचाई पडली आहे ती दूर करण्याला रावसाहेब सहस्त्रबुद्धे यांच्या प्रयत्नाला जर सरकारी आश्रयाची उठावणी मिळेल तर आह्मांस विशेष आनंद होईल. थोड्या वर्षांपूर्वीं आगकाड्यांचा कारखाना काढण्याचा पहिला प्रयत्न एलिचपूरचे वकील रा० पेंडसे यांनीं केला होता; पण भांडवलाच्या कमतरतेमुळें तो यत्न फसला. तथापी हें खरें आहे कीं— व ही अभिनंदनाची गोष्ट आहे— एलिचपूरच्या त्या जुन्या राजेशाहीच्या वातावरणांत स्वदेशी कारखाना काढण्याचें डोकें विशेष जोरदार आहे.

## जिल्ह्याचें ठिकाण

### ( बुलढाणा कीं खामगांव )

पूर्वीं अव्वल इंग्रजीच्या वेळीं जेव्हां वऱ्हाडचे ६ जिल्हे निश्चित करण्यांत आले तेव्हां बुलढाणा हें जिल्ह्याचें सदर स्टेशन करण्यांत आलें लोकांच्या सोईच्या मानानें पाहतां हें जिल्ह्याचें ठिकाण अगदीं अस्थानीं आहे. बुलढाणा हें हवेचें सॅनिटेरियम ह्मणून जर सरकारनें निराळें ठेविलें तर त्यापासून लोकांचा फायदा अधिक होईल आणि हवाशीर सुंदर स्थळ या दृष्टीनें त्याचा महिमा ही अधिक वाढण्यासारखा आहे. जसें चिखलदरा उत्तम हवाशीर स्थळ आहे तसें त्याच्या खालोखाल बुलढाणा हें एक स्थळ होय. पण राज्यकारभाराच्या व लोकांच्या व्यवहाराच्या उपयुक्ततेच्या दृष्टीनें पाहतां बुलढाण्याची निवड अगदीं चुकीनें केली गेली आहे. सरकार दरबार, न्याय कोर्टें, पोलीसखातें इत्यादि जीं सार्वजनीक खातीं आहेत , या सर्वांचें केंद्र बुलढाण्यास असल्यामुळें लोकांच्या पैशांचा व कालाचा अपव्यय फार होतो. आणि जेव्हां खामगांवाला हायस्कूल बुलढाणा जिल्ह्यांकरितां ह्मणून स्थापन केलें तेव्हांच ही गोष्ट सरकारनें कबूल केलेली आहे. आतां बुलढाण्याची सर्वच ऑफीसें खामगांवला आणून लोकांच्या सोयी पाहण्याचा हा काल खचित सरकारच्या दृष्टीआड होतां कामा नये वऱ्हाडच्या जिल्ह्यांची पुनर्घटना होणार असल्याविषयीं पुष्कळदां गोष्टी निघतात. आणि लढाईची स्थीर स्थावरता झाल्यानंतर जेव्हां हा प्रश्न सरकार हातीं घेतील तेव्हां बुलढाणा जिल्हा सोडून तेथें दुसऱ्या एखाद्या गांवाच्या नांवानें नवीन जिल्हा होईल अशी आह्मांस उमेद आहे. आणि स्थानिक कायदे कौंसिलांतही या संबंधानें पूर्व चर्चा होईल तर लोकांना योग्य त्या सूचना सरकारापुढें मांडण्यास चांगली संधी मिळेल.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**— उत्तरा नक्षत्राच्या चतुर्थ चरणांत पर्जन्याची झड व चिर चिर यांनीं गेली अमावास्या संपेपर्यंत अगदीं जर्जर करून सोडलें. पण त्यानंतर उज्वल सूर्यदर्शनें, रुक्ष हवा व विद्युन्मय नील आकाश यांनीं नवीन जीवनरस मिळून पुन्हा आनंदाचें साम्राज्य स्थापिलें आहे. मंदावेलेलीं व खुरटलेलीं पिकें पुन्हा जोमांत येतील अशी त्यांच्या चलनक्रियेची गोडबोली ऐकू येते.

रावबहादुर विनायक मोरेश्वर केळकर डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन्स जज्ज हे कोर्टाच्या वार्षिक तपासणीसाठीं वाशीमाकडे गेले आहेत. हे १९ नोव्हेंबर नंतर पेनशनीवर जाणार ह्मणून त्यांचे गुणानुवाद लोकांच्या तोंडून अधिक ऐकू येतात. हें आपल्या पराक्रमावर इतक्या मोठ्या हुद्यावर चढले आहेत असें ह्मणण्यापेक्षां त्यांच्या कर्तबगारीनें हिंदी लोकांची पात्रता अधिक ठरत असून उच्च दर्जाच्या चाकरीमध्यें जो नेटिवांना मज्जाव आहे तो काढून टाकण्याचें प्रत्यक्ष उदाहरण यांच्या चारित्र्यप्रभावानें लोकांपुढें मांडलेलें आहे.

**सेशन खटले**—आडगांवचे सावकार रा. रा. सूरजमल गंगाराम यांनीं एका दिवाणी दाव्यांत कोर्ट मार्फत शेतीचा ताबा घेतला होता; पण त्यांच्या माणसाच्या वहितीला मूळच्या कबजेदारांनीं इतका प्रतिबंध केला कीं मारामारीवर प्रसंग आला आणि पुंडलीक नांवाचा एक कबजेदार वर्मीं मार लागून गेल्या पावसाळ्याच्या तोंडीं प्राणास मुकला. या संबंधानें खुनी सेशन मुकदमा चालूं होता. त्यांत सर्व आरोपी दोषमुक्त ठरले. आणि आरोपी तर्फें रा. डिल[illegible] दस्तूर, होसाळी, दाते व बापट इत[illegible] वकील मंडळी काम करीत होती. सरका[illegible]रांतून ताबा मिळाल्यावर त्यालाही धाब्याव[illegible] बसविणाऱ्या टोळगोळ्यांनीं या मुकदम्यापासू[illegible] योग्य तो धडा शिकावा. व साहुकारांनीं[illegible] रुधिरप्रदिग्ध भूमितृष्णेला थोडासा आळ[illegible] घालण्यास विसरूं नये ह्मणजे पुष्कळ[illegible] अतिप्रसंग टळतील.

२ वाशीमच्या म्युनिसिपालिटीचे सेक्रेट[illegible] राजश्री नारायणराव यांच्या मॅट्रिक्युलेशनच्[illegible] वर्गांतील मुलावर बायकोचा खून केल[illegible] संबंधानें आरोप होता, पण त्यांतही सरका[illegible] पुराव्यानें खून शाबित झाला नाहीं. आरोपी निर्दोषी ठरला. या आनंदाच्[illegible] पर्यवसानानें राजश्री नारायणराव यांचा उर्वरि[illegible] काल सुखांत जावो असें आह्मीं इच्छितों.

**वाघ**— बार्शिटाकळी ( ता. आकोला )च्[illegible] आसपास बरेच दिवसापासून एक वाघा[illegible] जोडी वावरत आहे. सरकारी अधिका[illegible] व शिकारी लोक त्यांचे हननाची व्यवस्[illegible] करतील तर लोकांची धास्ती दूर होईल.

**स्थानिक कायदे कौंसिल**— पुढ[illegible] कायदे कौंसिलची सभा तारीख १३ नोवें[illegible] रोजीं ११ वाजतां कौंसिल चेंबरम[illegible] भरविण्यांत येईल.


## NOTICE

Notice is hereby given that t[illegible] Chief Commissioner has, owing to th[illegible] prevalence of Cholera in the Buld[illegible] District, prohibited the holding of t[illegible] annual Fair at Deolgaon Raja whi[illegible] should have commenced on the 6[illegible] October next and that all perso[illegible] seeking to attend the Fair will [illegible] turned back.

Dated Buldana
26th September 1916 } Sd/ R. A. Wils[illegible]
Deputy Commission[illegible]
Buldana Distr[illegible]

N. N. 351

## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**— उत्तम पाने[illegible] टिकाऊ पक्का रंग किंमत ॥।, १, १॥, २, २॥ ते ९ रु. प. **बुद्धीबळ ज[illegible] लांकडी**— किंमत ॥। १, १॥, २[illegible] ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ॥, ॥।, १, १॥, रु. प. **खडावा जो[illegible]** शिसवी व शिवणीचे वगैरे सा[illegible] वाऊक व किरकोळ आमचेकडे वि[illegible] मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. अळवणी, स्टेट सावंतवा[illegible]
नो. नं. ३४९

# विक्रीसतयार

मी खालीं सही करणार सर्वत्र लो[illegible] जाहीर करितो कीं, माझे मालकीचें [illegible] दोन मजली शहरांत अगर वेसी जवळ [illegible] व्यंकटराव देसाई वकील यांचे घराजवळ [illegible] तें घर विकावयाचे आहे. ज्यांना गरज अ[illegible] त्यांनीं खालील पत्यावर येऊन भेटावें.

पत्ता—
सुभानखां वा॥ उसमानखां रा. आ[illegible]
अगर वेस

नों० नं० ३४४

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविता जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असत मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नो. नं १ — Lyon Scott एजंट

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १४८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनळी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd Dadar Bombay.
N. N. 3

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे मुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशी, जोड, गुजवाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुद अम्रफुलें सार्‍यी व धागन्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

---

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेली, लंगोटि, छा छुं करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्रमहोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुगाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचें वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानांग कला, आत्मवियामेस्मेरिझम प्रयोग विधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरेखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

अपूर्व ग्रंथ ! **मराठी भाषेंत** अपूर्व ग्रंथ

**आजपर्यंत मराठी भाषेंत प्रसिद्ध न झालेला अपूर्व ग्रंथ.**

# वशीकरण विद्या.

अर्थात दत्तात्रय तंत्र हा ग्रंथ दत्तात्रय व शंकर यांचा संवादरूपी असून दत्तात्रयांनीं प्रश्न केल्यावरून शंकरानीं कलीयुगांत त्वरित सिद्धी देणारे प्रयोग सांगितले आहेत. ते मारण, मोहन, स्तंभन, विद्वेशण, वशीकरण, स्त्रीवशीकरण, आकर्षण इंद्रजाल, यक्षिणीसाधन, रसायन विद्या, कालज्ञान, अनाहार, आहार, निधी दर्शन, वंध्यापुत्रवती करण, वाजी करण, भूतग्रहनिवारण, सिंह व्याघ्र निवारण इत्यादी अनेक प्रयोग सांगितले आहेत. किं. ४८ आणे ट. ख. ३

पुस्तकें मागविण्याचा पत्ता.

ब्रँच आफीस उंबरगांव जि ठाणें — पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी. हारिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भाशय मुरकलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टिमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतीचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नमून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३१ गो० १ रु० ७१ गो० २ रु० १६१ गो० ४ रु० २७१ गो० ६ रु० ५९० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्राची लाली, सकाचें, पुयस्त्राव, रक्तस्त्राव इत्यादि **विकार** पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १॥ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नमून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें अ याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुंगधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी. — कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
ना० नं० २०


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख ९ माहे आक्टोबर सन १९१६ ई० [ अंक ४०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने,

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३ ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं ल्हान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सह्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥. कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः- मगनलाल के. आणि कंपनी,
गिरगांव मुंबई.

---

वाचा आणि मित्र मंडळीला दाखवा.

### सुबोधमाला.

सद्यःस्थितीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.

आपलेपणाची खरी ओळख पटविणाऱ्या बोधपर गोष्टी. नामांकित लेखकांचे विचारपरिप्लुत निबंध अनुकरणीय चरित्रें, हृदयंगम कविता, चालू कादंबरी, अकलेचे हिशोब व कूटप्रश्न वगैरेनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६ वार्षिक वर्गणी ट. ख. सह १॥≈

**मालेच्या वर्गणीदारांस बक्षिसें.**

वार्षिक परिक्षेंत पास क[illegible]णाऱ्या कोणत्याही इयत्तेंतील विद्यार्थी वर्गणीदारांस दरसाल बक्षिस रुपये ५०० नाहीं

अकलेचे हिशोब किंवा त्या प्रश्न सोडविणाऱ्या वर्गणीदारास दरमहा संस्थान रुपया १

या संबंधाची तपशीलवार माहिती माहे मे १९१६ च्या अंकांत यांतून श्री एल. नें [illegible]

आर. बावडेकर हे आकोल्याचे एजंट आहेत. गांवोगांवीं एजंट पाहिजेत- कमीशन भरपूर देऊं.

के. बी. देशमुख
संपादक-सुबोधमाला
उमरावती.

नो० नं० ३१८

---

### खात्रीचा तयार केलेला.

**ताजा अनंत मूळ.**

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं ६

---

### अस्सल अंगुरी.

## हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १८३ आणि १८७ तो. खालिस कस्तुरी रु२५ तो. शुद्ध शिलाजीत ८९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

---

### चांदीचीं भांडीं.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

---

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, पावत भरण्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---

दिवाळीकरिता सुगंधी मालाची प्रचंड लूट. !!

# आर्यवनौषधालय—मुर्डी.

स्वदेशी दिपावली. ॐ नमः श्रीगणेशाय. दिवाळी. स्वदेशी.

सावध रहा. फसूं नका.

## अति उंची सुगंधि अत्तरांच्या पेट्या.

प्रत्येक पेटीची किंमत पो. ख. सह (१८१०)

या पेट्या उत्तम सागाच्या लांकडाच्या मजबूत तयार करून त्यावर उत्तम पॉलिश केलेलें आहे. यामुळें पेटी विशेष मनोहर बनली आहे. या पेटींत गुलाब, हिना, वाळा, केवडा इत्यादी अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, उंची बेलिया बाटली एक, सुगंधी उटणें, गंधाचे रवे, स्त्रियांकरितां लालभडक कुंकू व हळद, असे एकंदर सुगंधि अकरा पदार्थ ठेविले आहेत. पेटींतील सर्व सुगंधि माल फार उत्तम ठेविला असून, तो सर्वांना घेण्यास जबर वाटूं नये म्हणून आम्ही आपला कोणत्याहि तऱ्हेचा फायदा ठेविला नसून प्रत्येक पेटीची किंमत पो. ख. सह अवघी १८१० ठेविली आहे. वरील वर्णनावरून पेटीची किंमत किती अल्प ठेविली आहे, हें पेटींतील सर्व सुगंधि माल लक्ष्यपूर्वक पाहिल्यास सहज कळून येईल. या पेट्या आम्ही अगदीं अल्प किंमतीला देत असल्यानें त्यांचा अतिशय खप होणें अगदा साहजिक आहे. यामुळें आमच्याशीं स्पर्धा करण्याकरितां इकडे कांहीं ठिकाणीं याहूनहि स्वस्त सवंग सवयाच्या भिकार मालांनीं भरलेल्या पेट्या निघालेल्या आहेत. करितां मोहक वर्णनाला न भुलतां खऱ्या उत्तम पेट्या आमच्याशिवाय इतरत्र मिळत नाहींत हें अवश्य लक्ष्यांत ठेवून सर्वांनीं याच पेट्या उपयोगांत आणाव्या. इतकेंच आग्रहपूर्वक सांगणें आहे.

## उंची बादशाही अत्तरांच्या पेट्या.

पेटीची किंमत पो. ख. सह तीन रुपये.

ही पेटी सागाच्या लांकडाची फारच सुबक बनवून वर सुरेख पॉलिश केलें आहे. या पेटींत सुरंगी, मालती, राजविलास, इत्यादि बादशाही अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, बादशाही केशसौगंधिनी तेल बाटली एक, उटणें, गंधाचे रवे व स्त्रियांकरितां कुंकू, हळद व काजळ असे एकंदर बारा बादशाही सुगंधि पदार्थ ठेविले आहेत. इतकें असूनही या पेटीची किंमत अगदीं अल्प पो. ख. सह ३ तीन रुपये ठेविला आहे. पेटींतिल प्रत्येक मालाचे निरीक्षण केल्यास आम्ही ही ठेविलेली किंमत फारच अल्प ठरले. तरी सर्वांनीं पेट्यांचा अवश्य उपयोग करावा. पेटींतिल सर्व माल अति उंची असाच वापरला आहे. पाहिल्यावर सहज खात्री होईल.

**बादशाही अत्तरें**—सुरंगी, मालति, पुष्पराज, गंधराज, लक्ष्मिविलास, मदनविलास हीं प्रत्येकीं दर तोळ्यास ३ रुपये.

**सुगंधि अत्तरें**—गुलाब, हिना, केवडा, अंबर, मोतिया, बकुल वगैरे दर तोळ्यास १ रु.

**जीवनपुरी तेलें**—बेलिया, चमेली, हिना मसाला दर १० तोळ्यांस १ रुपया.

**विशेष सूचना**—वरील अत्तरांच्या पेट्या एकदम चार घेणारास एक पेटी, सात घेणारास दोन पेट्या, बारा घेणारास चार पेट्या, कामिशन दाखल फुकट देऊं. तरी एकदम गटानें पेट्या मागवून आपला फायदा करून घ्यावा. अत्तर पाव तोळ्याचे आंत मिळणार नाहीं. कित्येक आपला बनावट माल दुसऱ्याची निंदा करून खपाविण्याची प्रयत्न करीत आहेत. तथापि आमचा माल खरा उत्तम असल्यानें, तो खपविण्यास आम्हांस विशेष स्तुति किंवा दुसऱ्याची निंदा करण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण खऱ्यामालाचें सर्वत्र चहाते असावयाचेच. सबब दिवाळीचे सणास लागणारा सर्व माल आमचे कडूनच मागवावा. सर्व माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य मुर्डी
पोष्ट हर्णे जि० रत्नागिरी

नो. नं. ३५०

## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**— उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ·॥।·, १, १।, १॥, २, २॥ ते ५ रु. प. **बुद्धीवळ जोड लांकडी**— किंमत ·॥।· १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगठ्या जोड**— किंमत ·।·, ·॥·, ·॥।·, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान घाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

**डी. आर. अळवणी, स्टेट सावंतवाडी**
नो. नं. ३४९

# विक्रीस तयार.

मी खालीं सही करणार सर्वत्र लोकांस जाहीर करितो कीं, माझे मालकीचें घर दोन मजली शहरांत अगर वेसी जवळ रा० व्यंकटराव देसाई वकील यांचे घराजवळ आहे. तें घर विकावयाचे आहे. ज्यांना गरज असेल त्यांनीं खालील पत्यावर येऊन भेटावें.

पत्ता—
सुभानखां वा॥ उसमानखां रा. आकोला
अगर वेस
नो० नं० ३४४

## जाहीरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं, आमचे आकोला येथें कोर्टाचे कामाकरितां नेमलेले मुकत्यार जगन्नाथ गोपाळ फडके हे यापुढें आमचे मुकत्यार नसून ते आमचे नोकरींत नाहींत. त्यांस दिलेलें मुखत्यारपत्र आह्मी परत घेतलें आहे. तरी यापुढें यांच्याशीं आमचे मुखत्यार ह्मणून आमचे करितां कोणत्याही प्रकारचा देण्या घेण्याचा यवहार करूं नये. केल्यास त्याजबद्दल आह्मी जबाबदार नाहीं. कळावें ता. ३ आक्टोबर सन १९१६

सही
बाबन मेसाजी पाटील द. खुद
नो. नं. ३५२

## नोटीस

रा. रा. पंढरी वा॥ महादु कुणबी डांबरे राहणार नायगांव पोष्ट नांदूरा ता. मलकापूर जि. बुलढाणा

यांसः—

मी खालीं सही करणार नोटिस देते सीजे कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे आहां. लग्न होण्यास सुमारें १८।२० वीस वर्षें झालीं. लग्न झाल्यावर मी तुमचे येथें ९ वर्षें राहिले. नंतर तुह्मी मला विनाकारण बेरहाण करून माझे बापाचे घरीं आणून घातले त्या गोष्टीस आज सुमारें १२ वर्षें झालीं. तेव्हां पासून मी माझे बापाचेच घरीं आहे. माझा बाप गरीब असल्या कारणानें मला लोकांचे कर्ज काढावें लागले. तें कर्ज रुपये ३०० तिनशे कर्ज झालें आहे. हल्लीं तां मला कोणी कर्ज वगैरे देत नाहीं. तरी आठ दिवसाचे आंत तुह्मी हे रुपये देऊन मला घेऊन जावे. जर तुह्मी आठ दिवसाचे आंत कांहीं सोय न केल्यास मी हीच नोटिस फारकत समजून दुसरा घरठाव करीन. मग तुमचा माझेवर अगर मी ज्याचेशीं गंधर्व लावीन त्याचेवर कोणतेच तऱ्हेची तक्रार चालणार नाहीं. कळावें ही नोटिस ता. २८-९-१९१६ इ.

सही
भिमा मर्द पंढरी कुणबी डांबरे रा. सावरपाटी पो. उरळ बु॥ ता. बाळापूर
नि. खुद आंगठा
नो० नं० ३५३

## जाहीर नोटीस

मी खालीं सही करणारणि सर्वत्र लोकांस या जाहीर नोटिशीनें कळवितें कीं ता. २९-९-१९१६ रोज शुक्रवारीं मी ( बजी मर्द कर्णा महार रा. महमदपूर ता. मलकापूर जि. बुलडाणा ) मन्या वा॥ येडु महार रा. महमदपूर व तानी मर्द मन्या महार या उभयतांचा धाकटा मुलगा जैराम यांस दत्तक घेतलें व त्याचें नांव धर्मा असें ठेविलें आहे. ता. ३-१०-१९१६ इसवी दस्तुर मारुती गणपत सातव मु. नांदूरा

सही
बजी मर्द कर्णा महार रा. महमदपूर ता. मलकापूर नि. खु. आंगठा
नो. नं. ३५४

## नोटीस

(१) उकर्डा वल्लद येबाजी धनगर आणि (२) मुलई मर्द मनाजी धनगर राहणार सिरसोली ता. आकोट

यांनः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मनाजी वा॥ गणाजी हा जीवंत असतांना त्याच्या जवळ पूर्वीचा ऋणानुबंध लक्ष्यांत आणून ४७५ रुपये ता. १३-६-१९१६ रोजीं अनामत ठेविले आहेत. त्याशिवाय माझ्या बकऱ्या १४ त्याच्या जवळ शिल्लक राहिल्या आहेत आणि त्याच्या पेवांत ठेवलेल्या जवारी पैकीं २७॥ मण (दोन शेरी मापाची) त्याच्याकडे शिल्लक आहे. मला कडदोरा करण्यासाठीं मी गुंडवाळ्याचा जोड १ तोळे वजन ३२ चा नग त्याच्या हवाली केला होता. येणें प्रमाणें नगदी रक्कम, शेळ्या, जवारी, व गुंडवाळ्याचा जोड अशा वस्तु माझ्या मला परत कराव्या. ही गोष्ट करण्याला आठ दिवसाची मुदत दिली आहे. वर प्रमाणें न वागल्यास मला कोर्टात फिर्याद करावी लगेल. आणि या नोटिशीच्या खर्चा सुद्धां सर्व नुकसानी तुह्मा कडून भरून घेतली जाईल. लोभांत अंतर पडूं नये ह्मणून ही जाहीर विंनती केली आहे. ता. ३ आक्टोबर १९१६ इसवी

सही
नागो संपत मराठे पाटील राहणार शिरसोली द. खुद
नो. नं. ३५५

## नोटीस

मेहरबान १ वाल्दिा साहेबां लालबी मर्द महमद आश्रफ २ रहीम वा॥ महमद आश्रफ ३ जिलानी वा॥ महमद आश्रफ ४ गालीफ वा॥ महमद आश्रफ सर्व जण राहणार बिस्वाचांदूर ता० मलकापूर

यांसः—

खालीं सही करणार याजकडून जाहीर नोटीशीनें कळविण्यात येते कीं शेख बिसमिल्ला वल्द महमद आश्रफ हा १९ जुलै १९०० रोजीं जन्मला असून कायद्यानें अज्ञान आहे. मे. वालीदसाहेब महमद आश्रफ हे ता. १४-५-१९०७ रोजीं मरण पावल्यादिवसा पासून त्यांच्या जिनगींतील अज्ञानाचा हिस्सा अद्याप मिळालेला नाहीं. बिसमिल्ला कडून तारीख २६-२-१९१६ रोजीं करून घेतलेलें वाटणीपत्र तसेंच २९-७-१६ रोजीं त्याच्याकडून करून घेतलेलें खरेदीखत व दुसरीं घरासंबंधीं खरेदीखतें हीं सर्व कायद्यानें रद्द आहेत. आणि त्या कागदावरून अज्ञानाच्या हिशाला कांहींच हरकत पोंचत नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याचा हिस्सा तुह्माकडून योग्य प्रकारें मिळाला पाहिजे. हा हिस्सा चार पंचासमक्ष देण्यासाठीं तुह्माला ८ आठ दिवसांची मुदत दिली आहे. हा हिस्सा जर खानगी रीतीनें न मिळेल तर दिवाणींत त्या संबंधानें दावा करावा लगेल आणि महमद आश्रफ साहेब वारल्यापासून जी कांहीं तुह्मी कर्जे केलीं असतील, त्यांचा बोजा अज्ञानाचे हिश्यावर पडणार नाहीं. कर्ज काढण्याचें कधींच प्रयोजन नव्हतें आणि त्याचा फायदा अज्ञानाला मिळालेला नाहीं. आणि आजपर्यंतच्या तुमच्या कारभाराचाही योग्य हिशेब तुह्मी चार पंचासमक्ष समजाऊन द्यावा. ह्मणजे अज्ञानाचा हिस्सा मुक्रर करण्याला ठीक पडेल. जर तुह्मी वडीलाची जिनगी कोणाला विकली असेल तर तीही विक्री अज्ञानाच्या हिश्यासंबधानें रद्द अहे कळावें ता० ३०-९-१६ इ.

सही
शेख बिसमिल्ला वा॥ महमदआश्रफ
अ. पा. करणार जेष्ठ बंधु
शेख अबदुल्ला वा॥ महमद
आश्रफ राहणार बिस्वा-
चांदूर द० खु०
नो. नं. ३५६

## जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं शेख बिसमिल्ला वा॥ महमद आश्रफ हा अज्ञान असून त्याच्या कडून शेख जीलानी वा॥ महमद आश्रफ यानें शेतीवाडी खरीदी घेतली आहे आणि तो ती शेती आतां दुसऱ्यास विकण्याच्या इरादांत आहे. तर अशा बेकायदेशीर व्यवहानें कोणीं फसूं नये व व्यर्थ भानगड करू नये ह्मणून मुद्दाम हा जाहीर नोटीस दिली आहे. या उपर जर कोणी व्यवहार करील तर ज्यांचा तो जबाबदार राहील व त्याचा बोजा अज्ञानाचे हिश्यावर राहणार नाहीं. कळावे तारीख ३०-९-१६ इ.

सही
शेख बिसमिल्ला वा॥ महमद आ-
श्रफ अ. पा. क. जेष्ठ बंधु
शेख अबदुल्ला वा॥ महमद
आश्रफ राहणार बिस्वा
चांदूर दस्तूर खुद
नो नं. ३५७

## नोटीस

रा. रा. महबूबखां वा॥ ऐनखां मुसलमान रा० वसाडी बु॥ ता॥ खामगांव

यांसः—

या नोटीशीने कळविण्यांत येते कीं मी तुह्मास तंट्या करितां तारीख ३०-८-१६ रोजीं कुलमुखत्यारपत्र नोंदून दिलें होते. तें काम तुमचे कडून न झाल्यानें माझी कामें बिघडलीं व शिवाय तुमचे लक्ष माझे नुकसानीकडे आहे असें दिसून आलें. सबब तुमचे ते वरील मुखत्यारपत्र मी या नोटीशीनें रद्द करित आहे. व तुह्मी या पुढे माझे नांवावर कोणतेच प्रकारचा व्यवहार करूं नये केल्यास त्याची जबाबदारी तुमचे कडे राहील. तसेंच तुमचे जवळ असलेले माझे स्वतःचे शेती संबंधी कागदपत्रें व दागीने तुमचे जवळ धरवर ठेवलेले आहेत. ते तुह्मी परमेश्वराला स्मरून नोटीस पाव, त्यापासून १५ दिवसांत परत करावे. नाहीं पेक्षां त्या संबंधी योग्य तजवीज करावी लागेल. कळावे ता. २-१०-१६

सही
नूरबी मर्द बाजिदखां मुसलमान
राहणार वसाडी बु॥ निशानी
आंगठा खुद
नो नं. ३५८

## नोटीस

नोटीस बेशमी सयदलाल वा॥ सयद फजल मुसलमान रा० मोमिनपुरा मसजिद जवळ ताजनापेठ आकोला

यांसः—

खालीं सही करणार नोटीस देते कीं तुमचा माझा निका ८-७-१९०९ रोजीं लागला असून तो लागण्यापूर्वी तुह्मी करारनामा पंचा समक्ष लिहून दिला आहे. त्यांत एक शर्त अशी आहे कीं मी जर पहिल्या बायकोस वागवीन ( ही पाहिली बायको त्यावेळीं नांदत नव्हती ) तर तुला फारकती देईन. त्यावर मी तुह्मापाशीं ३ वर्षे नांदले. पुढें तुह्मी दुसऱ्या लग्नाच्या बायकोस आणून मला हाणून दिलें. त्याला ४ वर्षे सुमारें झालीं. आतां वरील करारान्वयें तुह्मापाशीं फारकती मागितली असतां तुह्मी देत नाहीं. तरी तुह्मास या नोटीशीनें कळविते कीं ही नोटीस पावतांच ८ दिवसांत तुह्मी दुसऱ्या बायकोस फारकती देऊन मला खावटीबद्दल लागलेले कर्ज ४ वर्षांचे ३०० तीनशे रुपये माझे बापास देऊन मला घेऊन जावे. असें मुदतीत न केल्यास तुमच्या करारनाम्याप्रमाणें मला फारकती द्यावी. वरील मुदती नंतर तुमचे कडून तसें कांहीं न घडल्यास हीच नोटीस फारकती समजून मी जातीव्यवहाराप्रमाणें दुसरा निका करीन. मग तुमचा मजवर अगर माझ्याशीं निका लावणारावर कोणतांच हक्क स- चालणार नाहीं. कळावें ता. २-१०-१६ नेवूल

ह्मणून सही
अविचा- मर्द सयदलाल मु॥
रा या चांदूर तालुका आकोला.
हिचे पडितः तां बाप अमिनाखां वा॥
कय होत कीदार याचा आंगठा खुद
नो. २

वऱ्हाडसमाचार

मित्ति आश्विन शुद्ध १३ शके १८३८

## बडोद्याची गोरी व काळी बाजू.

बडोदें संस्थान निदान उत्तर हिंदुस्थानांतल्या देशी संस्थानांत तरी प्रगतीच्या संबंधानें अग्रगण्य आहे असा लोकांचा समज आहे. तेथील अधिपती श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड हे देशाटन, विद्वानांचा सहवास, व स्वतःचें निरीक्षण करून आपल्या संस्थानांत नव्या नव्या सुधारणा कशा करतां येतील या गोष्टीचा अहर्निश विचार करणारे आहेत. सक्तीचें शिक्षण सुरू करणें, स्त्रियांसाठीं हायस्कूल काढणें, पुरोहितांची परीक्षा, ग्रामपंचायतींची स्थापना, सेंट्रल लायब्ररी व फिरत्या लायब्ऱ्या यांच्याद्वारें लोकांत शिक्षणाचा प्रसार, भिन्न भिन्न विषयांवरील ग्रंथप्रकाशन, बालविवाहप्रातिबंधक कायदा वगैरे गोष्टी हिंदुस्थानांत प्रथम प्रचारांत आणण्याचें श्रेय निःसंशय महाराजांनीं घेतलें आहे, व त्यांबद्दल त्यांची सर्वत्र तारीफ होत आहे. वरवर पाहणारांचे डोळे या भपक्यानें दिपून जाणें अगदीं स्वाभाविक आहे. पण बारकाईनें पाहणारास बडोदें हें आदर्श - संस्थान आहे असेंच दिसून येईल असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. एका व्यक्तीच्या हातांत अधिकाराचीं सगळीं सूत्रें रहण्याची प्रवृत्ति तेथें कमी दिसत नाहीं. राजवाड्याकडे होणाऱ्या खर्चाचें प्रमाण फार मोठें आहे. आपल्या राज्यांत राहून प्रजेबरोबर सुखदुःखाचे वाटेकरी होणें हें जें राजाचें कर्तव्य त्याची पूर्ण जाणीव अद्याप ही महाराजांचे ठायीं दिसून येत नाहीं. आज मद्रासेकडे तर उद्या दार्जीलिंगकडे आणि परवा काश्मीरांत असे दूरदूरचे व दीर्घकाळ व्यापी प्रवास करण्यांत महाराजांनीं हात आखडलेला नाहीं. या प्रवासाला लागणाऱ्या प्रचंड द्रव्यानें रयतेच्या सुखाच्या शेकडो गोष्टी करतां येतील, पण महाराजांचें लक्ष तिकडे अद्याप जात नाहीं. संस्थानांत शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होत आहे ही गोष्ट खरी आहे. पण हें शिक्षण बहुतेक पुस्तकी आहे, अर्थोपार्जनाचें नाहीं. संस्थानांत शेतकी, उद्योग, व्यापार, कला वगैरे अर्थोत्पादक गोष्टींची अभिवृद्धि करण्याकडे महाराजांचें लक्ष असावें तसें दिसत नाहीं. पुस्तकी विद्येचा प्रसार, समाजसुधारणा, ब्राह्मणांचें बंड मोडण्याचे उपायांची योजना, पाश्चात्य चालीरीतींचा प्रचार, वगैरे गोष्टी करण्यांतच महाराजांचा बहुतेक काळ जातो असें दिसतें. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर शेतसुधारणेचें पाऊल पुढें पडलेलें नाहीं. नांव घेण्यासारखा एक ही उद्योग धंदा त्या संस्थानांत भरभराटलेला नाहीं. त्या संस्थानांतल्या मजुरांना पोट भरण्यासाठीं जवळ अमदाबाद सारख्या ठिकाणीं गिरण्यांतून जावें लागतें. बडोदें संस्थान आरोग्याचें बाबतींत इतर संस्थानाहून श्रेष्ठ प्रतीचें आहे असें ह्मणण्यास यत्किंचित् ही आधार नाहीं. स्थानिक स्वराज्याला फाटे फोडून पंचाईती, लोकल बोर्डें वगैरे संस्था काढण्यांत आल्या आहेत, पण या संस्थांजवळ द्रव्यबळ नाहीं अशी ओरड आहे. द्रव्याचे अभावीं या संस्था काय कामें करणार तें दिसतेंच आहे. बडोदें संस्थानांतून बाहेर जाणाऱ्या कच्च्या मालाला आळा बसलेला नाहीं. त्या संस्थानांतून कापसासारखा कच्चा माल बाहेर कां जावा? अमदाबादेसारख्या गिरण्या बडोदें संस्थानांत कां उभारल्या जाऊं नयेत तें कळत नाहीं. सारांश, बडोदें संस्थान शिक्षणप्रसाराचे किंवा सामाजिक सुधारणेच्या बाबतींत जरी सर्वांच्या पुढें असलें तरी शेतकी, व्यापार, कला, आरोग्य, वगैरे बाकीच्या सर्व बाबतींत तें इतर संस्थानांच्या बरोबरीलाच आहे. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे आधुनिक शिक्षण पद्धतीनें आमचे तरुण जसे अर्थोपार्जनाचे किंवा व्यवहाराचे कामीं निरुपयोगी ठरतात, केवळ तात्विक विचारांत त्यांचें पांडित्य पाहून घ्यावें. तशी स्थिति बडोदें संस्थानाची झालेली दिसते. श्रीमंत सयाजीराव महाराज विचारी आहेत, पाश्चात्य राष्ट्रांत उद्योगधंदे कसे भरभराटले आहेत तें त्यांनीं अनेक वेळां पाहिलें आहे; त्यांचें अनुकरण इकडे करून आपल्या संस्थानाची औद्योगिक उन्नति करण्याची सध्याचे काळीं किती अवश्यकता आहे हें ही त्यांना दिसत आहे, असें असतां त्यांचे हातून या बाबतींत विशेष कांहीं प्रयत्न होऊं नयेत हें आश्चर्य आहे. पुस्तकी विद्या, तात्विक उन्नत विचार, आणि सुधारलेल्या राज्यपद्धतीची नुसती मानासिक मीमांसा यांनीं श्रेष्ठपणा मिळविण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. त्या उन्नत विचारांना जोंपर्यंत दृश्य स्वरूप मिळालें नाहीं, व भुकेल्या प्रजेच्या पोटापाण्याची व्यवस्था अगोदर नीट लागलेली नाहीं, तोंपर्यंत शुष्क तत्त्वज्ञानाला कोणी विचारणार नाहीं. बडोदें संस्थानच्या काळ्या गोऱ्या बाजूंचा जो विचार आह्मी येथपर्यंत केला आहे तो अगदीं निरपेक्ष आणि निःपक्षपात दृष्टीनेंच केला आहे. त्यावरून त्या संस्थानाविषयीं झालेला आमचा ग्रह पालटण्यासारखी सुस्थिति पुढचे वर्षाचे रिपोर्टांत वाचण्यास आह्मांस मिळेल तर आह्मी श्रीमंत महाराजांस शतशः धन्यवाद देऊं.

## रेलवे आणि वर्णभेद.

विशेष जातीसाठीं डबे रिझर्व करण्याचा अधिकार रेलवेला आहे कीं काय या संबंधानें कायदेपंडितांचें ही अद्याप एकमत झालेलें दिसत नाहीं तथापि अशाच एका खटल्यांत मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी म्याजिस्ट्रेटानें दिलेला निकाल तूर्त आधारभूत मानल्यास रेलवे कंपनीला विशिष्ट जातीसाठीं डबा रिझर्व करून ठेवण्याचा अधिकार कायद्यानें दिला आहे असें दिसतें. कायद्यानें एखादी गोष्ट केली तरी नीति आणि युक्ति यांना ती धरून असेलच असें नाहीं, व या दोन आधारांवर कायद्यांत फेरबदल करण्याचा आग्रह रयतेला धरतां येईल. फर्स्ट व सेकंड क्लासच्या डब्यांत विशिष्ट जातीसाठीं विशिष्ट जागा रेलवे कंपन्या राखून ठेवीत नाहीं; फक्त तिसऱ्या क्लासच्या डब्या पुरताच त्या कायद्यानें दिलेला अधिकार बजावूं पाहतात ही विशेष ध्यानांत धरण्यासारखी गोष्ट आहे. तिसऱ्या क्लासच्या डब्यांत जागा मिळविण्यासाठीं शेकडो उतारूंनीं धडपड करावी, मेंढरांसारखे एकमेकांना खेटून बसावें, आणि तेच पलीकडच्या एका खणांत साहेबी टोपी व बूट घालून बसलेल्या एका दोघा उतारूंना त्यांनीं भाड्याचे पैसे तितकेच दिले असतां कंपनीनें त्यांच्यासाठीं सबंध खण राखून ठेवावा, हें न्याय व नीति यांना कितीसें अनुसरून आहे हें कंपन्यांनाच विचारलें पाहिजे. अधिक पैसे देणाराची अधिक सोय करून देणें हें न्यायाचें तत्त्व आहे. पण सारखे पैसे देणारांत ही बूट टोपीला मान ज्यास्ती व पागोट्याला कमी असा भेदाभेद ठेवणें हें एक प्रकारें लबाडीला उत्तेजन देण्यासारखें आहे. कारण, एखादा गोरे वर्णाचा देशी मनुष्य केस ठेविलेले असले, साहेबी पोषाख चढविला, तोंडांत चिरूट धरला, व फार तर वामनराव या नावांबद्दल वेमन रो असें त्यानें नांव धारण केलें, ह्मणजे त्याला या रिझर्व डब्यांत बसण्याला जागा मिळेल. त्याचें कुल व जन्मपत्रिका तर कंपनी पहात नाहीं! ह्मणजे लबाडी करणारास कंपनी उत्तेजन देणार! नीति व युक्ति यांना तरी धरून कंपनीचा हा नियम आहे काय? कायद्यानें जरी कंपनीला रिझर्व करण्याचा अधिकार दिला असला तरी व्यवहारांत तो न्याय, नीति व युक्ति यांना सोडून असल्यामुळें तो फिरविण्याची खटपट देशांतल्या प्रमुख लोकांनीं केली पाहिजे.

## महायुद्धाची प्रगति.

### तहाच्या गोष्टी.

गेल्या एक दोन आठवड्यांत मित्रराष्ट्रांनीं जर्मन शत्रूच्या हातांतलीं अजिंक्य गणिलीं गेलेलीं दोन चार ठिकाणें घेतल्या बरोबर शत्रूचें धाबें दणाणलें, आणि तहाच्या गोष्टी सुरू झाल्या ही एक सांगण्यासारखी गोष्ट आहे. आतांपर्यंत तहाच्या गोष्टी पुष्कळ वेळां निघाल्या आहेत, पण त्या बहुधा जर्मन लोकांनीं मित्रराष्ट्रांच्या फसवणुकीसाठीं त्यांनीं गाफील रहावें ह्मणून, स्वतः किंवा तटस्थ देशांतल्या आपल्या साथीदारांकडून मुद्दाम पसरविलेल्या होत्या. आतांचा प्रकार निराळा आहे आतां खुद्द जर्मनीच्या राजसभेंत, जर्मन पार्लमेंटांत, राजप्रतिनिधी हर व्हॉन बेथमान हॉलवेग यांना त्यांच्या स्वतःच्या इच्छेविरुद्ध लोकांच्या दडपणामुळें आपल्या भाषणांत त्या गोष्टीचा उल्लेख करावा लागला आहे. ब्रिटिश लोकांना मिळत असलेले जय नाकबूल करतांच येईनांत; कबूल करावे तर तह कां करित नाहीं ह्मणून उतावीळ झालेले जर्मन लोक दडपून विचारणार, तेव्हां तो प्रसंग टाळण्यसाठीं या जर्मन मुत्सद्यानें 'अर्धं त्यजति पंडितः' या उक्ती प्रमाणें ब्रिटिशांचे जय होत आहेत ही गोष्ट तर कबूल केली, पण आमची दुर्भेद्य फळी फोडल्या खेरीज ब्रिटिश यशस्वी झाले आहेत असें ह्मणतां येणार नाहीं, व ही गोष्ट तर अशक्यांतलीच आहे अशी मखलाशी करून वेळ मारून नेली. नाहीं तर दुसरा कोणता मार्ग होता ? लोकांच्या मनांत आशावादित्व कायम ठेविल्या खेरीज लढाईच्या खर्चासाठीं जें नवें कर्ज जर्मन सरकार काढीत आहे त्याला पैसे कोण देणार ? पण या मुत्सद्यानें तहाची गोष्ट जरी अशा युक्तीनें टाळली तरी चान्सेलरच्या भाषणांत तिचा उल्लेख झाल्यावांचून राहिला नाहीं. जर्मन लोक तह करण्याला उत्सुक आहेत अशा गोष्टी तटस्थराष्ट्रांकडून आतां पर्यंत बाहेर फुटत असत. पण आतां खुद्द जर्मन चान्सेलर राजसभेंतल्या आपल्या भाषणांत तेंच सांगूं लागले आहेत. आतांपर्यंत अमेरिका, स्पेन, हालंड, स्वीडन वगैरे राष्ट्रांतर्फे किंवा खुद्द पोप महाराजांच्या मध्यस्थीनें तहाच्या गोष्टि बाहेर पडत. आतां ब्रुसेल्स मधले स्पेनचे वकील तहाचें बोलणें लावण्यासाठीं इंग्लंडला गेले आहेत. पण 'जर्मनीची पुरी खोड मोडल्याखेरीज तहाचें नांव काढावयाचें नाहीं' हें ठराविक उत्तर ब्रिटिश मुत्सद्यांनीं पाठ करून ठेविलें आहे. मि. लॉइड जॉर्ज यांनीं हेंच उत्तर अमेरिकेंतल्या संपादकांना दिलें व मि. आस्क्विथ हे ही ज्याला त्याला हेंच सांगत आहेत. सापाला नुसता डवचून मोकळे सोडण्यासारखा दुसरा मूर्खपणा नाहीं, त्याचें नाक पुरें ठेंचलें पाहिजे अशी ब्रिटनची बालंबाल खात्री होऊन चुकली आहे. अशा स्थितींत जर्मन चान्सेलर तरी जर्मन लोकांना तहाची आशा कशी दाखविणार? आणि तहा करितां उत्सुक झालेल्या जर्मन लोकांना चान्सेलरचें भाषण तरी कसें आवडणार?

## पाश्चिम रणक्षेत्र.

या रणक्षेत्रांतले ब्रिटिशांचे विजय ह्मणजे कोंबल्स, रानकोर्ट, मोर्वल व लेसब्रूफ येथील होत. त्यांपैकीं कोंबल्सचा विजय फार महत्त्वाचा आहे. या ठिकाणीं शत्रूंनीं दारूगोळ्याचा मोठा साठा ठेविला होता. या ठिकाणाची रचना ही फार विचित्र रीतीनें केलेली होती. दोन वर्षें सारखें राबून जमिनीच्या पोटांत तळघरासारखें हें ठिकाण बांधलें होतें, व या ठिकाणीं जंगी तोफा रक्षणासाठीं लाविलेल्या होत्या. शिबंदीसाठीं निवडक शूर शिपाई ठेविले होते. त्यांनीं रक्षणाची शिकस्त केली. पण इंग्रजांपुढें चाललें नाहीं, तेव्हांच तें ठिकाण हातचें सोडलें. थिपव्हाल हें एक दुसरें अजिंक्य ठिकाण इंग्रजांनीं असेंच शिकस्तीनें घेतलें. या ठिकाणचें मोठें बहारीचें वर्णन रायटरनें मुद्दाम दिलें आहे. थिपव्हालला त्याच्या मजबुतीवरून व रक्षणाच्या उत्कृष्ट सोयी वरून तळघरांतलें जिब्राल्टर असें नांव पडलें आहे. येथें ही वरच्या सारखाच कडे कोट बंदोबस्त १९१४ सालापासून ठेवण्यांत आला होता. कोंबल्सपेक्षां ही हें ठिकाण अधिक दुर्भेद्य

आहे अशी साक्ष खुद्द एका फ्रेंच लष्करी इंजिनियरानें दिली आहे. चॉकचे खडक खोदून जमिनीच्या पोटांत पंनास फूट खोलीवर शत्रूंनीं दारूगोळा वगैरेचें कोठार येथें ठेविलें होतें. खालून वर येण्यास व सामान आणण्यास हायड्रॉलिक लिफ्ट ठेविले होते. मेत्झ किंवा व्हर्डुनपेक्षां ही या ठिकाणाची मजबुती विशेष समजली जात असे. या दोन्ही ठिकाणचे भुईकोट किंवा भूम्यंतर्गत मजबूत किल्ले इंग्रजांच्या तोफखान्यानें हां हां ह्मणतां सर केले ही गोष्ट या युद्धाच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहील. कोंबल्सवर हल्ला होतांच तेथें कुमक ह्मणून थिपव्हाल येथील थोडीशी फौज शत्रूंनीं काढून नेली, तों थिपव्हाल वर ही अकल्पित हल्ला आला, व दोन्ही किल्ले शत्रूला सोडावे लागले.

---

## इतर ठिकाणचे विजय.

वरील दोन महत्त्वाच्या विजयांशिवाय इंग्रजांनीं आणखी बरेच विजय संपादले. या कामीं जनरल हेग यांचे प्रयत्न विशेष वर्णनीय होते. आंकर आणि सॉम यांच्या दरम्यान इंग्रजांनीं २४ फिल्डगन व ६ हॉवित्झर तोफा घेतल्या, व ता. ता० १ जुलै पासून ९८८ ऑफिसर व २६१४७ शिपाई कैद केले. रशियन जनरल लेचिटस्की यांनीं ही कार्पेथियनमध्यें २६०० शत्रु कैद केले.

इंग्लंडवर विमानांतून शत्रूच्या स्वाऱ्या होत आहेत. पण त्यांत ही शत्रूची फजीती उडत आहे.

---

## रेड क्रॉस सर्विस.

केवळ भूतदयेच्या दृष्टीनें युद्धांत जखमी झालेल्या लोकांना औषधपाणी व मलमपट्टी करणाऱ्या या संस्थेचा व्याप किती आहे याची खरी कल्पना फार थोड्यांना खरोखर असेल. ही संस्था व सेंट जॉन्स ॲम्ब्युलंस असोसिएशन जोडीनें सध्या रणक्षेत्रावर काम करीत आहेत. या संस्थेचे मुख्य चालक ना. आर्थर स्टानले हे आहेत. या संस्थेजवळ आज २०८० मोटारगाड्या आहेत. या गाड्यांची एकंदर किंमत केली तर ती १० लख पौंडांवर जाईल. या संस्थेचीं विलायतेंत ३०० इस्पितळें आहेत व त्यांतून २० हजार जखमी शिपाई बरे करण्यांत आले. प्रत्येक रोग्यामागें १ पौं. २ शि. ९ पे. खर्च झाला. ब्रिटिश सैन्य बेलज्यममध्यें उतरण्यापूर्वींच या संस्थेनें तेथें कामाला सुरवात केली होती. ग्लियतेंतल्या इस्पितळावर १० लाख पौंड या संस्थेनें खर्च केले. फ्रान्समध्यें या संस्थेचीं इस्पितळें असून शिवाय माल्टा, अलेक्झांड्रिया, केरो, ग्यालीपोली, पूर्व आफ्रिका, मेसोपोटेमिया व सालोनिका येथें ही आहेत. हजारों स्त्रिया व पुरुष परोपकार करण्याच्या बुद्धीनें या संस्थेला फुकट येऊन मिळाले आहेत. आतां पर्यंत लोकांकडून या संस्थेला वर्गणीच्या रूपानें ३० लक्ष पौंड मिळाले असून या संस्थेनें आंधळे, पंगु झालेले वगैरे लोकांसाठीं स्वतंत्र इस्पितळें काढलीं आहेत. या ठिकाणीं पाय तुटलेल्यांना कृत्रिम पाय बसावितात ते इतके खऱ्या पायासारखे हुबेहुब असतात कीं ओळखता येत नाहींत. ब्रुकस्ट्रीट हॉस्पिटलमध्यें नवीं नाकें, नवे चेहरे, नवे जाभाडे, व डोक्याचे कवटीचे भाग ही नवे बसवितात. शस्त्रक्रियेची खरी कर्तबगारी येथें दिसते. येथें असलेले डाक्तर आपापल्या कामांत पुरे पुरे वाकबगार आहेत. खाजगी रीतीनें त्यांच्याकडे गेल्यास ज्या कामाबद्दल ते अगदीं कमींतकमी ५० गिनी फी मागतील तें काम ते या संस्थेंत ९० पेन्स सुद्धां न घेतां करतात! गतवर्षीं या संस्थेचा उत्सव ह्मणून रेड क्रॉस डे हा दिवस साजरा करण्यांत आला होता, त्या वेळीं ८ लक्ष पौंड वर्गणी गोळा झाली. ता. १९ आक्टोबर रोजीं पुनः लोकाना विनंति करण्यांत येणार आहे आणि त्या वेळीं १० लक्ष पौंडावर वर्गणी होईल असा अंदाज आहे. या संस्थेचा येवढा मोठा व्याप असून काम कसें बिनबोभाट व सुरळीत चाललें आहे. याचें कारण संस्थेची कामाची वाटणी अत्यंत पद्धतशीर आहे. चीफ कमिशनर, कमिशनर, व्यवस्थापक सर्जन, पीस आर्गनाइजर, हॉस्पिटलवरचे देखरेख ठेवणारे, वर्गण्या जमविणारे, स्टोअरकीपर, वगैरे प्रत्येक जण या संस्थेच्या कामाला तन मन धन अर्पण करीत असून घरच्या कामांपेक्षां अधिक आस्था दाखवीत आहेत.

---

## जमाबंदीची पद्धति.

त्रावणकोर व बडोदें या संस्थानांतून दिवाणगिरीसारखीं जबाबदारीचीं कामें केलेले व अनुभवी माणसें जेव्हां ब्रिटिश सरकारला आपल्या अनुभवाच्या व लोक स्थितीच्या ज्ञानाच्या जोरावर एखादी गोष्ट सांगतात तेव्हां सरकारनें निदान ती शांतपणानें ऐकून विचार करावयास पाहिजे. मि. व्ही पी. माधवराव यांनीं तंजावर येथील जिल्हा कान्फरन्स पुढें झालेल्या आपल्या भाषणांत पुढील उद्गार काढले होते. ते ह्मणाले—जे लोक स्वतः शेतकीचें काम करीत आहेत व शेतकऱ्यांत नित्य मिसळून व्यवहार करतात त्यांना लोकांपासून दूर राहणाऱ्या व त्यांची भाषा ही न समजणाऱ्या तरुण सिव्हिलियनापेक्षां लोकस्थितीचें ज्ञान अधिक असलें पाहिजे. पण हे अधिकारी जमीनीचा धारा ठरवितांना रयतेला फार नाडतात. जमाबंदी ह्मणजे रयतेच्या भरभराटीचा उच्छेदच ह्मटला पाहिजे. रयतेनें कष्टानें वाढविलेलें उत्पन्न सरकारच्या घरांत जाऊन रयतेला कांहीं फायदा मिळत नाहीं. इंग्लंड व आयर्लंड येथें अशी स्थिति नाहीं. जमीनीच्या व्यवस्थेच्या तत्त्वाविरुद्धच ही गोष्ट आहे. जमीनीच्या जमाबंदी संबंधाचे प्रश्न सिव्हिल कोर्टापुढें कां जाऊं देऊं नयेत? अधिकाऱ्यांची स्वतःच्या ज्ञानाविषयींची घमेंड आणि दुसऱ्याच्या अभिप्रायाविषयीं तिरस्कार या शिवाय आणखी कारण अशा वर्तनाला काय असणार? सिव्हिल कोर्टामार्फत अशा तंट्यांचा निकाल लावतां येईल अशा प्रकारचे फेरबदल हल्लींच्या कायद्यांत सरकारकडून करवून घेण्याची खटपट करण्याकरितां गांवोंगाव चळवळ झाली पाहिजे व सभा भरून अर्जावर अर्ज गेले पाहिजेत. याच भाषणांत मि. व्ही. पी. माधवराव यांनीं कायमधाऱ्याच्या पद्धतीला आपली पसंती प्रदर्शित केली. यावरून मि. व्ही. पी. माधवराव हे रयतेचे खरे कनवाळु आहेत असें दिसतें. पण असे गृहस्थ त्रावणकोर येथें दिवाण असतां त्यांनीं धान्याच्या रूपानें जमीनीचा सारा चुकता करण्याची पूर्वापार चालत आलेली व रयतेच्या अत्यंत सोयीची पद्धति मोडून टाकून द्रव्याच्या रूपानें सारा भरण्याची पद्धति कां सुरू केली तें कळत नाहीं.

---

## वऱ्हाडांत कागदाचा कारखाना.

सध्याच्या औद्योगिक चळवळीचे वेळीं वऱ्हाडांत कागद करण्यासारखें कांहीं द्रव्य आहे काय या गोष्टीकडे एलिचपूरचे वकील रा. सा. जी. एन. सहस्त्रबुद्धे यांचें लक्ष जाऊन त्यांनीं या संबंधांत मध्यप्रांतांतल्या व्यापारखात्याचे अधिकारी मि. लेफ्टविच यांच्याशीं पत्रव्यवहार केला, हें पाहून आह्मांस संतोष वाटतो. वऱ्हाडांत कापसाचें पीक हेंच मुख्य पीक असल्यामुळें व कापूस काढून घेतल्यानंतर त्याच्या काड्या जळणा शिवाय दुसऱ्या कोणत्याही कामीं येत नसल्यामुळें या काड्यांचा उपयोग कागद करण्याकडे करतां आल्यास कागदाचा एकच काय पण अनेक कारखाने सुद्धां वऱ्हाडांत चालूं शकतील, असें पाहून रावसाहेबांनीं या प्रश्नाचा पिच्छा पुरविला व त्यांच्या प्रयत्नास यश येण्याचें चिन्ह दिसत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. रा. सहस्त्रबुद्धे यांनीं हा प्रश्न उपस्थित केल्यानंतर मि. लेफ्टविच यांनीं मध्यप्रांताचे ॲग्रिकलचरल केमिस्ट मि. क्लिमेन यांची सल्ला विचारली. त्यावरून त्यांनीं केलेला रिपोर्ट आतां प्रसिद्ध झाला आहे. त्यांत ह्मटलें आहे कीं कापसाच्या काड्यांचे रासायनिक पृथक्करण करून पाहिल्यावर असें दिसून आलें कीं त्यांत शें. ४२ सेल्युलोज, शें. १० आर्द्रता व शें. ९८ खनिजद्रव्य असतें. सेल्युलोज चांगलें पांढऱ्या शुभ्र रंगाचें सांपडतें. कापसाच्या काड्यांवर सोड्याचा प्रयोग करून कागदाचा लगदा तयार करून पाहिला हा लगदा कुटण्याचें काम हातांनींच करावें लागल्यामुळें इंजिननें केल्यासारखें चांगलें तें झालें नाहीं; पण कागदाचे कांहीं नमूने तयार करतां आले. हे नमुने हिंदुस्थानांतल्या कागदाच्या कित्येक कारखानदारांकडे पाठविण्यांत आले आहेत, पण त्यांना फुरसत मिळून ते हे नमुने केव्हां तपासून पाहतील तें कांहीं सांगतां येत नाहीं. रिपोर्टाच्या शेवटीं मि. क्लिमेन ह्मणतात कीं रा. सहस्त्रबुद्धे यांचे मनांत हा प्रश्न तडीला पोंचविण्याचा असेल तर कागद तयार करण्यास लागणाऱ्या यंत्रांबद्दलची माहिती वगैरे आपण मिळवून देऊं. मि. क्लिमेन यांच्या या तयारी बद्दल लोक त्यांचे आभारी होतीलच; पण मुद्दा हा आहे कीं दुरून काडीनें औषध लावण्यासारखें सरकारी अधिकाऱ्यांनीं या प्रश्नासंबंधानें वर्तन न ठेवतां या प्रश्नासंबंधानें लवकर व पुरी पुरी माहिती गोळा करण्याची व कारखानदाराकडून योग्य ती मीमांसा करून लवकर करवून घेण्याची तजवीज सरकारानें स्वतःच कां करूं नये? वऱ्हाडांत कागदाचे कारखाने निघण्याचा योग लवकर जुळून आल्यास त्यांत रयतेचा व सरकारचा दोघांही फायदा आहे.

---

## हिंदुस्थानांतून लाखेची निर्गत.

हिंदुस्थानांतून परदेशी जाणाऱ्या लाखेची निर्गत सारखी वाढत आहे. या लाखेला मुख्य गिऱ्हाईक अमेरिका हे आहे. आमेरिकन व्यापाऱ्यांचे एजंट परभारे लाख गोळा करणारांशीं संबंध ठेवून उत्तम माल घेऊन जातात. सामान्यतः लाखेचा उपयोग वार्निशें, स्पिरिट, मेण वगैरे पदार्थ घट्ट करण्याकडे लिथोग्राफची शाई, ग्रामोफानचे रेकर्ड, व विद्युद्यंत्रें वगैरे करण्यांत होतो. पण आलीकडे तिचा उपयोग तोफेच्या गोळ्याला आंतून कल्हई करण्याकडे होऊं लागल्यापासून लाख परदेशीं जाऊं देणें धोक्याचें वाटूं लागलें आहे. वरील वस्तु आमचे देशांत तयार होऊं लागण्यास सरकारनें या वस्तु तयार करणारे तज्ज्ञ इकडे आणवून त्यांचेकडून लोकांना शिक्षण देववावें. ह्मणजे एक पंथ दो काज ही उक्ति खरी होईल.

---

## श्रीकृष्ण भगवान्.

हें नवीन नाटक येथील श्री शीलनाथ प्रासादिक संगीत कंपनीनें गेल्या गुरुवार रात्रीं व शनिवार रात्रीं करून दाखविलें. या नाटकाची मूळ कल्पना राजश्री नेवाळकर यांची असून तिला शद्बांचें मूर्तरूप **सिंधु सुता** (कवयित्रीनें) दिलेलें आहे. आबालवृद्धांनीं हें रमणीय नाटक पाहण्याची संधी अवश्य साधावी. यांतील भाषा फार प्रौढ असून पद्यांची मांडणी प्रेमळ व हृदयंगम आहे. हें नाटक विचार प्रवाहाला चांगलें वळण लावील, इतकेंच नाहीं तर याच्यामध्यें आयुष्यांतील सर्व चांगल्या वाईट प्रसंगावर तत्वज्ञानाचा प्रकाश फार बहारीनें श्रीकृष्णाच्या मुखानें पाडलेला आहे. श्रीकृष्णाच्या चरित्रांतील जरासंधवध, सुवर्णतूला, राधेचा प्रेमोल्लास, कृष्णशिष्टाई, अर्जुनास गीतोपदेश, अभिमन्युवध, कर्णवध इ. इ. नवरसपूर्ण कथाभागावर कवीच्या प्रसादामुळें संसाराचे नानाविध रंग फार चांगले खुलले आहेत. आह्मी राजश्री नेवाळकर व सिंधुसुता यांचें या नाटकाबद्दल विशेष अभिनंदन करितों आणि त्यांनीं आपल्या नाटकांच्या द्वारें शिक्षणप्रणालीला जी चांगली गती दिलेली आहे तिचेंही कौतुक करितों.

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—शरदृतूच्या उत्तरार्धांत गुलाबी थंडीला कालपासून नुकताच प्रारंभ झाला. आणि सर्व सृष्टी आरोग्य संपदा लुटण्याला सुचवीत आहे. मध्यंतरीं क्वचित् हस्ताचें अमृतसिंचन पिकांच्या अभिवृद्धीला फार उपयुक्त झालें.

**सौंदर्य**—हल्लीं सूर्याचें उदय व अस्त, रात्रीची अमृतस्त्रावी ज्योत्स्ना व प्रभात काळच्या शांततेच्या साम्राज्यांत स्फूर्तिरस ओतणारी ती शुक्राची प्रभा ही सौंदर्यें पाहून प्रत्येकानें आपल्या नेत्रांचें साफल्य करण्यास विसरू नये.

**विद्या परिषद्**—उद्या पासून वऱ्हाडची विद्या परिषद् येथें ३ दिवस भरणार आहे. आणि नंतर २ दिवस विद्यार्थ्यांचें सामने व नानाविध खेळ होतील. आणि अखेरच्या दिवशीं मेहरबान कमिशनर साहेबांच्या हातून समाप्ती होईल. तेव्हां ४ ही जिल्ह्याचे डेप्युटि कमिशनर एकत्र जमण्याचाही योग आहे व त्या कारणानें विद्यार्थी संघाची उपयुक्तता वाढून त्या संस्थेचा प्रसार सर्व शाळांतून लवकरच होण्यासारखा आहे. विद्याधनाचे खजीनदार या सत्तकांत आमच्या विचाराच्या वातावरणांत मोठी क्रांती घडवून आणतील अशी आह्मांस उमेद आहे.

रावबहादुर विनायक मोरेश्वर केळकर डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जज्ज पश्चिम वऱ्हाड हे पुढील महिन्याच्या १९ व्या तारखेपासून सरकारी कामाची रजा घेतील. तेव्हां ते आपलीं अधिकार सूत्रें रा. रा. वासुदेव रामचंद्र ढोबळे यांच्या स्वाधीन करतील असा नुकताच हुकूम निघाला आहे.

रा. रा. ई. ड्यॅक डिपटी कमिशनर हे रजेवरून परत येऊन उमरावतीस पुनः दाखल होतील. आणि हल्लींचे आफिशिएटिंग डेप्युटि कमिशनर रा. रा. सी. ब्राऊन यांची भंडारा जिल्ह्यावर बदली झाली आहे. राजश्री ब्राऊन हे वऱ्हाडांत विशेष लोकप्रिय झाले आहेत.

(**सुपुत्र**— रावबहादुर अण्णासाहेब महाजनी हे आपल्या परिणत विद्वत्तेनें, विचार धैर्यानें व मंगल आचरणानें लोकवंद्य आहेतच; पण त्या शिवाय त्यांचें मातृभक्तीचें वेड परम आदरणीय होय. त्यांच्या मातोश्री श्रीमती लक्ष्मीबाई चांगल्या शरीरप्रकृतींत वयाच्या ८१ वे वर्षी जवळ जवळ इच्छामरणीच झाल्या. त्यांनीं आपल्या आनंदाच्या लयांत पुत्राच्या वाणीनें गीता श्रवण करीत करीत देह गेल्या भाद्रपद वद्य ६ स ठेविला पितृ निधनानंतर राजश्री महाजनी यांनीं १७ वर्षें आपल्या मातोश्रीस गीता ऐकविण्याचा नित्यनेम ठेवला होता आणि मातोश्रीची स्मरणी ह्मणून त्यांनीं दर एकादशीस कीर्तन करण्याला प्रारंभ केला आहे. वयाचा ६६ व्या वर्षींचा हा त्यांचा संकल्प कोणास काय शिकविणार नाहीं बरें ? ते आपल्या मातोश्रीचें स्मारक ह्मणून कांहीं द्रव्य जगाच्या संसाराकडे लावणार आहेत असेंही आह्मी आनंदानें ऐकतों.)

**सन्मित्रः**— येथील मुलींच्या शाळेवर पुष्कळ वर्षांपूर्वी भीमाताई ह्मणून मुख्य अध्यापक होत्या. त्यांच्या मातोश्री गंगाबाई जोशी या गेल्या दसऱ्याला प्लेगानें निवर्तल्या. मरणापूर्वीं आपलें ब्रह्मस्व ९०० रुपयांचें रा. रा. भास्करराव वेचलेकर यांच्या हवालीं करून त्याचा विनियोग सत्कार्याकडे करण्याविषयीं त्यांनीं आशा प्रदर्शित केली होती. त्या अन्वयें सरकारी अधिकाऱ्यांची संमती घेऊन या सन्मित्रानीं तिच्या वार्षिक श्राद्धाच्या निमित्तानें खालील प्रमाणें त्या रकमेचा व्यय केला आहे.

| रुपये— | पुण्यकार्य |
| --- | --- |
| ३०० | स्त्रियांचा दवाखाना. |
| २०० | प्राढ स्त्रियांच्या गृहशिक्षणाकडे |
| २०० | विद्यार्थी सहायक फंड |
| १०० | डेपुटीकमिशनर साहेबांच्याहवाली (धार्मिक कृत्यासाठीं) |

ही सुंदर योजना करतांना १०० रुपये त्या पुण्यवान् बाईच्या उत्तरक्रियेकडे खर्च केले आहेत.

रा. रा. पट्टाभिराम बाळकृष्ण तेलंग मुनसफ नं २ आकोला यांस भंडाऱ्यास बदलण्यांत आलें. हे स्वभावानें विनोदी व हसून खेळून काम करणारे, निस्पृह व न्यायदक्ष आहेत.

रा. रा, गोविंद दत्तात्रय देशपांडे यांस आकोल्यास मुनसफ नेमण्यांत आलें आहे हे ही तरुण गृहस्थ निर्वोले, सुस्वभावी असून न्यायकारभाराला चांगले सत्पात्र आहेत तेव्हां यांची कायमची नेमणूक लौकरच होईल असा आह्मास भरंवसा वाटतो.

**प्रांतिक परिषद्**— येत्या मोहरमच्या महोत्सवांत तारीख ५-६-७ नोव्हेंबर रोजीं प्रांतिक राजकीय उन्नतीसाठीं प्रयत्नशील देशभक्तांचें संमेलन होणार असून तें पूर्ण यशस्वी होण्यासाठीं जहाल व नेमस्त मंडळींनीं आपले भेदाभेद बाजूला सारून मोठ्या उत्साहानें पूर्व तयारी सुरू केली आहे हें भावी यशाचें प्रसादचिन्हच होय.

रा. रा. नारायण गोविंद केतकर वकील उमरावती हे शरिरप्रकृतीच्या सुधारणे निमित्त मुंबईकडे वांऱ्यास गेले होते. पण तिकडेच वार्धक्याच्या निर्जीव करणाऱ्या ऱ्हासानें त्यांस गेल्या २७ व्या तारखेस देवाज्ञा झाली. अलीकडे सहकारी पेढीच्या प्रसाराचें काम त्यांनीं चांगल्या रंगारूपाला आणिलें आहे. यांस स्त्रीशिक्षणाची व समाज सुधारणेची विशेष आवड असे यांची बोलण्याची शैलिही चांगली असून यांस त्यांच्या आप्त मित्र मंडळीच्या नियमित वर्तुळांत चांगला मान असे. हे कायदेपंडित ही चांगले होते. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

## जाहिरात

खालीं सही करणार यांच्या कडून सर्वत्र जाहिर करण्यांत येते कीं आमचे पक्षकार रा. रा. बी. पी. दवे आणि कंपनी हे आकोला येथील सावतराम रामप्रसाद मिल्समध्यें गुरुवार ता. १२ आक्टोबर रोजीं दोनप्रहरीं ४ वाजतां रा. रा. राजाराम तयबजी आणि कंपनी यांच्या तर्फे व स्वतः करितां स्टील हूप्सचीं बंडलें ३५७ विकणार आहेत. या वस्तु वरील स्थळीं पहाण्यास मिळतील. ता. ५ आक्टोबर १९१६

**हिरालाल आणि कंपनी**

मेसर्स बी. पी. दवे आणि कंपनीचे अटार्णी.

नो. नं. ३६५

## NOTICE

Notice is hereby given that our clients Messrs. B. P. Dave & Co will sell by public auction at Sawataram Ramprasad Mills at Akola on Thursday 12th of October at 4 P. M. 357 bundles of steel hoops on behalf of Messrs. Rajaram Tyabji & Co. and on their account. The said goods are open for inspection at the said premises. Dated the 5th day of October 1916.

Hiralal and Co.
Attorneys for Messrs. B. P. Dave & Co.

N. N. 366

## नोटीस

रा० रा०

(१) रुखब केशव सईतवाळ
(२) हरी नारायण सईतवाळ
(३) मारोती पांडूरंग सईतवाळ
(४) अंबादास कडतू सईतवाळ
(५) बळीराम लक्ष्मण सईतवाळ
(६) आत्माराम सोनाजी सइतवाळ
(७) विश्वनाथ कृष्णाजी सईतवाळ
(८) पासूबा लक्ष्मण सईतवाळ
(९) रुखब कृष्णाजी सइतवाळ
(१०) कुलवंतराव जैन सब ओरसीयर

सर्व रा. दर्यापूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं दर्यापूर येथील श्री संस्थान जैन मंदिराचे आह्मी पिढीजात महाजन असून मंदिराची सर्व तऱ्हेची वहिवाट आज आह्मी कैक वर्षांपासून करितों आहोत. थोडें दिवसापूर्वीं श्री देवाचे पुजे संबंधानें गावांत कांहीं वाद उपस्थित झाला . त्या वादाचा निकाल करण्याकारितां ह्मणून तारीख २७-८-१६ इसवी रोजीं रात्रीं श्रीयुत कुलंवतराव जैनी यांचे अध्यक्षते खालीं आपणा सर्वांची सभा भरली होती . सभेंतील वादविवाद अगदीं असंबद्ध रीतीनें चालत असल्या कारणानें मुद्दा एक निघावा व निर्णय भलत्याच मुद्याचा व्हावा असें होत होते. रात्रीचे दोन वाजले तरी सभा बंद होण्याचा रंग दिसेना तेव्हां असें ठरलें कीं आह्मी कांहीं नियम करावे व त्यावर सर्व सभासदानीं व सर्व ग्रामस्थ सईतवाळ जैनानीं सह्या कराव्या व सभेनें कांहीं नियम करावे त्यावर सर्वांच्या संमत आह्मी ही सही करावी. लागलींच अर्जनविसाचे कडून कांहीं नियम लिहिले गेले व त्यावर गडबडीनें आपल्या सर्वांच्या सह्या घेतल्या गेल्या. नियम काय लिहिले हें आह्मी त्यावेळीं वाचून ही पाहिलें नाहीं. व तशी सवड ही नव्हती व आमचे नियम सही करण्याकरितां आह्मी सभेपुढें ठेविले तेव्हां सर्व जण निघून गेले दुसरे दिवशीं आह्मी सह्या केलेला कागद वाचून पाहिला तेव्हां ज्या हेतूनें सभा भरविली होती त्याबद्दल कांहीं निश्चित निर्णय केला गेला नसून कांहीं गोष्टी आमचे वहिवाट व हक्क संबंधाचे विरुद्ध तसें कांहीं सभेंत ठरलें गेलें नसतांना ही लिहिल्या गेलेल्या आह्मास दिसल्या- तेव्हा त्याबद्दल आह्मी अध्यक्ष श्रीयुत कुलवंतराव यांस विचारणा गेली व त्यांचे आह्मास लेखी उत्तर आलें कीं नियम करण्यांत गैरसमज झालेला आहे. या शिवाय तीन चार सभासदांनीं ही कांहीं ठरावाबद्दल आपली ना कबूली आह्मास पत्र द्वारें कळविली अहे सभेला कोणत्याच तऱ्हेचे व्यवस्थित स्वरूप नव्हते व जें जें कांहीं ठरलें गेलें त्याप्रमाणें करण्यास सर्व सभासदानीं ही तत्परता दाखविली नाहीं. करितां सभेंत ज्या कागदावर आमचा सही घेतली त्यातील कोणतेही कलम व नियम आह्मास मान्य नाहींत. हें आपणास या नोटीशीचे द्वारें कळविण्यांत येत आहे, कळावे ता० ४-१०-१६ इ.

कृष्णाजी अन्याजी महाजन रा०
दर्यापूर दस्तुर खुद्द

नो. नं० ३६७

## जाहीर नोटीस

आह्मी हिरालाल व मोहनलाल वा॥ चुनीलाल उभयतां राहणार दुकान मोप प्रगणें रिसोड ता. वाशीम जि. आकोला

आह्मी या लेखावरून असें कळवितो कीं आमचे दुकानीं कुलमुखत्यारपत्र नोंदून त्यांत रामचंद्र बापु नंबर १ भवानी सदाशिव नंबर २ व ग्यानबा विठोबा नंबर ३ असे तीन इसम कुलमुखत्यार नेमून कुलमुखत्यारपत्र सबरजीष्टर कचेरी रिसोड येथें बुक नंबर ४ भाग ५ पान १४१ याजवर अनुक्रमें नं. ११ चा दस्तैवज ता. २३ माहे जून सन १९१४ इसवी रोजीं नोंदला होता. तरी वरील त्रिवर्गा मुखत्यारापैकीं नंबर २ चा मुखत्यार नामें भवानी सदाशिव रा. चिखली जि. बुलडाणा यांस आमचे दुकानांतून वरील नंबराच्या कुलमुखत्यार पत्रांतून कमी केल्या वरून व आमची नौकरी ता. २८-९-१६ पासून बंद असल्यावरून जाहीर नोटिस दिली आहे. तरी वरील नंबराच्या मुखत्यार पत्रांत ज्या शर्ती नोंदल्या गेल्या आहेत त्याशर्ती बद्दल व्यवहार कोर्टांत किंवा इतर सावकारी बाबतींत केला तर तो रद्द समजला जाईल. आतां त्यांनीं आमचे दुकानचा कोणतेही प्रकारचा व्यवहार केल्यास आह्मास रुजू नाहीं. वरून नोटिशीनें जाहीर केलें आहे. कळावें ता. २-१०-१६

सह्या

१ हिरालाल चुन्नीलाल दस्तुर खुद्द
२ मोहनलाल चुन्नीलाल दस्तुर खुद्द

नो. नं. ३६८

## जाहिरात

आम्ही खालीं सह्या करणार या जाहीर नोटिशीनें असें जाहीर करितो कीं, कसबे वाशीम येथें म्युनिसिपाल कमेटी जवळ आमचे वडिलार्जीत मालकीचें घर आहे. त्याची चतुःसिमा पूर्वेस कोंडु धोबी याचें घर प. सरकारी जागा द. डोमाचे घर उ. सरकारी सडक या चतुःसिमेंतील घर कवेलुचे आंगण आवारासह लांबी हात २८ रुंदी हात २४ सदहू घर व या घरांत आमची वडिलार्जीत असलेली तांबे पितळेची भांडीं किंमत रुपये ९० ची अशी सदहू घरांत असलेली मिळकत आम्ही आपली बहीण नागुबाई मर्द निगया इजला आमची बहीण असल्याकारणानें राहण्यास घर व भांडीं कुंडीं दिली होती. परंतु अलीकडे सदहू नागुबाई ही लोकांचे फंद फितुरानें सदहू स्थावर जंगम इस्टेट अफरातफर करण्याचे बेतांत आहे. करितां सर्व साहू सावकार लोकांस कळविण्यांत येते कीं, सदहू वरील मिळकत नागूबाईस विकण्याचा अधिकार नाहीं. तरी तिज जवळून कोणी विकत अगर दुसरे प्रकारें घेऊं नये. घेतल्यास आम्ही अगर आमची इस्टेट जबाबदार राहणार नाहीं. करितां या जाहीर नोटिशिनें प्रसिद्ध केलें आहे. ही जाहीरात दिली. आज तारीख २८ माहे ९ सन १९१६ इ. दस्तुर शंकर त्रिंबक रा. वाशीम

सह्या

१ हिरा वा सायन्ना तेलंगी धोबी रा. वाशीम नि. रेघ
२ बालु वा सायन्ना तेलंगी धोबी रा. वाशीम रेघ
३ चिन्नु वा सायन्ना तेलंगी धोबी रा. वाशीम नि. रेघ द. वर प्रमाणें

नो. नं. ३६०

## जाहीर नोटीस

या जाहिर नोटीशीनें सर्वत्रांस व गंगाभागिरथी काशीबाई मर्द गणपतराव बुरुड रा. आकोला ढोमणपुरा

यांसः—

मी तुमचा वडील जावाई होतों परंतु ती तुह्मी मला दिलेली मुलगी नामे सुंदर वारल्यानंतर मला तुमच्या दुसऱ्या ३ मुलीपैकीं धाकट्या मुलीचा स्वीकार करण्या वा तुह्मी आग्रह केला. ती तुह्मी दुसरीकडे देण्याचे ठरऊन ही मलाच दिली. व त्याबरोबरच आपली स्थावर जिनगी मला देण्याचे कबूल केल्यावरून मी लग्न केलें. त्यावर मी आता पर्यंत माझ्या आप्ताशीं वाईट होऊन ही तुमच्या मनाप्रमाणें वागत आलों. आतां अलीकडेस तुह्मी दुसऱ्या कोणाचे सांगण्यावरून तुह्मी ती मला दिलेली स्थावर जिनगी विक्रीस काढली आहे असें कळतें. असें होण्याचे कारण मला कळत नाहीं. वास्तवीक तुह्मी चार चौघांसमक्ष कबूल केल्यावर सदर जिनगीचा कायदेशीर हक्क मजकडे आला. तरी आतां तुह्मास कळविता कीं तुह्मी ही स्थावर जिनगी (आकोला येथें शहरांत ढोमणपुऱ्यांत असलेले नळा जवळील घर) कोणास विकूं अगर गहाण ठेऊं नये. व कोणी सदहू बाईजवळून गहाण खरीदी घेऊं नये. घेतल्यास बोजा वरील जिनगीवर राहणार नाहीं. हें सर्वत्रांस कळावें ता. २९-९-१६

सही

गणपत लक्ष्मण बुरुड राहणार कारंजा हल्लीं मुक्काम आकोला दस्तुर खुद

नो. नं. ३६१

## जाहिर नोटीस

या जाहिर नोटीशीनें सर्वत्रांस कळविण्यांत येते कीं मौजे बादलापूर ता. आकोला येथील शेत सर्वे नं ३३ पैकीं २ हें शेत कायद्यानें वारसदार ह्मणून मजकडे आलें आहे. यावर कोणी दुसऱ्याचा हक्क नाहीं. करितां सदहू शेत कोणी गहाण खरीदी अगर पट्यानें घेऊं नये. घेतल्यास त्याचा बोजा वरील जिनगीवर राहणार नाहीं. ही इस्टेट वडिलोपार्जीत आहे क. ता. ३०-९-१६ इ.

सहीची निशानी आंगठा
भोन्या वा फत्या महार रा. मांजरी याचा खुद

नो. नं. ३६२

## नोटीस

सेंगाई मर्द रामजी कुणबी बोरचाटे राहणार डही पोष्ट मालेगांव ता. वाशीम

ईसः—

खालीं सही करणार निंबाजी वा॥ मारोती कुणबी बोरचाटे रा० दही ता. वाशीम याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा बाप मारोती व तुझा नवरा रामजी व सोनाजी व गुनाजी असे चौघे सखे भाऊ यांत मारोतीचा मुलगा मी, सोनाजीस मुलें रावजी व सुर्याजी व गुनाजी असें आहेत. अलीकडेस तुझा नवरा मरण पावला आहे, तुजला संतान मुळींच नाहीं. तुझे जवळ जी स्थावर जंगम जिनगी आहे ती वडीलोपार्जीत आहे. असे असोन तूं आह्मांस बुडविण्याचे इरायानें याची अफरातफर करूं पाहत आहेस. तुझा हक्क निवळ अन्नवस्त्राचा आहे तरी तुजला नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुजजवळ असलेली जिनगी तूं कोणास बक्षीस, खरीदी, गाहाण अगर १ वर्षावर कोणास पट्यानें देऊं नये अगर दुसरे कोणत्याही रितीनें जिनगीची अफरातफर करूं नये, केल्यास तूं केलेले व्यवहाराबद्दल माझे चुलत्याची जिनगी जबाबदार होणार नाहीं कळावें ता० २-१०-१६ दा॥ त्रिंबक बळवंत पी. रा. आकोला

सही

१ निंबाजी वा॥ मारोती रा० डही ता० वाशीम द० खुद

नो. नं. ३६३

## नोटीस

बळवंता वा बाळाजी गवळी राहणार तुळंग बुजरुक २ यलाई मर्द रायभान अ. पा. नवरा रायभान वा जानजी गवळी रा. थार ता. मेहकर

यांसः—

नोटिस देण्यांत येते कीं, आमचे मालकीचे खालील वर्णनाचे दागिने तुमचे पाशीं आहेत. यलाईचे गंधर्व झाल्यावर आह्मी ते मागितले पण आह्मास मिळाले नाहींत. सबब तुह्मास नोटिशिनें कळवितो कीं, ८ दिवसांत आमचे दागिने आह्मास वापस करून आमचा निकाल करावा. नाहीं तर कोर्ट मार्फत दावा करून दागिने किंवा त्याची किंमत भरून घेऊं.

वर्णन खालील प्रमाणें:—

| चांदीचे दागिने | वजन तोळे | किंमत |
|---|---|---|
| हसळी | २९ | २० |
| गोफ | २९ | २० |
| गुंडवाळ्याचा जोड १ | ६० | ५० |
| तोड्याचा जोड १ | ८० | ६० |
| कोपरवाळ्याचा जोड १ | ४० | ३२ |
| कडे ४ | ५० | ४० |
| पाटल्याचा जोड १ | ३० | २४ |
| सोन्याचे दागिने | वजन तोळे | किंमत |
| नथ | १ | २९ |
| पुतळ्या ४ मंगळसूत्र | १। | ३० |
| बाळ्या चार | १ | २९ |
| सरी सोन्याची | १० | २५० |
| एकूण रुपये | | ५७६ |

कळावें. ही नोटिस दिली ता. १-१०-१६

सही

गोविंदा वा रायभान पा. रा. कान्हेरी ता. बाळापूर जि. आकोला द. खुद

नो. नं. ३६४

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी घेतां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा ज्यास्त इसमांस अगर यापैकीं मरणाचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची भी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला २।१०।१६ — Lyon Scott एजंट

नो. नं १

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशाच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारांस वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, वीर्यनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १।८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन माफकशीर कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनखी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला नें. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई याजकडे मिळतात.

**Dr H. L. Batliwala Sons & Co Ltd.**

N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुद अग्रफुलें साखळी व वाळ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाळ्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शेंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाउ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

नो नं ६

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No.N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख १६ माहे आक्टोबर सन १९१६ ई० [ अंक ४१

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


### अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३ ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सह्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥.
कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— मगनलाल के. आणि कंपनी,
गिरगांव मुंबई.

वाचा आणि मित्र मंडळीला दाखवा.

### सुबोधमाला.

सद्यःस्थितीस अनुसरून प्रगतीपर, ज्ञानप्रद, व मनोरंजक मासिक पुस्तक.

आपलेपणाची खरी ओळख पटविणाऱ्या बोधपर गोष्टी, नामांकित लेखकांचे विचारपरिप्लुत निबंध अनुकरणीय चरित्रें, हृदयंगम कविता, चालू कादंबरी, अकलेचे हिशोब व कूटप्रश्न वगैरेंनीं युक्त पृष्ठें दरमहा ३६ वार्षिक वर्गणी ट. ख. सह १॥≡

मालेच्या वर्गणीदारांस बक्षिसें.

वार्षिक परिक्षेंत पास होणाऱ्या कोणत्याही इयत्तेंतील विद्यार्थी वर्गणीदारांस दरसाल बक्षिस रुपये ५००

अकलेचे हिशोब किंवा कूटप्रश्न सोडविणाऱ्या वर्गणीदारास दरमहा बक्षिस रुपया १

या संबंधाची तपशीलवार माहिती माहे मे १९१६ च्या अंकांत पहा. श्री एल. आर. बावडेकर हे आकोल्याचे एजंट आहेत.

गांवोगांवीं एजंट पाहिजेत— कमीशन भरपूर देऊं.

के. बी. देशमुख
संपादक—सुबोधमाला
उमरावती.

नो० नं० ३१८

### खात्रीचा तयार केलेला.

ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं ६

### अस्सल अंगुरी.

## हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १८३ आणि १८७ तो. खालिस कस्तुरी रु२५ तो. शुद्ध शिलाजीत ८९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

### चांदीचीं भांडीं.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यात दरखास्तीचे, वकील पत्राचे, पात भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरिता करावयाच्या अर्जाचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यात कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

दिवाळीकरिता सुगंधी मालाची प्रचंड लूट. !!

## आर्यवनौषधालय—मुर्डी.

स्वदेशी. **दिपावली.** ॐ नमः श्रीगणेशाय. **दिवाळी.** स्वदेशी.

**सावध रहा.** **फसूं नका.**

### अति उंची सुगंधि अत्तरांच्या पेट्या.

प्रत्येक पेटीची किंमत पो. ख. सह (१८१०)

या पेट्या उत्तम सागाच्या लांकडाच्या मजबूत तयार करून त्यावर उत्तम पॉलिश केलेलें आहे. यामुळें पेटी विशेष मनोहर बनली आहे. या पेटींत गुलाब, हिना, वाळा, केवडा इत्यादी अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, उंची बेलिया बाटली एक, सुगंधी उटणें, गंधाचे रवे, स्त्रियांकरितां लालभडक कुंकू व हळद, असे एकंदर सुगांधि अकरा पदार्थ ठेविले आहेत. पेटींतील सर्व सुगांधि माल फार उत्तम ठेविला असून, तो सर्वांना घेण्यास जबर वाटूं नये ह्मणून आह्मी आपला कोणत्याहि तऱ्हेचा फायदा ठेविला नसून प्रत्येक पेटीची किंमत पो. ख. सह अवघी १८१० ठेविली आहे. वरील वर्णनावरून पेटीची किंमत किती अल्प ठेविली आहे, हें पेटींतील सर्व सुगांधि माल लक्ष्यपूर्वक पाहिल्यास सहज कळून येईल. या पेट्या आह्मी अगदीं अल्प किंमतीला देत असल्यानें त्यांचा अतिशय खप होणें अगदा साहजिक आहे. यामुळें आमच्याशीं स्पर्धा करण्याकरितां इकडे कांहीं ठिकाणीं याहूनहि सवंग सवयाच्या भिकार मालांनीं भरलेल्या पेट्या निघालेल्या आहेत. करितां मोहक वर्णनाला न भुलतां खऱ्या उत्तम पेट्या आमच्याशिवाय इतरत्र मिळत नाहींत हें अवश्य लक्ष्यांत ठेवून सर्वांनीं याच पेट्या उपयोगांत आणाव्या. इतकेंच आग्रहपूर्वक सांगणें आहे.

### उंची बादशाही अत्तरांच्या पेट्या.

पेटीची किंमत पो. ख. सह तीन रुपये.

ही पेटी सागाच्या लांकडाची फारच सुबक बनवून वर सुरेख पॉलिश केलें आहे. या पेटींत सुरंगी, मालती, राजविलास, इत्यादि बादशाही अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, बादशाही केशसौगंधिनी तेल बाटली एक, उटणें, गंधाचे रवे व स्त्रियांकरितां कुंकू, हळद व काजळ असे एकंदर बारा बादशाही सुगंधि पदार्थ ठेविले आहेत. इतकें असूनही या पेटीची किंमत अगदीं अल्प पो. ख. सह ३ तीन रुपये ठेविला आहे. पेटींतील प्रत्येक मालाचे निरीक्षण केल्यास आह्मी ही ठेविलेली किंमत फारच अल्प ठरले. तरी सर्वांनीं पेट्यांचा अवश्य उपयोग करावा. पेटींतील सर्व माल अति उंची असाच वापरला आहे. पाहिल्यावर सहज खात्री होईल.

**बादशाही अत्तरें**—सुरंगी, मालति, पुष्पराज, गंधराज, लक्ष्मिविलास, मदनविलास हीं प्रत्येकीं दर तोळ्यास ३ रुपये.

**सुगंधि अत्तरें**—गुलाब, हिना, केवडा, अंबर, मोतिया, बकुल वगैरे दर तोळ्यास १ रु.

**जीवनपुरी तेलें**—बेलिया, चमेली, हिना मसाला दर १० तोळ्यांस १ रुपया.

**विशेष सूचना**—वरील अत्तरांच्या पेट्या एकदम चार घेणारास एक पेटी, सात घेणारास दोन पेट्या, बारा घेणारास चार पेट्या, कमिशन दाखल फुकट देऊं. तरी एकदम गटानें पेट्या मागवून आपला फायदा करून घ्यावा. अत्तर पाव तोळ्याचे आंत मिळणार नाहीं. कित्येक आपला बनावट माल दुसऱ्याची निंदा करून खपाविण्याची प्रयत्न करीत आहेत. तथापि आमचा माल खरा उत्तम असल्यानें, तो खपविण्यास आह्मांस विशेष स्तुति किंवा दुसऱ्याची निंदा करण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण खऱ्यामालाचें सर्वत्र चहाते असावयाचेच सबब दिवाळीचे सणास लागणारा सर्व माल आमचे कडूनच मागवावा. सर्व माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य मुर्डी
पोष्ट हर्णे जि० रत्नागिरी

नो. नं. ३९०

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हा रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रण करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 3 Dadar Bombay.



## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसूत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुद अम्रफुलें साखळी व बाागन्याची वगैरे सर्व जातीचा माल–तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें, न्याशनलचें शंभर नंबरी वापरात असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर व्हाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्साची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रेखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर

नो नं ६



## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**— उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ।॥।, १, १॥, २॥, २, २॥ ते ५ रु. प. **बुद्धीवळ जोड लांकडी**— किंमत ।॥। १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ।॥, ।॥।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान घाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

**डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी**

नो. नं. ३४९


# विक्रीस तयार.

मी खालीं सही करणार सर्वत्र लोकांस जाहीर करितो कीं, माझे मालकीचें घर दोन मजली शहरांत अगर वेशी जवळ रा० व्यंकटराव देसाई वकील यांचे घराजवळ आहे. तें घर विकावयाचें आहे. ज्यांना गरज असेल त्यांनीं खालील पत्यावर येऊन भेटावें.

पत्ता—

सुभानखां वा॥ उसमानखां रा. आकोला अगर वेस

नो० नं० ३४४


## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवतां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला २।९।०९ — Lyon Scott एजंट

नो. नं १



## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **ओरिएशियन कमर्शियल अशूअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने व माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा. वि. रा सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल. गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज

धी एशियन कमार्शियल अशू अरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज. फोर्ट, मुंबई,

नो० नं० ३६९


## नोटीस

स. स. नं. १७ सन १९१६

चौ. ता. २९-११-१६

विद्यमान सीनीयर सबजज्ज साहेब बहादूर कोर्ट आकोला

अर्जदार— गणेश रावजी दामले ब्राह्मण रा. आकोला.

या नोटीशीनें सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं मी अर्जदार यानें मयत रावजी विष्णु दामले यांचे पोष्टल लाइफ इन्शुरन्स २००३ ता. १-३-१८९४ चे रु. ११०० मिळण्यासाठीं सक्सेशन सरटीफिकीट मिळण्याबद्दल कि. अर्ज नं.१७ सन १९१६ चा या कोर्टांत ता. ९-१०-१६ रोजीं दाखल केला आहे. त्या अर्जाचे सुनावणीची तारीख २९-११-१९१६ नेमिली आहे त्यासंबंधीं कोणाची कांहीं तक्रार असल्यास त्यानें स्वतः अगर वकील मार्फत आपला लेखी जबाब वरील तारखेस या कोर्टांत दाखल करावा. याप्रमाणे न केल्यास अर्जदारास वरील तारखेस सर्टिफिकीट दिलें जाईल. व मग पुढें यासंबंधानें कोणाची कांहीं तक्रार ऐकिली जाणार नाहीं.

सही

Sd/ D. K. Kolatkar.

सिनिअर सब जज्ज कोर्ट आकोला

नो. नं० ३७०

## नोटीस

नोटीस बेशमी सुभानबी मर्द शेखकदीर मुसलमान रा० नांदूरा ता. मलकापूर

ईसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं तूं माझी लग्नाची बायको असून तुझ्या बापानें तुला लग्नाला बोलावल्यावरून तूं गेलीस. त्यावर तुला घेण्याकरितां २ वेळां स्वतः व तिसऱ्यानें पंच घेऊन आलों. तरी तूं आली नाहींस व तुझा बाप व भाऊ माझेशी तक्रार करण्यास तयार झाले. कांहीं मी आणलेले पंच व कांहीं तेथील मंडळी जमा करून त्यांचे कडून तुझे बापास व भावास विचारलें. (कारण तुला गोषा होता.) तरी त्यांनीं स्पष्ट इनकार केला. आणि तुला प्रत्यक्ष विचारतां तूं आपल्या भाऊ बापाच्या म्हटल्याप्रमाणें उत्तरें देत गेलीस. तुझा व तुझे घरचे मंडळीचा असा बेत आहे कीं माझे जवळून फारकती घेऊन दुसरा घरठाव पहावा. व नंतर माझेवर माहेराच्या हक्काबद्दल दावा करावा. तरी मी या नोटीशीनें कळवितों कीं ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत माझे घरीं निघून यावें. तसें न करशील तर मी तुला फारकती न देतां खावटीचा व कपडेलत्याचा अगर माहेराचा मी कोणताच हक्क मंजूर करणार नाहीं व तुझ्या न येण्यानें मला नाइलाजास्तव दुसरी बायको करून आपला संसार करावा लागेल. व मग तुझी कोणतीच तक्रार मी ऐकणार नाहीं. या नोटीशीची नक्कल माहिती करितां तुझा बाप शेख भीकन मापारी रा० नांदूरा व तुझा भाऊ शेख वाहद वा॥ शेख भीकन मापारी रा० नांदूरा यांस देण्यांत आली आहे. कळावे ता० ७-१०-१६

सहीची निशानी आंगठा

शेख कदीर वा॥ शेख इस्माईल मुसलमान रा० खामगांव (जलालपुरा) यांचा खुद्द

नो. नं.३७१

## नोटीस

नोटीस बेशमी भागीरथी मर्द सदू पेठकर रा० नांदूरा बु॥ ता॥ मलकापूर

ईसः—

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तूं मैत माझा भाऊ सदू याची पाटाची बायको असोन निपुत्रिक आहेस आणि आहमदपूर येथील सर्वे नं. ७७ हा जो कायदा विरुद्ध तुमचे नांवें ३ लागला आहे तो मालकीच्या हक्का करितां नसोन अन्न वस्त्राच्या सोईकरितां आहे कारण कीं तो वडिलोपार्जित असल्यामुळें पुरुष संततीकडेस येणार आहे. मी दिलेल्या अर्जाची चौकशी न झाल्यामुळें हा असा प्रकार घडून आला. तुझी माझ्या बंधुच्या नांवावर राहिल्यास अन्न वस्त्र देण्यास मी तयार आहों. मैताच्या मुलीचें पाळण पोषण जसे मी करितों या प्रमाणें तुमचे ही करीन. सदहू नंबर कोणास कोणत्याच लेखानें लिहून देण्याचा तुम्हास अधिकार नाहीं. असें करणें अनाधिकाराचे असल्यामुळें यांत लिहिलेल्या नंबरावर कोणतेच प्रकारची जबाबदारी येऊं शकणार नाहीं. परस्पर माझे ऐकण्यांत असें आले आहे कीं फंदी लोकाच्या नादीं लागून तुम्ही आपले बहीणीचा मुलगा दत्तक घेण्याचा तुमचा विचार आहे. परंतु हेंही करणें कायदेशीर ठरणार नाहीं. कारण कीं मी पुत्रवान आहो. आणि हाच प्रतिबंध दत्तक घेण्यास कारण आहे तुमचा इच्छा असल्यास मी माझा मुलगा देण्यास तयार आहो. कळावे तारीख ९-१०-१६ इ० दस्तुर गोविंद बापूजी वि. रा. आकोला

सही

१ सोनाजी वा॥ मारुती पेटकर रा० पेठ नांदूरा खु॥ तालुका मलकापूर निशाणी हातची

नो. नं. ३७२

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, माझा चुलता रामजी वा॥ कृष्णाजी बोरचाटे राहणार दही ता. वाशीम हा अलीकडेस मरण पावला आहे. त्यास वारस आम्ही पुतणे निंबाजी, राघोजी, सूर्याजी, व भाऊ गुनाजी, असे आहों. मैताची जी जिनगी आहे ती वडिलोपार्जित आहे. त्या जिनगीचा अफरातफर करण्याचा त्याची बायको शेंगाई मर्द रामजी बोरचाटे राहणार

डही ता. वाशिम इचा विचार दिसतो. तिचा हक्क फक्त अन्नवस्त्राचा आहे. तरी मैत रामजी याची जिनगी तिचे जवळून कोणी गहाण, खरीदी, अगर बक्षीस अगर दुसरें कोणत्याही रितीनें घेऊं नये. घेतल्यास त्या पैशाचा जबाबदार वरील मैत रामजी याची जिनगी होणार नाहीं. कळावें. ता० २-१०-१९१६ इ॥ दस्तुर त्रिंबक बळवंत पी. रा. आकोला.

सही
निंबाजी वा॥ मारुती राहणार
डही तालुका वाशिम जिल्हा
आकोला दस्तुर खुद

नो० नं० ३७३

## जाहीर नोटीस

सर्वत्र शेट सावकार लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुकाराम वा॥ पुंजाजी गोंडचर राहणार साकरडोह तालुके मंगरूळपीर जिल्हा आकोला यांस माझे तर्फेनें सरकारी व खाजगी कामें करण्यास मुखत्यारपत्र दिले होते. परंतु हल्लीं माझी सर्व कामें झाल्यामुळें मजला मुखत्याराची कांहीं जरूरी नाहीं. तरी आज तारखेपासून सदर्हू इसमास दिलेलें मुखत्यारपत्र मी रद्द केले आहे. व त्याला मुखत्यारीहून काढून टाकिले आहे. तरी यापुढें सदर्हू इसमास माझे नावांवर कोणतेही प्रकारें कर्ज किंवा देव घेव करूं नये. केल्यास मी अगर माझी इस्टेट त्याजबद्दल जबाबदार नाहीं. कळावें. ता. १२ माहे सप्टेंबर सन १९१६ इ० दस्तुर रघुनाथ मुरलीधर

सही
बनी मर्द बापूना आनेकार राहणार
साकरडोह तालुके मंगरूळपीर
जिल्हा आकोला नि॥ हातचां
आंगठा

नो० नं० ३७४

## जाहीर नोटीस

तुकाराम वा॥ पुंजाजी गोंडचर राहणार साकरडोह ता. मंगरूळपीर जि. आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून जाहीर नोटिशीनें कळविले जाते कीं, मी तुह्मास मागचे कार्तिक महिन्यांत माझे तर्फेनें कोर्टांत वगैरे कामें करण्यास, वकीलास वकीलपत्र देण्यास, फिर्यादी आणि दरखास्ती वगैरे कामांत माझे नावांच्या सह्या करण्यास व माझी खाजगी कामें करण्यास, सावकारी देणें घेणें करण्यास वगैरे मुखत्यारपत्र दिले होते. व मुखत्यारपत्र मे. सबरजिस्ट्रर साहेब कोर्ट मानोरा ता. मंगरूळपीर जि. आकोला यांचे कोर्टांत नोंदलें आहे. हल्लीं माझी सर्व कामें संपलीं आहेत. सबब मला मुखत्याराची कांहीं जरूरी नाहीं. ह्मणून वरील कामांत तुह्मास दिलेले मुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केले आहे. तरी आतां या कामा संबंधीं व या शिवाय माझे स्वतःचे कामा संबंधीं तुह्मी माझे करितां कांहीं कारवाई व कामें करू नयेत केल्यास तीं मजला कबूल नसून कायद्यानें या जाहीर नोटिशीचे आधारें रद्द समजले जातील. याजबद्दल पूर्वींच तुह्मांस समक्ष सांगितले. व हल्लीं नोटिशीनें कळविले आहे. आतां यापुढें माझे नावांचा खाजगी अगर सरकारी व्यवहार मुळींच करू नये. केल्यास रद्द समजला जाईल. तुमचे जवळ माझे नांवचे कांहीं कागदपत्र असल्यास ते आठ दिवसाचे आंत मजला आणून देऊन माझी पावती घ्यावी. ही नोटिस दिली. ता. १२ सप्टेंबर सन १९१६ इ. दस्तुर रघुनाथ मुरलीधर दॅ.खुद

सही
बनी मर्द बापुना आनेकार राहणार
साकरडोह ता. मंगरूळपीर जिल्हा
आकोला नि. हातचा आंगठा
व बांगडी

नो० नं० ३७५

## नोटीस

रा. रा. तुकाराम वा॥ उदाजी देवळे कुणबी रा० नागरदास ता॥ वाशीम

यांसः—

खालीं सही करणार बद्राजी वा॥ मारोती कुणबी ठाकरे रा० इरळ ता॥ वाशीम याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी मुलगी नामे सारजी ही तुमची गंधर्वाची बायको आहे. तिचे तुमचे बरोबर गंधर्व होण्यास ६।७ वर्षें झालीं आहेत. तेव्हांपासून तुह्मी तिजला नेली नाहीं. हल्लीं ती शाहाणी होऊनही १॥ वर्ष झाले आहे. मी तुमचे येथे शाहणी झाल्यावर पोहचवून दिली परंतु दोन तीन दिवस ठेऊन परत माझे घरी आणून घातली तेव्हांपासून तुह्मी तिजला नेत नाहीं. करितां तुह्मास नोटीशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांत तुह्मी आपली बायको नेऊन संसार करावा. ती नांदण्यास तयार आहे व सहा वर्षांचे खावटी बद्दल दरसाल रुपये ५० प्रमाणें रुपये ३०० तीनशें माझे घरीं आणून देऊन माझी पावती घ्यावी. या प्रमाणें न केल्यास नोटीस ही फारकती समजून माझी मुलगी दुसरे इसमा बरोबर घरठाव करील. पुढे त्या संबंधी तुह्मी तकरार आणल्यास ती या नोटीस आधारें रद्द समजली जाईल व खावटी बद्दल मी तुमचेवर योग्यरीतीनें दावा करून रकम वसूल करून घेईन. पुढें होणारा खर्च व नोटीशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावे ता २-१०-१६ इ॥ दा॥ त्रिंबक बळवंत पी. रा. आकोला

सही
१ बद्राजी वा॥ मारोती ठाकरे
रा० इरळ ता॥ वाशीम
निशानी आंगठा

नो नं. ३७६

## जाहीर नोटीस

नोटिस बेशमी राणु वा॥ कोंडजी वारीक राहणार लोणार ता॥ मेहेकर जि बुलठाणा

यांसः—

लक्ष्मण वा॥ खंडोजी वारीक राहणार मौजे ब्रह्म प्रगणे व पोष्ट आनसिंग तालुके वाशिम जिल्हा आकोला यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमच्या तोंडी सांगण्यावरून विश्वासानें मौजे मजकुरी राहणार सावकार राघोजी वा॥ मुक्ताजी यांजकडून ३०० रुपये काढून आमच्या मुलीसी आपलें लग्न लावून दिले. ते रुपये आह्मी तुह्मास पुष्कळ वेळा मागितले व आपण ही इकडे ६-७ वेळां लग्न झाले पासून येऊन गेलेत. परंतु रुपये अद्याप पर्यंत कांहीं दिले नाहींत. तरी या नोटिशीनें आपणास कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्या तारखेपासून १५ दिवसाचे आंत सदरील सावकाराचे रुपये व्याजासुद्धां आणून देऊन त्याची पावती घेऊन जावी. नाहींपेक्षां हीच फारकत असें समजून रितीप्रमाणें व्यवस्था करण्यांत येईल. मग तुमचा आमचा संबंध मुळींच राहणार नाहीं. कळावें. ता. १०-१०-१६ इ. दस्तुर पांडुरंग अनंत पतकी राहणार ब्रह्म

सही
लक्ष्मण वा॥ खंडोजी वारीक याचे
डावे हातचा आंगठा नि॥ असे
द. सदर लिहिणार

नो. नं. ३७७

# वऱ्हाडसमाचार

मित्ति आश्विन वद्य ५ शके १८३८

## वाहत्या गंगेंत हात धुऊन घ्या.

सांप्रतच्या युरोपांतल्या युद्धामुळें हिंदुस्थानाला आपली औद्योगिक उन्नति करून घेण्याची आयती संधी प्राप्त झाली असतां ही त्या संधीचा फायदा अनेक कारणांमुळें आह्मांला करून घेतां येत नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं हिंदुस्थानचा बाजार बहुतेक सगळा अमेरिका व जपान यांनीं हस्तगत केला आहे. त्यांतल्या त्यांत जपान देश जवळ असल्यामुळें व तेथील सरकार मालाची ने आण करणाऱ्या जपानी बोटींना विशेष सवलती देत असल्यामुळें जपानी माल इकडे स्वस्त किंमतींत विकतां येतो. त्यामुळें हिंदुस्थानांत सध्यां जिकडे पहावें तिकडे जपानी माल दिसत आहे. एकट्या संयुक्त प्रांतांत गतवर्षीं १८२५००० ग्रोस आगपेट्या बाहेर देशांतून आल्या, त्यांतल्या १५०,००० ग्रोस आगपेट्या जपानी होत्या असें सरकारी रिपोर्टावरून कळतें. स्वस्त माल काढण्यांत जपानचा हातखंडा असल्यामुळें त्याच्यापुढें हिंदुस्थानचा टिकाव लागत नाहीं. अशी वस्तुस्थिति सर्वथा निराश करणारी आहे यांत शंका नाहीं. तथापि एका बाबतींत हिंदुस्थानाला पूर्ण उमेद बाळगावयाला जागा आहे, आणि ती काचे संबंधाची होय. युद्ध सुरू होतांच इतर मालासारखा काचेचा माल ही जपाननें हिंदुस्थानाला पाठविण्यास सुरुवात केली होती. युद्धाच्या पूर्वीं ४० घनफूट जागेला मालाच्या बोटीवर ६ येन भाडें पडत होतें. तें पुढें १५ येन पडूं लागलें, आणि तेवढें देण्यास जपानला परवडेना ह्मणून जपानी माल येणें बंद झालें. या गोष्टीचा फायदा हिंदुस्थाननें मनांत आणिल्यास त्याला घेतां येण्यासारखा आहे. मद्रास सरकारनें ही काचेचा कारखाना इकडे किफायतशीर चालवितां येईल असें पाहून एक कारखाना उघडला आहे. संयुक्त प्रांताच्या उद्योगखात्याच्या डायरेक्टरांचें ही मत काचचा कारखाना इकडे यशस्वी होईल असेंच आहे. औंध आणि रोहिलखंड रेलवेनें यंदाचे वर्षीं आपणास लागणाऱ्या सगळ्या काचेची खरीदी हिंदुस्थानांतच करण्याचें ठरविलें आहे. आमच्या शेजारच्या मध्यप्रांतांत जबलपूर येथें एक स्वदेशी काचेचा कारखाना उत्तम माल काढीत असतो. या कारखान्यांतले विजेचे ग्लोब व दिव्याच्या चिमण्या चांगल्या पांढऱ्या शुभ्र असून या कारखान्यांतले ग्लास अगदीं बेलज्यमच्या मालासारखे चांगले असतात. या कारखान्याचे चा[illegible] वर व्यवस्थापक मि. मोतीवाला नांवाचे एक पारशी गृहस्थ आहेत. त्यांचें ह्मणणें आहे कीं काचेच्या मालाला रेलवे भाडें फार लागतें. तें जर कमी होईल तर सोडावाटरच्या बाटल्या सगळ्या हिंदुस्थानाला पुरवितां येतील. सरकार येवढ्या बाबतींत स्वदेशी कारखान्याला मदत करील तर पुष्कळ कार्य होण्या सारखें आहे. दुसऱ्याही एका क्षुद्र बाबतींत सरकार कडून या कारखान्याला सवलत हवी आहे आणि ती मिळेल तर या कारखान्याचें पुष्कळ हित होणार आहे. फ्याक्टरी आक्टाप्रमाणें कारखाना आठवड्यांतून एक दिवस बंद ठेवावा लागतो. पण एक दिवस कारखाना बंद ठेवण्यानें कारखान्याची भट्टी थंड होते व त्यामुळें कारखान्याचें नुकसान होतें. गोष्ट क्षुद्र असल्यामुळें येवढी सवलत सरकार या कारखान्याला देईल अशी अपेक्षा करणें गैरवाजवी होणार नाहीं. आमच्या देशांत बांगड्यांचा खप फार दांडगा आहे. एक रुपयाला एक हजार ह्मणजे सरासरी एक आण्याला पांच डझन बांगड्या विकतात. इतका स्वस्त माल मिळून सुद्धां बांगड्या करण्यांत कारखान्याला चांगला फायदा राहतो. युद्ध सुरू होण्यापूर्वीं बांगड्या बेहिमियांतून येत असत. दरसाल ८५ लक्ष रुपयांचा माल इकडे येई, व तो दर डझन जोडास ६ पासून १३ आणे पर्यंतच्या किंमतीस इकडे पडे. जपानी माल २॥ आणे डझन जोड या भावानें इकडे पडत असे. परदेशी मालाच्या या किंमती पाहिल्या ह्मणजे स्वदेशी बांगड्या किती स्वस्त आहेत याची खरी कल्पना करतां येते. इतका स्वस्त माल इकडच्या इकडे मिळूं लागल्यावर परदेशी बांगड्या हिंदुस्थानांत विकल्या जाण्याचा खरोखर कांहीं संभव असूं नये. पण वरच्या सारख्या कित्येक अडचणी

आणि आमच्या लोकांचे चोचले यांच्यापायीं आमच्या स्वदेशी कारखान्यांची खरोखर हानि होत आहे. अजूनही आमच्या सरकारकडून वरील सवलती मिळविण्याची खटपट पुढाऱ्यांकडून होईल व स्वदेशी माल वापरण्याच्या चळवळीला जोर देणारे निघतील तर जबलपुरच्या कारखान्यासारखे कित्येक कारखाने प्रांतोप्रांतीं निघतील. गंगा वाहत वाहत हिंदुस्थानावर आली आहे. तिच्यांत हात धुवून घेण्याची ही संधी जर हिंदुस्थानानें घालविली, किंवा सरकारी नियमांच्या कडकपणामुळें ह्मणा किंवा आमच्या लोकांच्या मूर्खपणामुळें ह्मणा आह्मांला साधून घेतां आली नाहीं, तर आह्मी हल्लींच्या अधःपातासच पात्र आहों असें ह्मणण्याची पाळी येईल. पण तो दयावन प्रभु असा कलंक हिंदुस्थानाला लागूं देणार नाहीं अशी आह्मी खात्री बाळगतों.

---

## लढाई संबधाच्या स्फुट गोष्टी.

सध्याच्या युद्धाचे प्रत्यक्ष भावी परिणाम ह्मणजे लढणाऱ्या राष्ट्रांचे जय अपजय हे तर एकंदर भूगोलाचें राजकीय स्वरूप उलटून टाकण्याच्या इतके महत्वाचे आहेतच; पण अप्रत्यक्ष परिणामही किती निरनिराळ्या प्रकारचे व कल्पनातीत होतील तें सांगतां येत नाहींत. तथापि मनुष्याची बुद्धि कल्पनातीत व अतर्क्य गोष्टीचें आकलन करण्यासच प्रथम धावते. तिची महत्वाकांक्षा जबर आहे. जिनें ईश्वराच्या आस्तित्वाविषयींच नव्हे तर त्याची शक्ति, त्याचें कार्य, व उद्देश यांच्या संबंधानें सुद्धां तर्क चालविण्यास सोडलें नाहीं, ती मानवी कृत्यांचे भावी परिणाम कल्पनेनें ताडण्याच्या प्रयत्नापासून पराङमुख होईल हें शक्य नाहीं. हे प्रयत्न मानसशास्त्राच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचे आहेत, आणि त्यापासून मनुष्याच्या मानासिक बलाविषयींच्या ज्ञानांत बरीच भर पडण्यासारखी आहे यांत शंका नाहीं.

---

युद्ध संपल्यानंतर हिंदुस्थानाला स्वराज्याचे अधिकार कां मिळावयास पाहिजेत या विषयींचीं १२ कारणें एका रंगीत कार्डावर छापून तीं कार्डें लंडन येथें वाटण्यांत आलीं आहेत. हीं कार्डें कोणीं काढलीं तें ठाऊक नाहीं; पण त्यांत दिलेलीं कारणें हिंदुस्थानांत स्वराज्याची चर्चा जोरानें चालली आहे अशावेळीं लोकांचें चित्त आकर्षण करतील यांत शंका नाहीं. कार्डाच्या एका बाजूवर ब्रिटानिया हिंददेवीशीं शेक हांड करून तिच्या पुत्रांनीं योग्य वेळीं राजनीष्ठापूर्वक केलेल्या साह्याबद्दल तिचे उपकार मानून तिला शाबासकी देत आहे असें चित्र असून कार्डाच्या पाठीवर स्वराज्याबद्दलचीं कारणें दिलीं आहेत तीं अशीं:— १ हिंदुस्थानचें अंतिम ध्येय स्वराज्य हें आहे; पण आज निदान राज्यकारभारांत हिंदी लोकांना ज्यास्त अधिकार मिळाले पाहिजेत; २ कारण, कोणताही भेदाभेद न करतां सर्वांना सारखे हक देण्याचें वचन १८५८ सालच्या जाहीरनाम्यानें दिलेलें आहे; ३ हिंदचें अंतिम ध्येय स्वराज्य हे आहे ही गोष्ट ब्रिटिश मुत्सद्दीही कबूल करीत आहेत; ४ हिंदी लोकांनीं पूर्वींच्या काळांत शहाणपणानें राज्यकारभार केला, तसा ते भविष्य काळींही करतील; ५ हिंदी लोकांची बुद्धि गोऱ्या लोकांहून यत्किंचित ही कमी दर्जाची नाहीं. ६ पाश्चात्य शिक्षणानें त्यांच्या महत्वाकांक्षेचें क्षेत्र विस्तृत केलें आहे; ७ आतां पर्यंत कांग्रेसचे काम मोठ्या दूरदृष्टीनें चालवून राजकीय प्रश्नाची चर्चा मोठ्या शहाणपणानें करण्यांत हिंदी लोकांनीं यश मिळविलें आहे. ८ हिंदी लोकांचीं दुःखें हिंदी लोकांना जशीं चांगलीं कळतात, तशी परकीय राज्यकर्त्यांना कळणें अशक्य आहे, ९ ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या तालमींत स्वराज्य चालविण्याचे शिक्षण मिळावें अशी हिंदी लोकांची इच्छा आहे; १० ब्रिटिश लोक नेहमीं न्याय्यपक्षाच्या बाजूनें भांडत असतात, व ब्रिटिश राजनीति उदार आहे; ११ ब्रिटिश लोकांच्या न्यायबुद्धीवर आणि विवेकशक्तीवर हिंदी लोकांची पूर्ण श्रद्धा आहे; १२ जें ब्रिटिश राष्ट्र बेलज्यम व सार्वीया सारख्या लहान लहान परकीय राष्ट्रांच्या स्वातंत्र्य रक्षणासाठीं स्वार्थत्याग करून इतकें जोरानें भांडत आहे व ज्या राष्ट्रानें आपल्या वसाहतींना ही स्वातंत्र्य दिलें आहे तें राष्ट्र हिंदी राष्ट्राकडे न्यायदृष्टीनेंच पाहील.

---

प्रस्तुत युद्धासंबंधानें दरमहिन्याचे महिन्यास सुप्रसिद्ध युरोपियन ज्योतिषी झाडकिल यांचे कडून भविष्य प्रसिद्ध होत असतें व त्यांतला बराच भाग कित्येकवेळां खरा ही ठरतो. आक्टोबर महिन्यासंबंधाचें त्याचें भविष्य असें आहे कीं या महिन्यांत लढाईचे पायीं प्राणहानि व द्रव्यव्यय फार मोठा होईल. ब्रिटिश तिजोरीवर मंगळाचा परिणाम ज्यास्त घडेल. बृहस्पति, शनि व नेपच्यून यांची गति अशी आहे कीं तिच्यावरून तह होण्याचें कांहीं चिन्ह दिसत नाहीं. शुक्राच्या गतीवरून असें दिसतें कीं ब्रिटिश राष्ट्राला मित्र मिळतलि, पण ते दुर्बळ असतील. बुधग्रह बाराव्या गृहांत असल्याचा हा परिणाम होईल कीं दवाखान्यांना काम फार पडेल. बृहस्पति वृषभराशींतून बाहेर पडल्याचा परिणाम आयर्लंडला लाभ हा घडेल, व तेथलीं भांडणें मिटतील.

---

आक्टोबर बद्दलचेंच झाडकिल याचें दुसरें भविष्य असें आहे कीं या महिन्याच्या प्रारंभीं जर पार्लमेंटची निवडणूक झाली तर ती लिबरलपक्षाला विरुद्ध जाईल. कारण ता. १६ आक्टोबर पासून शनि नव्या राशींत जात आहे फ्रान्स व इटली यांच्या इतिहासांतल्या एका नव्या प्रकरणाला सुरुवात होईल. ता. २४ आक्टोबर पासून युरोपांत मोठा कांहीं फेरफार होण्याचा संभव आहे. हा फेरफार ब्रिटिश राज्याला ज्यास्त मजबुती आणील, जर्मनीचा नक्षा उतरील, आणि शत्रूची लष्करी दुर्बळता प्रकट करील.

---

एक जाणता व्यापारी लिहितो कीं हिंदुस्थानांत सध्या सोन्याचा भाव तेजीवर आहे. रशियाला पैशाची अडचण भासूं लागल्यामुळें अनामत ठेवलेली सोन्याची ठेव ब्यांकेला देऊन तिच्या पासून कर्ज काढण्याचा विचार चालला आहे. फ्रान्सांत तर चांदीसोन्याचे दागिने व भांडीं गाळण्याचा क्रम सुरू आहे. इंग्लंडपाशीं ज्यास्तींत ज्यास्ती ५ कोट पौंड किंमतीचे सोनें आहे, व फ्रान्सपाशीं ही तितकेंच आहे. युद्धाच्या सुरवातीपासून आतांपर्यंत दोस्तराष्ट्रांकडून ५० लाख पौंड किंमतीचें सोनें अमेरिकेला मिळालें. जपानला ही तितकेंच मिळालें. स्पेन, स्विझर्लंड, हॉलंड व नॉर्वे यांच्या सोन्याच्या ठेवींत ५॥। कोट पौंड सोन्याची भर पडली हिंदुस्थानांत सध्या गिनी गाळून सोनें करण्याचा क्रम सुरू आहे.

---

## औद्योगिक कमिशनचे प्रश्न.

सर टी. हालंड यांच्या अध्यक्षत्वाखालीं नेमिलेल्या औद्योगिक कमिशननें हिंदुस्थानांतल्या उद्योग धंद्याच्या चौकशीला सुरुवात करण्यापूर्वीं एक लांब लचक प्रश्नमालिका साक्ष देऊं इच्छिणारांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध केली आहे. ती बरीच व्यापक स्वरूपाची आहे. या मालिकेंत सरकारनें नवे कारखाने काढण्यांत अग्रेसरत्व घ्यावें कीं काय असा एक प्रश्न आहे. या प्रश्नाचें उत्तर अर्थात् मागील अनुभवाच्या दृष्टीनें द्यावयाचें असेल तर होय असें द्यावें लागेल. सरकारला भांडवल, शास्त्रज्ञांची मदत, व इतर साधनें यांची अनुकूळता असल्यामुळें जेथें जेथें सरकारनें कारखाने काढले आहेत तेथें तेथें ते यशस्वीच झालेले आहेत. उदाहरणार्थ मद्रासेस मी० चाटर्टन यांच्या नेतृत्वाखालीं अल्युमिनमचा व कातडीं रंगविण्याचा असे दोन कारखाने सरकारनें काढले होते. दोन्ही उत्तम प्रकारें चालले. म्हैसूर येथील सरकारनें चंदनी तेलाचा कारखाना काढला त्याला अजून वर्ष सुद्धां झालें नाहीं, पण इतक्यांतच तो इतका फायदेशीर झाला आहे कीं त्या संस्थाननें आपल्या राज्यांतलें चंदन बाहेर न जाईल, व चंदनाचें तेल काढण्यापासून होणारा फायदा इतरांना न मिळेल अशी तजवीज केली आहे. शिवसमुद्रम् येथील कावेरी नदीच्या धबधब्यापासून विद्युच्छक्ति निर्माण करण्याचा कारखाना हा तर त्या संस्थानला सोन्याची खाणच झाला आहे. अशीं उदाहरणें डोळ्यांपुढें असून आजपर्यंत सरकारनें कारखाने काढण्यांत पुढाकार घेण्यांत संकोचवृत्ति कां ठेवली तेंच कळत नाहीं. सरकारची ही संकोचवृत्ति लोकांच्या मनांत नवे कारखाने काढण्यासंबंधानें शंका उत्पन्न करण्यास कारण झाली आहे असें ह्मटलें तरी चालेल. सरकारनें जर नवे कारखाने काढण्यांत पुढाकार घेतला असता तर आतांपर्यंत काचेचे, रेशमाचे, कागदाचे वगैरे अनेक कारखाने प्रांतोप्रांतीं दिसले असते.

---

## शाळांतून व्यसन निषेधाची शिकवणी.

नुकत्या बाहेर पडलेल्या पंजाबच्या अबकारी खात्याच्या रिपोर्टांत तिकडील शाळांतून व्यसन निषेधाचा प्रसार शाळांतून करण्यासाठीं योजिलेल्या उपायांविषयींची फार बोधप्रद व उपयुक्त माहिती दिलेली आहे. शाळांतल्या मुलांना मद्यपानाचें व्यसन जरी जडलेलें नसलें तरी बिडी ओढणें, नाचतमाशे पाहणें वगैरे सारखीं व्यसनें लागण्यास सुरुवात झाली असते, व यांचा वेळींच निषेध न केल्यास हळूं हळूं मद्यपानापर्यंत मजल जाऊन पोंचण्यास फारसा कालावधि लागत नाहीं. करितां शाळांतून असल्या व्यसनांच्या दुष्परिणामाचें चित्र विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्याची खटपट करणें अत्यंत अवश्य असतें. तंबाखू ओढण्याचे परिणाम शरीरावर कसे घडतात ते दाखविणारे शिक्षण पंजाब सरकारानें प्रत्येक शाळेला देऊन पाहिलें. प्राथमिक शाळांतल्या तिसऱ्या यत्तेच्या वरच्या वर्गांतून क्रमिक वाचनपुस्तकांतून मद्यपान निषेधासंबंधाचे धडे घालण्यांत आले. खालच्या यत्तांतून गोष्टींच्या द्वारें व गाण्यांच्या द्वारें त्या व्यसनाचा निषेध मुलांच्या मनावर बिंबविण्याचे प्रयत्न करून पाहिले. आरोग्यमार्गदर्शक अशा इतर वाचनपुस्तकांतून अशींच प्रकरणें घालण्यांत आलीं. मद्यपाननिषेधक मंडळ्यांनीं पाठविलेल्या उपदेशकांकडून उपदेश करविण्यांत आले. टेंपरन्स म्यागझिन नांवाचें एक सोप्या इंग्रजी भाषेंत चालविलेलें मासिक पुस्तक विद्यार्थ्यांच्या वाचनांत येईल असें केलें; मुलांच्या क्लबांतून त्या विषयावर चर्चा करण्यांत आली. धर्मशास्त्रांतले व्यसन निषेधपर उतारे काढून ते विद्यार्थ्यांच्या हातीं देण्यांत आले; म्याजिकल्यांटर्नच्या साह्यानें सदर विषयासंबंधीं व्याख्यानें देवविलीं. मधून मधून या विषयावर मुद्दाम नाटकें रचून तीं विद्यार्थ्यांकडून रंगभूमीवर करविण्यांत आलीं. या सर्व खटाटोपाचा परिणाम काय झाला? मद्यपानाला कांहीं आळा बसला काय? असा प्रश्न इतक्यांतच विचारणें कदापि योग्य होणार नाहीं. नीत्युपदेश मनावर ठसण्यास अगोदर काळ लागतो व तो आचरणांत प्रतिबिंबित होण्यास तर त्याहून अधिक काळ पाहिजे. तेव्हां पी हळद आणि हो गोरी ह्या ह्मणीप्रमाणें उतावीळपणानें या गोष्टीचा परिणाम पाहण्याची अपेक्षा करूं नये. कदाचित श्रमाच्या मानानें तो जितका घडावयास पाहिजे तितका घडलेला दिसणार नाहीं. पण प्रत्येक शाळेंत अशा प्रयत्नांमुळें दहापांच मुलें जरी मद्यपानासारख्या व्यसनाविषयीं पूर्ण तिरस्कार बाळगणारीं तयार झालीं, तरी केलेल्या श्रमाचें चीज झालें असें ह्मणतां येईल. इतर प्रांतांच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं ही या बाबतींत पंजाब सरकारचा कित्ता उचलला पाहिजे.

---

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत सॉमकडे ब्रिटिश फौजेची चळवळ पुनः सुरू झाली. ब्रिटिश

फौजेनें पुढें चालत जाऊन एक दोन ठिकाणें काबीज केलीं. याच वेळीं दुसऱ्या बाजूनें फ्रेंचांनीं ही शत्रूना जेरीस आणिलें. स्टफ रिडाउट येथें शत्रूची फार हानि झाली. ब्रिटिश शिपाई आरासच्या दाक्षिणेकडील खंदकांतून शिरले व त्यांनीं २०० लोक कैद केले. फ्रेंच तोफखान्याची चळवळ बार्ले, बेलाय व डेनीकोर्ट येथें विशेष आहे. गेल्या दोन महिन्यांत जर्मनीला एकसारखे अपजय मिळत गेल्यामुळें ते हताश होत चालले आहेत. जर्मन पायदळांत ही खिन्नता विशेष दिसते. जर्मन शिपाई लढाईत मरण्यापेक्षां ब्रिटिशांना शरण जाऊन प्राणरक्षण करून घेण्यास तयार आहेत, पण जर्मन आधिकारी तसें करूं देत नाहींत, व कोणी अधिकाऱ्यानें या कामीं ढिलाई दाखविल्यास त्यालाच गोळी घालून मारण्यांत येतें. जर्मनशत्रु बिळांतल्या उंदराप्रमाणें जमीन पोंखरून तींत तळघरें करून राहिले आहेत. चाळीस फूट खोलीपर्यंत ही तळघरें असून त्यांत हजारों शिपाई राहिलेले आहेत. या तळघरांना लोखंडी खांबाचे आधार दिलेले असून विजेचे मोटार चालवून त्यांच्याद्वारें तळघरांतल्या लोकांना ताज्या स्वच्छ हवेचा पुरवठा नळ्यांतून करण्यांत येत असतो. आंत सर्वत्र विजेचे दिवे व विजेच्या घंटा लाविल्या आहेत. जणू काय हें पाताळांतलें बळीचें राज्यच अशी सगळी व्यवस्था उत्तम आहे. अशा तळघरांत जर्मन लोक निश्चिंतपणें बसले असतां फ्रेंचांनीं अवचित छापा घातला, तेव्हां जर्मनांना पळणें मुष्किल झालें.

## मासिडोनियांतला प्रकार.

या रणक्षेत्रांतल्या मुख्य ठाण्याचे जागीं असलेला रूटरचा बातमीदार कळवितो कीं तिकडे ब्रिटिश तोफखाना बलगर लोकांचीं हाडें चांगलींच नरम करीत आहे या क्षेत्रांत एका ठिकाणीं जमिनीवर जर्मन प्रेतांचा सडा पडलेला दिसत होता. ब्रिटिश पायदळाची ही कामगिरी प्रशंसनीय होती.

## सर्वियनांचा जय.

सार्वियन लोकांना लढण्याला नवा हुरूप आलेला आहे. ते जिकडे जातात तिकडे फते मिळवून येतात. तोफखान्याचें भय त्यांना मुळींच वाटत नाहीं. डो ब्रोपोलजे शिखर त्यांनीं हस्तगत केलें. मोनास्टिरच्या अगदीं जवळपर्यंत ते जाऊन पोंचले आहेत.

## पूर्व रणक्षेत्र.

या रणक्षेत्रांत ब्लाडिमिरच्या बाजूला घोर संग्राम सुरू आहे. शत्रूच्या फळीवर हल्ला करावयाचा येवढेंच कार्य करून रशीयन स्वस्थ बसत नाहींत. तर काबीज केलेल्या ठाण्यांची मजबुती करून सर्व प्रांत सलग करून आपल्या हातीं ठेवावयाचा हें त्यांचें धोरण आहे.

## जर्मनी आणि अमेरिका.

जर्मन लोकांनीं पोलांड घेतल्यापासून तेथील लोकांचे अवर्णनीय हाल मांडिले आहेत व त्यांची उपासमार करीत आहेत या बद्दल अमेरिकन प्रेसिडेंट विल्सन यांनीं जर्मनीची कानउघाडणी केली होती. त्या खलित्याचें उत्तर जर्मन बादशहानें कौंट बर्नस्टॉर्फ यांचे हातीं पाठविलें आहे हें उत्तर घेऊन कौंटची स्वारी यू ५३ नांवाच्या सबमरीन बोटीनें अमेरिकेला गेले. पण तटस्थ राष्ट्राच्या किनाऱ्यापाशीं सबमरीन बोट नेणें हेंच कृत्य गैरकायदेशीर असल्यामुळें अमेरिकन लोक चिडले आहेत. यू ५३ ही सबरीन बोट २०० फूट लांबीची असून तिच्यावर २ तोफा व ४ टार्पेडो नळ्या आहेत. येवढी मोठी सबमरीन बोट जर्मन कौंटानें अमेरिकन किनाऱ्याला नेली ती अर्थात् कांहीं विशिष्ट हेतूनें नेली असली पाहिजे. पण प्रेसिडेंट विल्सनचा भोळेपणा इतका विलक्षण आहे कीं त्यांना त्यांत जर्मनीचा सद्धेतुच दिसत आहे! युद्धाला नुकताच प्रारंभ झाला होता अशा वेळीं कांहीं ब्रिटिश क्रुझरें अमेरिकेच्या जवळ गेलीं असतां ज्या प्रेसिडेंटांनीं त्यांना हरकत घेतली होती तेच जर्मन सबमरीन खुशाल येऊं देतात ही अमेरिकेची वागणूक अर्थात् आक्षेपार्ह आहे, आणि पुढें मागें इंग्लंडला या बद्दल अमेरिकेला जबाब विचारतां येईल.

## लढाई संबंधाच्या इतर बातम्या.

१७ वर्षांच्या वयाच्या तरूणांना लष्करी नोकरीसाठीं जर्मनसरकारकडून बोलावण्यांत आलें आहे.

युद्धासाठीं जर्मनसरकारनें काढलेल्या नव्या कर्जाची स्थिति समाधानकारक नाहीं. जर्मनीला एकसारखें अपयश येत आहे यामुळें कर्ज मिळण्यास मोठी पंचाईत पडत आहे.

सपटेंबर अखेरपर्यंत जर्मनीला युद्धाचा खर्च २६ अब्ज पौंड आला आहे.

अमेरिका आपल्या तोफखान्याची नवी व्यवस्था करीत आहे. या व्यवस्थेंत तोफखान्याच्या गाडीला घोडे जोडण्याचे ऐवजीं सर्वत्र मोटारचा उपयोग करण्यांत येणार आहे.

जर्मनीनें तुर्कस्थानला आपल्या पक्षाला ओढलें या गोष्टीचें स्मारक ह्मणून मार्मोरा समुद्राचे किनाऱ्यावर एक मोठी इमारत बांधण्यांत येणार असून तींत एक सभेचें दालन, एक चहाकाफीचें दालन, एक प्रदर्शनाचें दालन असे निरनिराळे भाग करण्यांत येणार आहेत. प्रदर्शनांत उद्योग, हुन्नर, कला इ. चे नमुने ठेविले जावयाचे आहेत.

## औद्योगिक कमिशन व सामान्य सूचना

(लेखकः—त्र्यंबक सिताराम दिघे वकील आकोला.)

औद्योगिक कमिशन पुढें कोणकोणत्या प्रश्नांचा उहापोह केला जाईल या संबंधीं माहिती प्रसिद्ध करण्यांत आलि आह; तिजवरून असें दिसतें कीं या कमिशनच्या बैठकी नंतर हिंदुस्थानची औद्योगिक बाबतींतील सर्व गाऱ्हाणीं नष्ट होऊन औद्योगिक स्वातंत्र्य हिंदुस्थानांत मिळणार व उद्योगधंद्याच्या व व्यापाराच्या शिखरावर हिंदुस्थान खास बसणार. परंतु असल्या कमिशनावर ज्यास्त भिस्त ठेवूं नका असें वाच्छा यांनीं "इंडियन मर्चंटस्च्या चेंबर" पुढें केलेल्या भाषणांत स्पष्ट सांगितलें आहे. आपल्या ३०।४० वर्षांच्या अनुभवावरून ते असें ह्मणतात कीं साधारणतः ही कमिशनें पूर्ववत् स्थिती जशीच्या तशीच कायम ठेवितात; यांच्यापासून हिंदुस्थानच्या लोकांचा आजपर्यंत फारसा फायदा झालेला नाहीं त्यांचे शब्द येथें दिल्यास वावगें होणार नाहीं ह्मणून ते दिले आहेत. ना. वाच्छा ह्मणतात

"Pray do not trust much in Commissions industrial or any others. My experience teaches me that they are after all a make believe. In the long run their recommendations are a change from Twedledum to Twedled. Any how let others be as optimistic as they may I for one shall always remain a minstrel of pessimism in reference to these bodies, which gene rally leave things where they were before."

हें वाच्छा साहेबांचें भाषण वांचलें ह्मणजे असा प्रश्न मनांत उभा राहतो कीं यांचें ह्मणणें बरोबर आहे कीं चुकीचें आहे? चुकीचे आहे ह्मणावें तर त्यांनीं हिंदुस्थानच्या राजकीय, औद्यौगिक, आर्थिक व व्यापार विषयक प्रश्नासंबंधीं अभ्यास करण्यांत व विचार करण्यांत आपल्या आयुष्याची उत्तमोत्तम अशी ३०।४० वर्षें वाळविलीं आहेत; शिवाय युनिव्हर्सीटी कमिशन, पोलीस कामिशन, फॅक्टरी कामिशन डिसेन्ट्रलायझेशन कामिशन, करन्सी कमिशन याच्या खटाटोपा नंतर हिंदुस्थानचे लोकांचा अगदींच क्षुल्लक फायदा झाला असल्याबद्दलचा भरभक्कम पुरावा त्यांस पुष्टी देत आहे तेव्हां ते चुकले असें ह्मणणें रास्त होणार नाहीं. बरें त्यांचें ह्मणणें अगदीं तंतोतंत बरोबर आहे असेंही ह्मणतां येत नाहीं. ना. वाच्छा यांचें ह्मणणेंच जर बरोबर असतें तर हिंदुस्थानांतले इतके विद्वान लोक मूर्ख ठरले असते, कारण आपला बहुमोल वेळ खर्च करून कामिशनापुढें साक्ष देण्याकरितां त्यांच्यापैकीं कोणीही पुढें आला नसता. पण वस्तुस्थिती पहावी तर जरा निराळी दिसते. या वरून असें वाटतें कीं तथ्य या दोन मतांच्या दरम्यान कोठें तरी असावें. कमिशनांचा आजपर्यंतचा इतिहास ना. वाच्छा यांच्या ह्मणण्याप्रमाणें निराश करण्यासारखा असला तरी या कमिशनापासून त्या त्या विषयांची चर्चा होऊन प्रजेचें मत काय आहे हें तरी निदान राजकर्त्यांच्या कानावर जाते. व त्यामुळें थोडा बहुत तरी आमचा फायदा झाला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानचे लोक आशावादी आहेत व हिंदुस्थान इंग्लंडचे राज्यछत्राखालीं राहिल्यापासूनच हिंदुस्थानची उन्नत्ती होणार आहे असा त्यांना भरवसा आहे. परंतु आलिकडे ना. वाच्छा यांच्या सारखा अस्सल आशावादी वर्ग सुद्धां कामिशनांच्या डोंगर पोखरून उंदीर काढण्याच्या पद्धतीमुळें निराशावादी बनत चालला आहे ही गोष्ट नाकबल करतां येणार नाहीं. अलीकडील सुशीक्षित वर्गाकडे पाहिलें तर नुकत्या सुरूं होणाऱ्या औद्योगिक कामिशनच्या बैठकींत कोणकोणत्या प्रश्नाचा उहापोह केला जावा अशी सरकारकडून विचारणा प्रदर्शित केली जात असतांना सुद्धां या वर्गास या कामिशनचें फारसें महत्व वाटत नाहीं व ज्या प्रमाणांत सूचना व्हावयास पाहिजेत त्या प्रमाणांत सृचना आलेल्या नाहींत. सुशीक्षित समाजामध्यें या कामिशनासंबंधीं उत्साह कां दिसून येत नाहीं या प्रश्नाचें उत्तर वर दिलेल्या ना. वाच्छा यांच्या उताऱ्यांतच आहे. परंतु असा निरुत्साह असणें हें राजकर्त्यांच्या व प्रजेच्या दोघांच्याही हितसंबंधास चांगलें नाहीं. लोकांच्या टीकेकडे लक्ष देऊन सरकारनें या औद्योगिक कामिशन वर तरी निदान "डोंगर उकरून उंदीर काढला" असें ह्मणण्याची पाळी न आणावी एवढीच आमची इच्छा आहे व ह्मणूनच खालीं लिहिलेल्या सूचना केल्या आहेत.

सरकारनें उद्योग धंद्याना किती तऱ्हेनें मदत द्यावी या संबंधांत कमिशन पुढें ९ सूचना आल्या आहेत त्या येणेंप्रमाणें:—

(१) कर्ज किंवा पैशाची मदत (२) यंत्र सामुग्री सरकारनें पुरविणें व ती कारखानदारांना त्यांचे हातीं पैसे येतील त्या प्रमाणें ते घेऊन त्यांस ती विकणें (३) अमुक एक मुदतपर्यंत ठरावीक फायदा देण्याचें कबूल करणें व तसा फायदा देण्यांत सरकारला कांहीं झीज सोसावी लागल्यास ती सोसणें (४) कांहीं एक मुदत पर्यंत सरकारनें माल विकत घेण्याचें आश्वासन देणें (५) जमिनी संबंधी सवलत देणें (६) रेल्वेवर माल नेण्याआणण्याच्या व भाड्याच्या विशेष सवलती देणें (७) कांहीं एक ठराविक रक्कम बक्षिसा दाखल देणें (८) स्वतः कारखाने काढून ते खाजगी कंपन्याचे हवालीं करणें (९) सरकारी तज्ञ कारखानदारांच्या मदतीस देणें.

या ज्या ९ सूचना आलेल्या आहेत त्यांत अतिशय महत्वाची ह्मणजे "परदेशी मालावर जकात बसविणें" य सूचनेचा कमिशननें काढलेल्या प्रिलिमिनरी नोट मध्यें कोठें मागमूस लागणारा [illegible]मत नाहीं.! खुल्या व्ही. पी. नें पाठवूं. आमचे धंदे व मुर्डी आतां कांहीं जि० रत्नागिरी नाहीं. व पद्धती [illegible] या जरी

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख २३ माहे आक्टोबर सन १९१६ ई० [ अंक ४२


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिज्वर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक, आकोला ९।९।०९ — Lyon Scott, एजंट

नो. नं १

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमर्शियल अशूअरन्स** कंपनी लिमीटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने व माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा. वि. रा सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज

धी एशियन कमार्शियल अशूअरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज. फोर्ट, मुंबई,

नो० नं० ३६९

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३ ४, ५. वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५ शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥, २, ३, ४. अंगठी किं. रु. १, १॥. सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं रु. १॥,२,२॥. कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः— **मगनलाल के. आणि कंपनी,** गिरगांव मुंबई.

## खात्रीचा तयार केलेला. ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्वे मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुट्टन अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर

पत्ता

रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं ६

## अस्सल अंगुरी. हिंग

रु. ४ शेर, पवित्र केशर रु. १८२ आणि १८७ तो. खालिस कस्तुरी रु२५ तो. शुद्ध शिलाजीत ८९ तो. सुर्मा ममीरा रु. ३ तो. स्याहजीरा रु. २ शेर, मुरब्बा बादाम रु. १ शेर

काश्मीर स्टोर्स श्रीनगर न० ६

## चांदीचीं भांडीं.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन रविवार पेठ नाशिक सिटी.**

नो. नं. ४

दिवाळीकरिता सुगंधी मालाची प्रचंड लूट. !!

# आर्यवनौषधालय—मुर्डी.

स्वदेशी. **दिपावली.** ॐ नमः श्रीगणेशाय. **दिवाळी.** स्वदेशी.

सावध रहा. फसूं नका.

## अति उंची सुगंधि अत्तरांच्या पेट्या.

प्रत्येक पेटीची किंमत पो. ख. सह ( १८१० )

या पेट्या उत्तम सागाच्या लांकडाच्या मजबूत तयार करून त्यावर उत्तम पॉलिश केलेलें आहे. यामुळें पेटी विशेष मनोहर बनली आहे. या पेटींत गुलाब, हिना, वाळा, केवडा इत्यादी अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, उंची बेलिया बाटली एक, सुगंधी उटणें, गंधाचे रवे, स्त्रियांकरितां लालभडक कुंकू व हळद, असे एकंदर सुगंधि अकरा पदार्थ ठेविले आहेत. पेटींतील सर्व सुगंधि माल फार उत्तम ठेविला असून, तो सर्वांना घेण्यास जबर वाटूं नये ह्मणून आह्मी आपला कोणत्याहि तऱ्हेचा फायदा ठेविला नसून प्रत्येक पेटीची किंमत पो. ख. सह अवघी १८१० ठेविली आहे. वरील वर्णनावरून पेटीची किंमत किती अल्प ठेविली आहे, हें पेटींतील सर्व सुगंधि माल लक्ष्यपूर्वक पाहिल्यास सहज कळून येईल. या पेट्या आह्मी अगदीं अल्प किंमतीला देत असल्यानें त्यांचा अतिशय खप होणें अगदीं साहजिक आहे. यामुळें आमच्याशीं स्पर्धा करण्याकरितां इकडे कांहीं ठिकाणीं याहूनहि सवंग सवदाच्या भिकार मालांनीं भरलेल्या पेट्या निघालेल्या आहेत. करितां मोहक वर्णनाला न भुलतां खऱ्या उत्तम पेट्या आमच्याशिवाय इतरत्र मिळत नाहींत हें अवश्य लक्ष्यांत ठेवून सर्वांनीं याच पेट्या उपयोगांत आणाव्या. इतकेंच आग्रहपूर्वक सांगणें आहे.

## उंची बादशाही अत्तरांच्या पेट्या.

पेटीची किंमत पो. ख. सह तीन रुपये.

ही पेटी सागाच्या लांकडाची फारच सुबक बनवून वर सुरेख पॉलिश केलें आहे. या पेटींत सुरंगी, मालती, राजविलास, इत्यादि बादशाही अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, बादशाही केशसौगंधिनी तेल बाटली एक, उटणें, गंधाचे रवे व स्त्रियांकरितां कुंकू, हळद व काजळ असे एकंदर बारा बादशाही सुगंधि पदार्थ ठेविले आहेत. इतकें असूनही या पेटीची किंमत अगदीं अल्प पो. ख. सह ३ तीन रुपये ठेविला आहे. पेटींतील प्रत्येक मालाचे निरीक्षण केल्यास आह्मी ही ठेविलेली किंमत फारच अल्प ठरलं. तरी सर्वांनीं पेट्यांचा अवश्य उपयोग करावा. पेटींतील सर्व माल अति उंची असाच वापरला आहे. पाहिल्यावर सहज खात्री होईल.

**बादशाही अत्तरें**—सुरंगी, मालति, पुष्पराज, गंधराज, लक्ष्मिविलास, मदनविलास हीं प्रत्येकीं दर तोळ्यास ३ रुपये.

**सुगंधि अत्तरें**—गुलाब, हिना, केवडा, अंबर, मोतिया, बकुल वगैरे दर तोळ्यास १ रु.

**जीवनपुरी तेलें**—बेलिया, चमेली, हिना मसाला दर १० तोळ्यांस १ रुपया.

**विशेष सूचना**—वरील अत्तरांच्या पेट्या एकदम चार घेणारास एक पेटी, सात घेणारास दोन पेट्या, बारा घेणारास चार पेट्या, कमिशन दाखल फुकट देऊं. तरी एकदम गटानें पेट्या मागवून आपला फायदा करून घ्यावा. अत्तर पाव तोळ्याचे आंत मिळणार नाहीं. कित्येक आपला बनावट माल दुसऱ्याची निंदा करून खपविण्याची प्रयत्न करीत आहेत. तथापि आमचा माल खरा उत्तम असल्यानें, तो खपविण्यास आह्मांस विशेष स्तुति किंवा दुसऱ्याची निंदा करण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण खऱ्यामालाचें सर्वत्र चहाते असावयाचेच सबब दिवाळीचे सणास लागणारा सर्व माल आमचे कडूनच मागवावा. सर्व माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य मुर्डी
पो० ..वर जि० रत्नागिरी

नो. नं. ३५०


व
हिंदी
याप्रमाणें
लोकांना

ज्या मर्दुमकं
खटपट हा
नाजूक
हटावें
तथ

वऱ्हाडसमाचार

मित्ति आश्विन वद्य १२ शके १८३८

## नूतन भारतवर्षाचे संमोह.

हिंदुस्थान अथवा स्वाभिमानाच्या भाषेंत बोलावयाचें ह्मणजे आमचा हा भारतवर्ष संक्रमणावस्थेंत आहे अशी भाषा आज पंनास वर्षें आमच्या वापरण्यांत व श्रवणांत आहे. पण हें संक्रमण केव्हां संपणार आणि त्याला स्थिरता केव्हां येणार हें निश्चितपणें कोणालाच सांगतां येत नाहीं. इतकेंच नाहीं, तर हें संक्रमण वाइटांतून चांगल्याकडे आहे कीं चांगल्यांतून वाइटाकडे आहे या संबंधानें सुद्धां विचारी लोकांत एकमत झालेलें दिसत नाहीं. जुनी प्राच्य संस्क्रृति व नवी पाश्चात्य संस्क्रृति यांच्या संघर्षामुळें उत्पन्न होणाऱ्या उष्णावस्थेंत तो सध्या आहे असें ह्मणणें अधिक सयुक्तिक होईल. जुन्या संस्कृतीचे धागे आतां बहुतेक संपत आले असून नव्या पाश्चात्य सुधारणेचा संबंध पाश्चात्य शिक्षण व पाश्चात्यांचा संसर्ग यांमुळें अधिक निकट येत चालल्यामळें कालगतीनें भारतवर्ष इतर पाश्चात्य राष्ट्राप्रमाणें भौतिक सुधारणेच्या प्रचंड ओघांत सापडून आपलें अध्यात्मिक स्वत्व घालवून बसणार अशी भीती कित्येकांना वाटत आहे; तर याच्या उलट असें झाल्यास भिकाऱ्याचे घरीं कामधेनु आली, व अन यासें देव पावला असा आनंद कित्येकांस होत आहे. सत्य हें नेहमीं दोन ध्रुवांच्या मध्यें असतें हा नियम या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें ही खरा ठरेल अशी आमची स्वतःची खात्री आहे. तथापि सुशिक्षित लोकांपैकीं पुष्कळांचें मत बहुधा पाश्चात्य सुधारणेच्या उपकारित्वाला सर्वस्वी अनुकूळ आहे हें सांगावयास नकोच. आज राजकीय हक्कासाठीं, स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठीं, औद्योगिक उन्नतीसाठीं लोकांची धडपड ह्मणा, बडबड ह्मणा, सुरू आहे. या चळवळींच्या गर्दीपुढें दुसरें कांहीं कोणाला सुचत नाहीं. कोणी स्वराज्य मागण्यांत, तर कोणी स्त्रियांची युनिव्हार्सिटी काढण्यांत, कोणी समाजसेवा संघ स्थापण्यांत, तर कोणी नवे नवे कारखाने काढण्याच्या विचारात अगदीं चूर झाले आहेत. प्रत्येकाला आपल्या कृतीचा समाजावर व राष्ट्रावर जादू सारखा विलक्षण परिणाम होणार आहे असें मनापासून वाटत आहे व त्या श्रद्धेनें तो सोन्याचा दिवस जवळ ओढण्याला तो पाहत आहे. पण या धडपडीकडे शांत व निर्विकार दृष्टीनें पाहणाराच्या दृष्टीला कांहीं निराळाच प्रकार दिसण्याचा, कांहीं निराळेच [illegible]चार सुचण्याचा व त्या विचारांपासून [illegible] हिताच्या चळवळीला निराळें इष्ट व[illegible]चा संभव आहे. ह्मणूनच प्रत्येक[illegible] चशा कर्त्या माणसांबरोबर कांहीं तात्विक विचाराचीं ही माणसें लागते. कलकत्त्याचे बाबू प्रमथनाथ बोस तत्त्वविवेचकांत अग्रगण्य आहेत.

अलीकडे नूतन भारतवर्षाचे संमोह अशा अर्थाचें नांव दिलेला सुमारें तीनशें पृष्ठांचा एक ग्रंथ इंग्रजींत लिहिला आहे. त्यांनीं भारतवर्षाच्या सद्यः स्थितीचें राजकीय, सामाजिक, शिक्षणविषयक, नीतिविषयक, सांपत्तिक, औद्योगिक, इ. सर्वांगीन सूक्ष्म निरीक्षण करून त्यावर कांहीं सिद्धांत प्रस्थापित केले आहेत. हे सिद्धांत थोडक्यांत सांगावयाचे ह्मणजे येणें प्रमाणें आहेत—

१ भारतवर्षाची स्थीति फारशी भयंकर नसली तरी विशेषशी समाधानकारक नाहीं. त्याची प्रकृती अस्वस्थ आहे.

२ त्याला जी व्याधि जडली आहे तिचा जोर अलीकडे वाढत चालला आहे, व लवकरच असाध्यपणाचीं लक्षणें कदाचित् दिसूं लागतील असा संभव दिसतो.

३ ही व्याधि एकटी नसून संकीर्ण स्वरूपाची असल्यामुळें तिच्यावर इलाज फार विचार पूर्वक करावयास हवेत.

४ सध्या जे इलाज चालू आहेत, त्यांत दूरदृष्टी कमी आहे. रोग्याच्या प्रकृतीला अयोग्य असे ते इलाज आहेत.

५ रोग्याची मूळची शरीरप्रकृति सुदृढ असल्यामुळें रोगाशीं झगडतां झगडतां इतके दिवस त्यानें काढले. पण इतका दीर्घकालपर्यंत टिकाव धरला येवढ्यावरून रोग हटला असें समजणें ही चूक आहे.

६ रोग्याची असाध्यावस्था आहे असें नाहीं. पण हल्लींचेच उपाय पुढें चालू राहिले तर मात्र ती अवस्था प्राप्त होण्याची भीती आहे.

हे सगळे सिद्धांत जवळ जवळ निराशा उत्पन्न करणारे आहेत असें वाटण्याचा संभव आहे. दुसऱ्याच्या कृतींत दोष दाखविण्याचें काम सोपें आहे; हल्लींचे उपाय चुकलेले आहेत असें जर मि बोस यांस वाटत असेल तर योग्य इलाज कोणते ते दाखविण्याची जबाबदारी त्यांचेवर आहे असें कोणी ह्मणेल. तर आपल्या रामबाण मृत्युंजय मात्रांचा बटवा ही त्यांनीं बरोबर आणिला आहे. या मात्रा कोणत्या व त्याचें अनुपान काय आहे वगैरे गोष्टी हिंदुस्थानचें कल्याण चिंतणारांनीं प्रांजलपणानें विचार करण्यासारख्या असल्यामुळें मि. बोस यांच्या पुस्तकाची विस्तृत समालोचना करण्याचें आह्मी योजिलें आहे. मि. बोस यांच्या मताचें थोडक्यांत सार देऊन त्याच्या बरोबरच त्यांच्या मतासंबधानें आह्मी आपले अनुकूल किंवा प्रतिकूल विचार प्रकट करणार आहों. इतकें सांगून हा प्रास्ताविक लेख संपवितों, आणि पुढील लेख निर्विकार दृष्टीनें व शांत मनानें वाचण्याविषयीं वाचकांस साग्रह विनंति करून ठेवतों.

## जर्मन मार्शल हिंडेनबर्ग.

सांप्रतच्या महायुद्धांत मार्शल हिंडनबर्ग यांचें नांव वारंवार ऐकूं येतें. पण त्यांचें [illegible]रित्र फार थोड्यांना ठाऊक असेल. तें [illegible] फार गमतीचें आणि बोधप्रद [illegible]ल्यामुळें त्यांतल्या ठळक गोष्टी येथें

या जर्मन सेनापतीचें वय हल्लीं ६९ वर्षांचें आहे. हल्लीं यांची मूकवृत्ती बद्दल प्रसिद्धी आहे. पण लहानपणीं यांचा स्वभाव इतका बडबड्या होता कीं यांनीं शाळा सोडली तेव्हां त्यांना जें सर्टिफिकेट मिळालें त्यांत त्यांच्या बडबड्या स्वभावाचा उल्लेख करण्याची अवश्यकता त्यांच्या शिक्षकाला दिसली होती. सध्या ते एक उत्तम सेनापति ह्मणून प्रसिद्ध आहेत, व जर्मन सेनापतींना लष्करी विधिसंबंधाचें गणित चांगलें यावें लागतें. पण विद्यार्थी दशेंत यांचें व गणितविषयाचें अगदीं हाडवैर होतें. हिंडेनबर्ग यांचें घराणें कित्येक पिढ्यांत लष्करी पेशाचें आहे. या घराण्यांतले २३ पुरुष आतां पर्यंत निरनिराळ्या युद्धांत लढले आहेत. खुद्द हिंडेनबर्ग स्वतः १८६६ पासून लढायांत लढत आहेत. पण १९१४ पर्यंत त्यांची लष्करी अधिकारी म्हणून मुळींच प्रसिद्धी नव्हती. हे मोठे भाग्यवान् आहेत खरे. १८७० च्या लढाईत यांच्या टोपीला भोक पाडून एक गोळी त्यांच्या डोक्याला चाटून गेली होती. दुसऱ्या एका लढाईंत यांच्या खालचा घोडा ठार होऊन यांच्या अंगावर पडला होता. पण हे दोन्ही संकटांतून वाचले. यांनीं जन्मभर लष्करांत नोकरी करून पांच वर्षांपूर्वीं पेनशन ही घेतलें. यांना पेनशन घेईपर्यंत लोक वेडे समजत व थट्टेनें 'जनरल मड' (चिखल)' म्हणत. कारण कोणत्या जातीच्या मातीच्या चिखलांतून तोफा नेण्याला किती कमी ज्यास्ती वेळ लागतो, वगैरे गोष्टींचे प्रयोग करून पाहून त्याबद्दलचीं टांचणें करण्याचा त्यांना नाद असे. त्याच प्रमाणें निरनिराळ्या जातींच्या गोळयांचा व बांबचा कसा काय परिणाम होतो हें पाहण्यासाठीं कांहीं सरोवरांत ते गोळे व बांब टाकून त्या बद्दलचीं टांचणें करून ठेवीत त्यावरून लोकांनीं त्यांना वेडे ठरविलें होतें. अशा विचित्र नादीं स्वभावामुळें ते नोकरींत असतांना कधी फारसे चमकले नाहींत. सध्याचें युद्ध चाललें असतां ही ते आपल्या खेडेगांवांत अगदीं मुकाट्यानें कोणाशीं कांहीं न बोलतां पण गंभीर मुद्रेनें तासचे तास विचार करीत बसलेले आढळत त्यांना बुद्धिबळें खेळण्याचा नाद आहे. यांच्या सारख्याच मौनी अशा एका लष्करी पेनशनरा बरोबर ते बुद्धिबळें खेळत बसत. खेळतांना तोंडांतल्या चिरुटाच्या धुरानें सगळी खोली भरून जाई, क्वचमध्यें गेले तरी कोणाशीं मन मोकळें करून बोलणें थट्टा मस्करी, वगैरे कांहीं करणें यांना ठाऊक नाहीं. तथापि हे दयाळु आहेत येवढें मात्र त्यांच्या हाताखालच्या मागसांना ठाऊक असल्यामुळें ते सर्वांना प्रिय वाटत. युद्ध सुरू झालें, तेव्हां आपण लष्करी नोकरी करण्यास तयार आहों असें यांनीं सरकारास कळविलें, पण यांना घेण्यांत आलें नाहीं. पण मॉन्सच्या लढाई नंतर यांचें दैव एकाएकी उघडलें. जनरल लडनडॉर्फ यांनीं यांचें नांव कैसरला सुचविलें, तेव्हां त्या वेड्याला घेऊन काय उपयोग होणार असें ह्मणून कैसरनें उपहास केला. पण योगायोग विचित्र होता. लडनडार्फ यांच्या शद्बाला मान देऊन कैसरनें त्यांची नेमणूक पूर्व रणक्षेत्रांत केली व तावडतोब आपल्या जागेवर रुजू व्हावें ह्मणून हुकुम केला. त्या वेळीं हिंडेनबर्ग जवळ गरम कपडे नव्हते, फार काय, पण आपला लष्करी पोषाख झाडून पुसून साफ करण्याला ही त्यांना वेळ मिळाला नाहीं. लष्करांत पुनः शिरल्यावर लवकरच दैवानें त्यांना हात दिला व त्यांनीं रशियनांचा पराभव केला. तेव्हां कैसरनें त्यांना एकदम त्या रणक्षेत्रांतल्या सैन्याचे अधिपति केलें हां हां ह्मणतां ते जर्मन सैन्याच्या व जर्मन बादशहाच्या गळ्यांतले ताईत बनले. अजून सुद्धां त्यांचा तऱ्हा विचित्र आहे. ते काय करावयाचें याचा नकाशा तयार करीत नाहींत. नेहमीं चिरूट पीत पीत मनाशीं विचार चालला असतो. हे मोजके शद्ब बोलतात. पण वेळ आली ह्मणजे बादशहाला सुद्धां आपल्या स्पष्टवक्तेपणानें चाकित करून सोडतात. बादशहा त्यांचें ऐकत नाहीं ही गोष्ट खरी; पण हे स्पष्टपणें बोलण्यास सोडीत नाहींत. बादशहाच्या तोंडावर तुह्मी अमुक ठिकाणीं चुकलां असें स्पष्ट सांगतात. यांच्या विषयीं यांच्या शिपायांचे ठायीं विलक्षण आदरबुद्धि आहे. हे संधिवातानें आजारी आहेत अशी एकदा गप्प उठली होती. ती ऐकतांच लोकांनीं या रोगावरच्या औषधाच्या गाड्या भरून त्यांच्याकडे पाठविल्या होत्या! यांचा एक भव्य पुतळा उभारण्यांत आला आहे, आणि सध्या जर्मन सैन्यांत यांच्या इतका मान दुसऱ्या कोणाचा ही नाहीं असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

## उन्नतिशील ह्मैसूर.

हिंदुस्थानचे लोक केवळ कल्पनेच्या भराऱ्या मारण्यांत कुशल आहेत, त्यांच्यांत कर्तृत्वशक्ति नाहीं असे प्रलाप सर व्हॅलेन चिरोल यांनीं नुकतेच सिमला येथील आपल्या एका भाषणांत काढले होते. त्याला खासें उत्तर ह्मैसूरचे दिवाण सर विश्वेश्वर अय्या यांनीं आपल्या शद्बांनीं नव्हे तर कृतीनें दिलें आहे. गेल्या दसऱ्याचे वेळीं ह्मैसूर येथें भरलेल्या लोकप्रातिनिधि सभेपुढें त्यांनीं आपल्या राज्यकारभाराचा जो रिपोर्ट मांडला तो या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. सक्तीच्या शिक्षणाचें बिल प. वा. नामदार गोखले यांनीं वरिष्ठ कायदेकौंसिलापुढें मांडिलें होतें तेव्हां त्याला विरोध करतांना अनेक सरकारी मेंबरांनीं असें काल्पनिक भय सुचविलें होतें कीं ही सुधारणा लोकांत निष्कारण क्षुब्धता उत्पन्न करील. सर विश्वेश्वर अय्या यांचा अनुभव याच्या अगदीं उलट आहे. त्यांनीं सांगितलें कीं गेल्यासालीं ह्मैसूर संस्थानांत एकंदर २७ ठिकाणीं सक्तीच्या शिक्षणाचा कायदा अमलांत होता आणि ३० नव्या शाळा उघडण्यांत आल्या, पण या ठिकाणीं सक्तीचा उपयोग फारच क्वचित् करावा लागला! इतकेंच नाहीं तर आह्मांस तो कायदा लागू करा असे अर्ज इतक्या ठिकाणांहून आले कीं खर्चाची व शिक्षकांची तजवीज या दोन गोष्टींची तितकी अनुकूलता नसल्यामुळेंच ते सगळे अर्ज

मंजूर करतां आले नाहींत. तसेंच कायदे-कौंसिलाच्या बैठकी वारंवार व्हाव्या असें जेव्हां लोकांकडून ब्रिटिश सरकारास सुचविण्यांत येतें तेव्हां सरकारी अधिकारी नेहमीं ह्मणत असतात कीं या सभांत व्यर्थ बडबड करण्यापलीकडे खरें कार्य कांहीं होत नाहीं, व सरकारी अधिकाऱ्यांचा महत्वाचा वेळ या सभांमुळें फुकट जातो. ह्मैसूर संस्थानांतल्या अधिकाऱ्यांना आपलें काम संभाळून अशा सभा भरविण्याला व लोकांच्या पुढाऱ्यांची मसलत राज्यकारभाराचे कामीं घेण्याला वेळ मिळतो व या मसलती पासून होणारा फायदा करून घेण्याला ते उत्सुक ही आहेत. ही गोष्ट ही वरच्या सारखीच आश्चर्यकारक आहे. तिसरी गोष्ट, ह्मैसूर संस्थाननें एफिशियन्सी ऑडिट नांवाचें एक नवें खातें काढलें आहे. प्रत्येक खात्याचें काम अधिक हुशारीनें कसें करतां येईल तें दाखविण्याचें काम या खात्याकडेस आहे. या खात्याच्या उपयुक्ततेविषयीं ही पुष्कळांना संशय होता पण गेल्यासालीं या खात्यानें आपली उपयुक्तता पूर्णपणें स्थापित केली आहे. प्रत्येक खात्याची तपासणी या खात्याकडून बारकाईनें करण्यांत येऊन नियमांस सोडून झालेल्या कामांची नोंद करण्यांत आली; आणि आतां प्रत्येक खात्यासंबंधानें वेळोवेळीं झालेले नियम व हुकूम यांचें एकीकरण करून अधिकारी लोकांना आपापलीं कामें अधिक चांगलीं करतां यावीं अशाप्रकारचें शिक्षण देणारें त्रैमासिक काढण्यास संस्थाननें मंजुरी दिली आहे. इंडियन सिव्हिल सर्विस मधले लोक पूर्णपणें हुशार आहेत व सगळा शहाणपणाचा व कर्तृत्वाचा मक्ता त्यांच्या हातांत आहे अशी समजूत उराशीं बाळगणारांना ह्मैसूर संस्थानची ही कृती वाचून काय वाटेल? लहान लहान गांवांची आरोग्य, न्याय, वगैरे संबंधाची व्यवस्था तेथील लोकांच्या हातीं देण्यासंबंधानें कोणी गोष्ट काढली कीं त्याला सरकारी अधिकारी व त्यांच्या तोंडा पुरते बोलणारे यांच्या कडून असें उत्तर मिळते कीं हिंदुस्थानचे लोकांना सार्वजनिक कामें करण्याची हौस व वळण नाहीं. ह्मैसूर संस्थानांत सुमारें तीन चतुर्थांश लोक संख्येला ग्रामव्यवस्थेच्या कमिट्यांचा फायदा आज प्रत्यक्ष मिळत आहे आणि ३८२९ कमिट्या लायब्ररया व वाचनालयें चालविणें, रस्त्यांची दुरुस्ती राखणें, गटारी व सडका करणें, गांवांत स्वच्छता राखणें, वगैरे सार्वजनिक कामें करण्यासाठीं आपल्या धंद्यांतून कांहीं नियमित वेळ खुशीनें देत आहेत, आणि लोकांतले क्षुद्र तंटे मिटवीत आहेत, या गोष्टी वरील आक्षेपाला खोटा ठरवीत नाहींत काय? या सारख्या अनेक सुधारणेच्या गोष्टी ह्मैसूर संस्थान प्रत्यक्ष करून दाखवीत असतां हिंदुस्थानचे लोक नुसत्या कल्पनेच्या भराऱ्या मारणारे आहेत असें ह्मणणारांना सत्याची चाड नाहीं असें ह्मणणें भाग पडतें.

---

संस्थानच्या सुधारणेचें उच्च उद्दिष्ट व तें साधण्याचे व्यावहारिक मार्ग यांची उत्कृष्ट कल्पना सर विश्वेश्वर अय्या यांना आहे असें त्यांच्या भाषणावरून दिसतें. लोकांचें उत्पन्न वाढलें पाहिजे, त्या उत्पन्नाचे मानानें लोकांची राहणी उच्च प्रतीची झाली पाहिजे आणि लोकांच्या महत्त्वाकांक्षा वाढून त्या पुऱ्या करण्यासाठीं लोक यत्नशील झाले पाहिजेत. उत्तम राज्यकारभाराला या तीन गोष्टी साधावयाच्या असतात. या साधण्यासाठीं सर साहेबांनीं कांहीं उपायही योजून ठेविले आहेत. लोकांचें उत्पन्न वाढण्यास शेतकी व दुसरे उद्योगधंदे यांत सुधारणा होऊन लोकांचें लक्ष तिकडे अधिकाधिक लागणें अवश्य आहे. दुसरी गोष्ट साधण्यासाठीं नागरिकत्वाचीं कर्तव्यें व सामाजिक सुधारणांचें महत्त्व याविषयींचें ज्ञान त्यांच्यांत पसरावयास हवें आहे, आणि तिसऱ्या गोष्टीच्या सिद्धीसाठीं लोकांना अधिकाधिक हक्क देण्याची राज्यकर्त्यांची तयारी पाहिजे. या शिवाय अधिकारी वर्ग आपापल्या कामांत अधिक हुशार व तत्पर पाहिजे. या सर्व बाबतींत सुधारणा घडवून आणणारी कांहीं निश्चित योजना सर साहेबांनीं करून ठेविली आहे, आणि ती अंशतः तरी यंदाच्या वर्षीं अंमलांत येऊन पुढच्या दसऱ्याचे वेळीं याहून ही अधिक प्रगति त्या संस्थानांत झालेली दिसून येईल अशी खात्री बाळगण्यास त्यांच्या भाषणावरून पुष्कळ जागा दिसते. सारांश, ब्रिटिश सरकार व इतर देशी संस्थानिक यांच्या पुढें राज्यकारभाराचा वस्तुपाठ मांडण्याचा सर विश्वेश्वर अय्या यांचा विचार दिसतो. हा त्यांचा विचार कृतींत उतरून ह्मैसूर संस्थान हें आदर्श संस्थान ह्मणून अभिमानानें दाखविण्याचा सुप्रसंग लवकरच येईल अशी आह्मी आशा करतों.

---

## युद्धानंतरच्या सुधारणा.

सध्याच्या राज्यकारभारांत हिंदुस्थानच्या लोकांच्या दृष्टीनें कोणतीं व्यंगें आहेत व त्यांत युद्ध समाप्तीनंतर कोणकोणत्या सुधारणा अवश्य पाहिजे आहेत यांबद्दलचें एक टांचण व्हाइसराय साहेबांच्या कायदे कौंसिलांतल्या १९ लोकनियुक्त प्रतिनिधीं कडून व्हाइसराय साहेबांस सादर करण्यांत आलें आहे अशी बातमी आज कित्येक दिवस वर्तमानपत्रांतून येत आहे व ज्यांची तहान स्वराज्याच्या अधिकार प्राप्तीवांचून मुळींच भागण्यासारखी नाहीं अशा पत्रकर्त्यांनीं या टांचणांत कोणकोणत्या सुधारणा मागितल्या असतील त्यांचा कल्पनेनें अंदाज करून त्यांवर चरचरांत टीका ही करण्याचा उपक्रम केला आहे. पण प्रतिपक्षाच्या मागण्याचा केवळ तर्कानें अंदाज करून त्यावर मनसोक्त टीका करणें हा जबाबदार पत्रकर्त्यांचा शिष्टसंमत मार्ग नव्हे, ह्मणून त्या संबंधानें आह्मीं मूकवृत्ति धारण केली होती. गेल्या सोमवारच्या बॉबे क्रानिकल मध्यें हें टांचण साग्र प्रसिद्ध झालें आहे. यांत प्रथम सध्याच्या राज्यपद्धतींतले ठळक दोष जबाबदारी ओळखून मांडल्यानंतर पुढील सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत— १ सर्व प्रांतांतल्या कायदे कौंसिलांत व एक्झिक्युटिव्ह कौंसिलांत अर्धे मेंबर हिंदी असावे. एक्झिक्युटिव्ह कौंसिलांतले सरकारनियुक्त मेंबर असे असावेत कीं ज्यांना इंग्लंडांतल्या सार्वजनिक चारित्र्याचें शिक्षण मिळालेलें आहे अर्थात ज्यांची दृष्टि व्यापक व उदार आहे. राज्यकारभाराचा प्रत्यक्ष अनुभव नाहीं ह्मणून एक्झिक्युटिव्ह कौंसिलांत नेमतां येत नाहीं असा आक्षेप विलायतेंतल्या प्रधानमंडळाच्या नेमणुकांचेवेळीं जसा घेतां येत नाहीं, तसाच हिंदुस्थानांत ही तो घेतां येऊं नये. एक्झिक्युटिव्ह कौंसिलचे तीन मेंबर तरी सरकारी नौकरींतले असले पाहिजेत हा वरिष्ठ कौंसिला विषयींचा निर्बंध व त्या सारखेच प्रांतिक कौंसिला विषयींचे निर्बंध काढून टाकण्यांत यावे. एक्झिक्युटिव्ह कौंसिलांतल्या हिंदी मेंबराची निवड करण्यांत कायदे कौंसिलांतल्या लोक नियुक्त मेंबरांचें मत घेण्यांत यावें, अर्थात हा हिंदी मेंबर नेमला न जातां निवडण्यांत यावा. २ कायदे कौंसिलांत लोक नियुक्तांचें बहुमत असावें. युरोपियन ऑफिसरापेक्षां हिंदी मेंबरांना हिंदी लोकांची ज्यास्त माहिती असून ही त्यांचा ओढा ही लोकांच्या हिताला जपण्याकडे अधिक राहील हें तत्त्व या मागणींत आहे. ३ वरिष्ठ कायदे कौंसिलांत मेंबरांची संख्या १५० व प्रांतिक कौंसिलांत कमींत कमी ६० पासून ७५ पर्यंत व मोठाल्या प्रांतांत १०० पर्यंत असावी. ४ विलायतेंत मनी बिल्स ह्मणून सरकारकडून पार्लमेंटकडे खर्चाची मंजुरी मागण्यांत येते, त्याप्रमाणें बजेटें कौंसिलापुढें मंजुरीसाठीं यावीं. ५ वरिष्ठ कायदे कौंसिलापुढें हिंदी राज्यकारभारासंबंधाचे सर्व प्रश्न विचारासाठीं यावे, व प्रांतिक कौंसिलापुढें लष्करी कामें, परराष्ट्रांशीं संबंध, लढाया, तह इ. गोष्टी (ज्या ग. जनरलचे हातीं असल्या पाहिजेत) त्या खेरीज करून बाकीचे सर्व प्रश्न यावेत. गं. जनरल व कौंसिल यांचे हातीं व्हेटोचा अधिकार असावा, पण त्याच्या अटी व मर्यादा निश्चित असाव्या. ६ स्टेटसेक्रेटरीचें कौंसिल बंद करावें. वसाहतींशीं त्याचा सेक्रेटरीचा जो संबंध तोच हिंदुस्थानाशीं स्टेट सेक्रेटरीचा असावा. स्टेटसेक्रेटरीच्या हाताखालीं दोन अंडर सेक्रेटरी असावे व त्यांपैकीं एक हिंदी गृहस्थ असावा. स्टेट सेक्रेटरीचा व अंडर सेक्रेटरीचा पगार ब्रिटिश एस्टिमेटमध्यें ठेवण्यांत यावा. ७ साम्राज्य संबाच्या प्रश्नाच्या चर्चेच्या वेळीं हिंदुस्थानचे लोक नियुक्त सभासद घेण्यांत यावे. या बाबतींत वसाहतीसारखे हक्क हिंदुस्थानाला असावे. ८ ता० २९ आगस्ट १९११ च्या हिंदुस्थान सरकारच्या खलित्यांत दर्शविल्या प्रमाणें प्रांतिक सरकारला स्वतंत्रता असावी. ९ संयुक्तप्रांत व इतर प्रांत यांवर विलायतेंतून गव्हर्नर नेमून यावे व त्यांना एक्झिक्युटिव्ह कौंसिलें असावीं. १० स्थानिक स्वराज्याचे पूर्ण हक्क लागलीच देण्यांत यावे ११ ज्याप्रमाणें युरोपियनांना त्याच प्रमाणें हिंदी लोकांना हत्यारें बाळगण्याची परवानगी असावी. १२ हिंदुस्थानांत जें टेरिटोरियल सैन्य स्थापित होईल त्यांत व व्हॉलंटियर ह्मणून सामिल होण्यास हिंदी लोकांना हक्क मिळावा. १३ ज्याप्रमाणें युरोपियनांना त्याच प्रमाणें हिंदी लोकांना लष्करांत अधिकाराच्या जागा मिळाव्या.

या मागण्या ह्मणजे काँग्रेसनें आजपर्यंत वेळोवेळीं केलेल्या मागण्यांचें सद्यःस्थित्यनुरूप काढलेलें सार आहे, या टांचणांत या सर्व मागण्यांचें सार एका वाक्यांत आणिलें आहे, तें हें कीं नुसती उत्तम राज्यव्यवस्था नको, तर लोकांना सरकार जबाबदार राहील व लोकांना पसंत पडेल अशी राज्यव्यवस्था पाहिजे. या वाक्यांत स्वराज्यवादी व नेमस्तपक्ष या दोघांच्या ही मतांचा समावेश मोठ्या खुबीनें करण्यांत आला आहे.

---

## हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार.

एका ख्रिस्ती पत्रांत हिंदुस्थानांतल्या ख्रिस्तीधर्माच्या प्रसाराविषयीं असें ह्मटलें आहे कीं वीस वर्षांपूर्वीं २० लक्ष लोक ख्रिस्ती होते. नंतर दहा वर्षांनीं पाहिलें तर ३० लक्ष झाले, आणि आतां ४० लक्ष आहेत. हें विधान भ्रामक आहे हें सांगावयास नकोच. कारण वरवर पाहणारास असें वाटेल कीं ख्रिस्ती प्रसाराचें प्रमाण दिवसें दिवस वाढतें आहे. पण हा भ्रम आहे. २० लक्षाच्या मानानें दहा वर्षांत १० लक्षांची वाढ ह्मणजे शें. ५० होते. पुढच्या दहा वर्षांत ३० लक्षांवर १० लक्षाची वाढ ह्मणजे शें. ३३ पडली व त्यानंतरच्या दहा वर्षांत ४० लक्षांवर १० लक्षाची वाढ ह्मणजे शें. २५ च होते. यावरून ख्रिस्ती धर्माचा प्रसार दिवसें दिवस वाढत नसून उलट तो कमी कमीच होत आहे हें उघड आहे. प्रांतवारीनें पाहिलें तर आणखी एक चमत्कार दिसतो आणि या चमत्कारांत ही वाढ कमी होण्याचे ही कारण सूक्ष्म दृष्टीनें पाहणारास दिसून येतें. अजमीर, मेरवारा, अंदमान, निकोबार, ब्रह्मदेश, मध्यप्रांत, सरहद्दीचा प्रांत, व पंजाब, आणि कोचीन, हैद्राबाद आणि काश्मीर हीं संस्थानें यांत वाढ ज्यास्त आहे आणि मुंबई, बंगाल, मद्रास, संयुक्तप्रांत, आसाम, ह्मैसूर, त्रावणकोर, बडोदें, राजपुताना, वगैरे संस्थानांतून ही वाढ कमी कमी होत आहे. या वरून जेथें शिक्षणाचा प्रसार ज्यास्त, तेथें वाढ कमी व जेथें लोक अज्ञान, तेथें वाढ ज्यास्त असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. या शिवाय, जेथें मूळची ख्रिस्ती वस्ती ज्यास्त, तेथें वाढ कमी असें ही दिसतें. यावरून ख्रिस्ती लोकांच्या चारित्र्याचा इतर धर्मी लोकांवर विशेषसा परिणाम झालेला नाहीं असेंच ह्मणावें लागतें.

---

## महायुद्धाची प्रगति.

सध्या महायुद्धाचा मुख्य भाग ह्मणजे रुमानियावर आलेलें संकट व त्यांतून मोठ्या मर्दुमकीनें पार पडण्यासाठीं चालविलेली खटपट हा आहे. रुमानियाची स्थिति बरीच नाजूक झाली आहे, त्याला बरेंच मागें हटावें लागलें आहे, यांत शंका नाहीं. तथापि पुष्कळ लष्करी अधिकाऱ्यांना उमेद

आहे कीं कार्पेथिएन पर्वतांचें शिखर रुमानियानें आपल्या हातीं ठेवल्यास त्याला शत्रूची येवढी भीती बाळगण्याचें कारण नाहीं. पश्चिम रणक्षेत्रांत आपला जोर चालत नाहीं ही जर्मनीची खात्री होऊन चुकली आहे. तेव्हां आतां आपलें वर्चस्व लोकांच्या दृष्टीनें कायम राखण्यास त्याला आस्ट्रिया-हंगेरियाकडून रुमानियाला पेचांत धरण्यावांचून दुसरा मार्ग राहिला नाहीं, आणि तें काम तो आपली सगळी शक्ति एकवटून करीत आहे असें कांहीं जणांचें ह्मणणें आहे. याच्या उलट दुसरे कित्येक असें ही ह्मणतात कीं या कामीं जर्मनीकडून आस्ट्रिया हंगेरियाला विशेषशी मदत नाहीं. खरा प्रकार हा आहे कीं रुमानिया आपल्या शत्रूशीं मोठ्या मर्दुमकीनें लढत आहे, आणि जरी कित्येक प्रसंगीं त्याला माघार घ्यावी लागली (आणि असे प्रसंग युद्धांत अनेक वेळां यावयाचेच) तरी पुष्कळ वेळां शत्रूचे हल्ले परतविण्यांत त्याचें शौर्य उत्तम प्रकारें प्रकट झालें आहे; हे हल्ले परतविण्यांत शत्रूची भयंकर हानि होत आहे. ब्रासोपाशीं व इतर खिंडींतून दोस्त राष्ट्रें आपापलीं ठाणीं संभाळून आहेत. ऑइट्झ खिंडींतून आपलें सैन्य नेण्यासाठीं जर्मन शिकस्तीचा प्रयत्न करीत आहेत. पलीकडे जाऊन फोकचोमी रेल्वे जंक्शन हस्तगत करण्याचा जर्मनांचा उद्देश आहे. तो कितपत सिद्धीला जाईल तें अद्याप निश्चित सांगतां येत नाहीं. एकंदरींत रुमानियाची सरहद्द हें सध्या महत्त्वाचें रणक्षेत्र बनलें आहे.

## पश्चिम रणक्षेत्र.

या क्षेत्रांत सर्वत्र ब्रिटिशांचा विजय आहे. श्वाबेन रिडाऊटवर शत्रूंनीं हल्ला केलेला परत फिरविण्यांत आला. त्यांत शत्रूची मोठी हानि झाली. आंकरच्या दक्षिणेस शत्रूंनीं कुलपी गोळ्यांचा वर्षाव केला, पण तो निष्फळ झाला. ब्रिटिश लोकांनीं इप्रेसच्या ईशान्येस शत्रूंच्या खंदकांत शिरून अनेकांना मारिलें व पुष्कळ कैद केले. सेंट एलोई जंगलाकडे ही शत्रूचे हल्ले परतविण्यांत आले. सैली सैलीसेलच्या पश्चिमेकडे फ्रेंच लोक पुढें सरकत आहेत.

## पूर्व रणक्षेत्र.

या रणक्षेत्रांत राशियन लोक आपला खंबीरपणा पदोपदीं दाखवीत आहेत. कोरोमझे झो व किर्लिबाबा यांच्या बाजूस जर्मन शत्रूचे हल्ले साफ परतविण्यांत आले. शत्रूची तयारी जंगी होती, पण ती निष्फळ झाली. तेव्हां आस्ट्रियन व जर्मन सैन्याला हुरूप आणण्यासाठीं कैसरनें एक भाषण केलें. त्यांतलें एक वाक्य जर्मनीची निराशा व्यक्त करणारें आहे. कैसर ह्मणाला— 'तुह्मी शत्रूवर पुनः हल्ला कराल तेव्हां शत्रूला आह्मी फळी फोडून जाऊं देणार नाहीं हा मंत्र घोका. शत्रूला आपण खात्रीनें मारूं. तुमच्यांतला एकेक जण शत्रूच्या तिघांना—तिघांनाच काय पण सहांनासुद्धां— भारी आहे.' अंगांतलें खरें तेज नाहींसें झाल्यावरच पोकळ प्रौढी गाण्याची बुद्धि होत असते हें खरें असेल तर जर्मन सैन्य हताश झालें आहे असें दाखविण्याला कैसरचें हें वाक्य पुरेसा पुरावा होईल.

## इटालियन बहादूर.

दोन लक्ष साठ हजार शूर इटालियन शिपाई बहात्तर तासपर्यंत कार्सोवर एकसारखा हल्ला करून तुटून पडत आहेत. अकरा दिवस आणि अकरा रात्री एक हजार तोफा सारखा भडिमार करीत आहेत. अरुंद जागेवरून इटालियन सेनासमुद्राच्या जंगी लाटा उसळून धडाधड शत्रूवर आदळत आहेत. त्यांच्याबरोबर मशीन तोफा व साध्या तोफा ही आहेत. या ठिकाणची इटालियन लोकांची बहादूरी काहीं अवर्णनीय आहे.

## ग्रीसमधला गोंधळ.

दोस्त राष्ट्रांनीं ता. ११ रोजीं ग्रीक आरमाराचा ताबा घेतला. त्या वेळचें सविस्तर वर्णन आतां प्रसिद्ध झालें आहे आणि तें फार बहारीचें आहे. ब्रिटिश व फ्रेंच विनाशक बोटी ग्रीक आरमाराभोंवतीं घिरट्या घालीत होत्या. ग्रीक खलाशांना सर्व सामानसुमान घेऊन किनाऱ्यावर उतरण्यास सांगण्यांत आलें, तेव्हां खिन्नवदन होत्साते सगळे ग्रीक खलाशी खालीं उतरले. ते उतरल्यावर ग्रीक जहाजें दूर नेण्यांत आलीं. आरमार गेलें, दोस्त सैन्यांनीं लारिसा रेल्वेचा ताबा घेऊन दारुगोळा वगैरे बाहेर जाऊं देण्याचा मार्ग बंद केला, फ्रेंच खलाशांनीं ग्रीक आरमारांच्या दारुगोळ्यांचें कोठार असलेलीं बेटें घेतलीं सारांश, दगलबाज ग्रीक राजाचे सगळे बेत दोस्त राष्ट्रांनीं उलथून पाडले आहेत. आतां राजा काय करणार हा मोठा प्रश्न आहे. अजून राजा शुद्धीवर येईल अशी आशा व्हेनेझेलोस यांना वाटत नाहीं. राजा निवळ विवेकहीन आहे असें व्हेनेझेलोस यांनीं सालोनिका येथील आपल्या भाषणांत स्पष्टपणें बोलून दाखविलें. आतां बल्गेरियन लोकांना हाकून देऊन देशाची अब्रू राखण्याचें काम त्यांतल्या शहाण्या लोकांकडे आलें आहे.

## लढाई संबंधाच्या इतर बातम्या.

आयर्लंड मधील प्रागतिकांनीं सक्तीच्या लष्करी कायद्यास अनुमति दिली आहे.

जॉर्ज बादशहांनीं व मेरी महाराणी साहेबांनीं रेडक्रॉस व सेंट जॉन्स अंब्युलन्सच्या वार्षिक समारंभाचेवेळीं अनुक्रमें ५००० व १००० पौंडाची देणगी देऊन दोन्ही संस्था दुःखपीडित रणवीरांचें दुःखहरण करण्याचें कार्य उत्तम रीतीनें करीत आहेत याबद्दल समाधान व्यक्त केलें.

ब्रिटिशांनीं ब्यांक नांवाचें एक नवें युद्धोपयोगी घातक शस्त्र तयार केलें आहे. या शस्त्राची कल्पना मि० चर्चिल यांची आहे असें मि. लाइड जार्ज यांनीं उघडपणें सांगितलें.

हिंदुस्थानांत असतांना राजद्रोहाच्या संशयावरून सी. आय डी, खातें ज्याच्यावर बारीक नजर ठेवीत होतें असे बरदाप्रसाद साहा नांवाचे एक तरुण बंगाली गृहस्थ लढाईवर गेले होते, तेथें त्यांनीं अद्वितीय पराक्रम केला व २० शिपायांचे जीव वांचविले, यावरून त्यांची राजनिष्ठा व्यक्त झाली.

## रॉबर्टसन कॉलेज.

हिमालयाचें जसें उच्च शिखर गौरीशंकर तसेंच सर बेंजामिन राबर्टसन यांच्या आयुष्यांतील जबलपूरचे राबर्टसन कॉलेज हें उच्च शिखर होय. या उदार मनस्क, कर्तृत्ववान्, व गंगाहृदयी मुत्सद्याचें राबर्टसन कॉलेज ह्मणून चिरकाल स्मारक राहील; इतकेंच नव्हे तर या कॉलेजांतून ज्या भावी पिढ्या पुढें निघतील त्या आपल्या आयुष्यक्रमांत आपल्या राबर्टसन कालेजाचे निरनिराळे सद्गुण जगाच्या उपयोगाला आणतील तेव्हां तेव्हां सर बेंजामिन यांच्या सद्गुणांचा तो विकास होत आहे असें आह्मी ह्मणूं. गेल्या १४ व्या तारखेला जबलपूराहून ४ मैलावर निसर्गाची शोभा जेथें नांदत आहे अशा सुंदर, विस्तीर्ण, व रमणीय स्थळीं ८॥ लक्ष रुपये खर्चून बांधलेल्या या नव्या विद्यामंदिरांचा वास्तुसमारंभ त्यांनीं आपल्या यशस्वी हातानें केला. त्यावेळीं मनाच्या सर्वोत्कृष्ट भरारींत सर बेंजामिन यांनीं जी ईश्वराजवळ प्रार्थना केली असेल, ती निःसंशय फलद्रूप होईल, आणि त्या सृष्टी सौंदर्याच्या स्थळीं विद्यार्थी जेव्हां सरस्वतीची आराधना करितील तेव्हां गुरुमुखानें मिळणाऱ्या प्रसादाशिवाय सृष्टीच माते प्रमाणें कशी विद्या मनांत ओततें याचीही कल्पना या कालेजापासून होणारी आहे असें पुण्याच्या त्या पवित्र डेक्कन कॉलेजांत शिकलेले विद्यार्थी निःसंशय सांगतील. या कालेजाचें अभिष्ट चिंतितांना सहजी मन धाव घेते कीं सर बेंजामिन यांच्याच हातून—ही नागपूरची शुष्क युनिव्हर्सिटी नव्हे- तर मध्यप्रांत व वऱ्हाड यांचें गुरुकुलाच्या पद्धतीवर स्थापिलेलें विश्वविद्यालय अशाच एखाद्या रम्य व उत्साहवर्धक स्थळीं स्थापित होईल तर तो केवढा तरी या प्रांताचा सोन्यासारखा सुदीन बरें!

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—पाऊस पुन्हा पडूं लागला आहे. वर्षाव बराच आहे. आणि कापसाची बोंडें गळून पडूं लागलीं आहेत. हवेंत चांगला थंडोसा येऊन थंडी चांगली पडेल असा रंग दिसतो.

**सुवर्ण पत्रिका**— श्रीमती सौभाग्यवती ऑर्चर्ड बाई यांनीं आपल्या वॉर रिलीफच्या कामांत पुष्कळ परिश्रम आपल्या पतीच्या सल्यानें घेतले याबद्दल त्यांस मुलांच्या खेळांच्या पटांगणावरच जाहीर रितीनें सुवर्ण पत्रिका राजश्री स्टँडन यांनीं गौरवपूर्वक अर्पण केली.

**प्लेग**—खालील गांवें जिल्हावारीनें प्लेग दूषित आहेतः- आकोला जिल्हा— बटवाडी बुजरुक, दहिहंडा, केळीवेळी, कोलगांव, शिरसोली; उमरावती जिल्हा—चिखलडा, असतपूर, गढी, लाखनवाडी, ससणरामपूर, ससन बुजरुक, आमला; बेनोडा; बुलडाणा जिल्हा-- उंदरी, चेयीगांव, अंजनी, पळशी, अमडापूर, मेहेकर.

रा. रा. दोराबजी एदलजी संजाना तहशिल्दार मेहकर यांस २ महिन्यांची रजा देण्यांत आली असून तेथील नायब तहशिल्दार जि० जनार्दन नायडू यांस आक्टिंग तहशिल्दार नेमण्यांत आलें.

रा. रा. रामकृष्ण अमृत देशपांडे तहशील्दार जळगांव यांस ३ महिन्यांची हक्काची रजा मिळाली असून तेथील नायब तहशील्दार महमद जैनुल आबदीन यांस आक्टिंग तहशील्दार नेमलें.

रा. रा. रामचंद्र नारायण साठे तहशील्दार यांस एलिचपुरास तहशील्दार नेमण्यांत आलें.

रा. रा. नारायण पाटील सावरे ता. आकोट यांनीं आकोट दवाखान्यांत स्त्रियांच्या साठीं जो निराळा भाग बांधला आहे त्याच्या , खर्चाकरितां १३०० रुपये वर्गणी दिली ह्मणून स्थानिक सरकारनें त्यांचा गौरव केला आहे.

**सामाची योजना**— बऱ्हाणपुरास थोडे दिवसापूर्वीं मशिदीवरून वाद्यें वाजवीत जाण्यासंबंधानें जसा हिंदु मुसलमानांचा तंटा होऊन हातघाईवर प्रकरण आलें, तसाच जबलपूर येथें ही रामलीलेच्या मिरवणुकीसंबंधानें नुकताच घडून आला. ह्मणून आलिशान सर बेंजामिन यांनीं प्रमुख हिंदु व मुसलमान यांस जबलपुर मुक्कामीं समक्ष बोलावून समजूत घालण्याचा प्रयत्न केला. आणि अशा प्रयत्नांना यश देणें आपणा उभयतां हिंदुमुसलमानांचें आहे हें सर्वांनीं ध्यानांत धरलें पाहिजे. या द्वेषमूलक लढाया आतां नकोत. आणि भावी स्वराज्याची पहिली कामगिरी येथूनच सुरू झाली पाहिजे.

**सुट्टीः**— दिपवाळीच्या महोत्सवानिमित्त येत्या सप्तकांत आमचा कारखाना बंद राहील. आणि ह्मणून मामुली वहिवाटीप्रमाणें तारीख ३० आक्टोबरचा पुढील अंक प्रसिद्ध होणार नाहीं

## पत्रव्यवहार

### मध्यप्रांत आणि वऱ्हाडची पांचवी प्रांतिक परिषद उमरावती.

१ मध्यप्रांत व वऱ्हाड यांची पांचवी प्रांतिक परिषद वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या विद्यमानें अमरावती येथें **नोव्हेंबर** महिन्याच्या ५।६।७ या तारखांना भरणार आहे.

२ सदरहू परिषदेकरितां खालीं दर्शविलेल्या संस्थांना आणि सभांना प्रतिनिधी निवडून पाठविण्याचा अधिकार आहे.

(क) प्रांतिक काँग्रेस कमिटी, वऱ्हाड.
(ख) " मध्यप्रांत.
(ग) राष्ट्रीय सभेच्या घटनेप्रमाणें 'क' व 'ख' यांनीं जोडलेल्या जिल्हा कमिट्या.
(घ) वरील जिल्हा सभांनां जोडलेल्या पोट जिल्हा सभा किंवा तालुका सभा.
(ङ) राष्ट्रीय सभेच्या घटनेतील कलम १ मान्य करणाऱ्या कोणत्याहि सार्वजनिक अगर राजकीय संस्थ.
(च) राष्ट्रीय सभेच्या घटनेंतील कलम १ यांत नमूद केलेलें प्रांतिक परिषदेचे ध्येय ज्यांना मान्य आहे; अशा जाहीर सभा.

३ या पांचव्या प्रांतिक परिषदे करितां प्रतिनिधीं निवडून पाठविणाऱ्या संस्थांनीं, मसाजांनीं, उपसंस्थांनीं आणि सभांनीं ता १ नोव्हेंबरच्या आंत प्रतिनिधींची यादी त्यांच्या पूर्ण पत्त्याचा व धंद्याचा उल्लेख करून स्वागत मंडळीचे चिटणीसांकडे पाठविण्याची कृपा करावी.

या राष्ट्रीय सभेच्या घटनेतील कलम १ यांत प्रथित केलेले प्रांतिक परिषदेचें ध्येय मान्य असल्याबद्दल प्रतिनिधीनीं लेखी कबूल केलें पाहिजे.

५ प्रत्येक प्रतिनिधीला प्रवेश फी ४ रुपये द्यावी लागेल. हिंदुपद्धतीनें जेवणाराला निराळा आकार द्यावा लागणार नाहीं.

६ परिषदेला प्रेक्षक ह्मणून येऊं इच्छिणाऱ्याला तीन दिवसा करितां २ रुपये फी पडेल. प्रत्येक दिवसा करितां १ रुपया प्रेक्षकांची संख्या नियमित करण्याचा अधिकार स्वागत मंडळानें आपल्या स्वाधीन ठेवला आहे.

टीप—जैन आणि लिंगायत जातींच्या प्रतिनिधींनीं स्वागत मंडळाच्या चिटणीसाकडे दोन दिवस अगाऊ कळविल्यास त्यांच्या भोजनाची निराळी व्यवस्था करण्यांत येईल.

अमरावती. ता० ६-१०-१९१६ } **गोविंद नारायण काणे**
**बाळकृष्ण गणेश खापर्डे**

चिटणीस—कार्यकारी मंडळ (पांचवी प्रांतिक परिषद)

नो० नं० ३८२

---

## जाहिर नोटीस

**नोटीस कलम ११ अक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

किर. दिवाणी मुकद्दमा नंबर ७० सन १९१६ इ. विद्यमान डिस्ट्रीक्ट जज्ज साहेब यांचें कोर्ट मुक्काम आकोला

नांव संपत
बापाचें नांव बाबूर्जी
जात राहणार
तहसील जिल्हा
च्या अल्पवयी हरी वल्लद कि न
उमर वर्षे १२
राहणार माटरगांव ता. खामगांव तहसिलींचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस कळविण्यात येते कीं सदहू अर्जदारानें सदहू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारिख२९ म हे नोव्हेंबर सन १९१६ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदहू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांना जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख १४ माहे आक्टोबर सन १९१६ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

V. M. Kelker
डि० जज्ज
पश्चिम वऱ्हाड
आकोला

नो. नं. ३८५

---

## नोटीस

नोटीस बेशमी नारायण चंद्रभान काळे रा० बेलुरे ता० खामगांव पो० जलम

यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची तारीख २९।७।१६ ची नोटीस व तुमचे वकील रा. रा. कोठारे यांचे मार्फत तारीख २।८।१६ ची अशा दोन्ही नोटीसा पावल्या. तुह्मास यापूर्वी ही माझे कडून सर्व खुलाशाची नोटीस तारीख १०।७।१६ रोजीं दिली होतीच. मला स्वतः आपले घरीं मी असतांना मला समजू लागल्यापासून मी आपले आजोळी परत जाई पर्यंतच्या अवधींत तुमचा व माझा जो सहवास झाला त्यावरून मी खात्रीनें सांगते कीं आपण संसाराला अपात्र आहां. आपण केवळ मला झालेले कर्ज फेडण्याचे टाळण्याकरितांच हीं अशी उडवाउडवीची उत्तरें देत आहांत. तरी आतां तुह्मांस ही शेवटची नोटीस देते कीं आपण ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचें आंत योग्य ती शहानिशा करावी. या प्रमाणें आपण न केल्यास ही शेवटचीच नोटीस फारकत आहे असे समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा माझेवर नवरेपणाचा हक्क चालणार नाहीं. व मला माझे उदरनिर्वाहाकरितां झालेलें कर्ज व नोटीसांचा खर्च याबद्दल योग्य ती तजवीज करणें भाग पडेल. ही नोटीस दिली सही तारीख २१ माहे आक्टोबर सन १९१६ इसवी.

सही

मथुरा मर्द नारायण काळे नी० बांगडी रा० खडतगांव ता० खामगाव हल्लीं मुक्काम आकोला

नो. नं. ३८६

---

## जाहिर नोटीस

या जाहिर नोटीशीनें सर्वत्र सावकार लोकांस त्याचप्रमाणें जन्मदेती मातोश्री जुगनाबी मर्द सय्यद वाहेद राहणार चांदूर ता॥ आकोला पोष्ट आकोला इत्यादि सर्व लोक

यांस:—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं मौजे चांदूर ता॥ बाळापूर येथील माझे मालकीचीं शेतें आखरचे आणि कळींचे अशीं दोन आहेत. हीं शेती माझा जन्मदेता बाप (ह्मणजे तुझा नवरा) याची अथवा त्याचे वडीलोपार्जितची कमावलेली नाहीं. ही शेती माझे बापाचे आईचे वडीलाची असोन ती वारसाचे नात्यानें माझेकडे आल्यामुळें मी त्या शेतीचा पूर्ण मालक आहे. कायद्याचे दृष्टीनें या शेतीची मालकी शराये महमदी प्रमाणें तुजला अगर सय्यद वाहेदचे वडीलास अगर त्याचे भाउबिरादरास मुळींच मिळूं शकत नाहीं. माझे ऐकण्यांत असें आले कीं तुं कांहीं लबाड लोकांच्या नादी लागून या शेतावर कर्ज काढूं पाहात आहेस आणि आतांशा तुझी वर्तणूक ही दुरस्त नाहीं. तुझ्या या वर्तणुकीनें मी सध्या माझा मामा व खालु यांच्या आश्रयानें जीवाचे भीतीनें येऊन राहिलों आहे. तुं यदाकदाचित् या शेतीवर कोणतेही प्रकारचा कर्जाचा बोजा अगर कोणतेही प्रकारचे एखादे लेखाचा बोजा लादल्यास या सर्व व्यवहारास माझी शेती जबाबदार राहणार नाहीं. सर्व व्यवहार तुं जे करशील ते रद्द आहेत ही जाहीर नोटीस दिली मु॥ आकोला ता॥ १४-१०-१९१६

सही

१ सय्यदनुर वा॥ सय्यदवाहेद अ. पा. क. इष्टमित्रः— मामा व खालु शेखवनु वा॥ शेखआमद रा. चांदूर ता॥ आकोला नी॥ खुद.

नो. नं. ३८७ शेखनंमु वा॥

---

## नोटीस

नोटिस बेशमी मोतीराम वा॥ विठोबा देशमुख राहणार पळसोद ता. आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आमचे जवळून फुसलावून पाटीलकीचा धाक दाखवून कांहीं एक मोबदला न देतां देण्याचा इरादा ही नव्हता. निवळ भांडणा कारितां पट्टेखत लिहून घेतलें आह्मी स्त्री जात असले कारणानें आह्मास तुह्मी भुलथाप दिली कीं, तुह्मी आमचे नणंदाशीं भांडण करून शेत आमचे ताब्यांत मिळवून देऊ तरी आह्मास कांहीं एक भांडण करणें नाहीं. शिवाय करणें झाल्यास आह्मी स्वतः करू. तुह्मी आह्मास नारायणराव पांडे यांचे व छनु वगैरे इतर लोकांचे मदतीनें आह्मास फसवून पट्टेखत ता. ५-७-१६ ला लिहून घेतलें आहे. भरणा कांहीं दिला नाहीं, व देण्याचा तुमचा इरादा नव्हता, पट्टेखत पोकळ व रद्द आहे. शेताची लागवण दरसाल १७५ रुपये येत असतांना तुह्मी आह्मास फसवून ४०० रुपयांत ५ वर्षांचे पट्टेखत लिहून घेतलें तरी वरील पट्टेखतावरूनचा तुमचा व तुमचे साथीदाराचा ताबा रद्द आहे. तेव्हां ८ दिवसाचे आंत नोटिस पावल्यापासून शेताचा ताबा देणें न दिल्यास कोर्ट मार्फत ताबा घेऊ. ता. १७ १०-१६

सही

१ गोपी मर्द हिरामण तेली हातचा आंगठा असे
२ जानकी मर्द हिरामण तेली हातचा आंगठा असे

नो० नं० ३८३

---

## नोटीस

रा. लक्ष्मण वा॥ सटवाजी पंचाळ रा. भालेगांव पोष्ट राजाचे पिंपळगांव ता. मलकापूर जि. बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे आहांत. तुमचे पासून मला एक मुलगा व सुमारे ९ वर्षे मुलगी सुमारे ४ वर्षांची आहे. आजपर्यंत मी तुमचा अतिशय त्रास सोसून मारहाण खाऊन पुष्कळ हाल भोगून दिवस काढीले. परंतु यापुढें माझ्यानें हाल सोसवत नाहींत. करितां मी नोटिशीनें कळविते कीं मी माझे आंगमेहतीनें मिळऊन आलग राहून पोट भरते, व मुलाचे ही पोषण करिते तरी मी आलग राहते. तुह्मी माझ्या घरीं येऊ नये, व माझ्याशीं कांहीं संबंध ठेऊ नये. यापुढें तुह्मी धामधुम केली असतां मी कायदेशीर तजवीज करीन ही जाहीर नोटीस दिली. सही तारीख १८-१०-१६

मुक्काम आकोला डिपुटी कमिशनर कचेरी ता० १८-१०-१६

सही

सहीची नि॥ [illegible]वळना मर्द लक्षमण पंच[illegible] इचा आंगठा राहणार [illegible] पोष्ट पिंपळगांवराजा मलकापूर हल्लीं मु॥ आकोला

गुस्ताखियों
आकार नामवुर
कमन्दीसे आक किये
मनकूर को मेरी मिलकीए
र मनकूहसे मेरे पसेमर्ग दि
तर्का या वेर्सा न पहूंचे इस

## जाहिर नोटीस

रा. रा. रावो वा॥ विठोबा धोबी रा. खंडाळा ता॥ बाळापूर हल्लीं मु॥ आसलगांव पोष्ट आसलगांव ता. जळगांव जिल्हा बुल्डाना

यांसः—

खालीं सही करणार इजकडून या जाहिर नोटीशीनें कळविण्यांत येते कीं मजला आज सहावर्षे कमबेप झालीं वागविण्याचें तुमचे जिवावर आल्यामुळें मजला थाप देऊन माझा मावसा नामें मारुती धोबी रा० शिवणी याचे घरीं आणिले आणि आठ चार दिवसांनीं नन्यास येतो अशी थाप दिली. या गोष्टीस आज सहा वर्षे झालीं. त्या नंतर मी घेऊन जाण्यासाठीं शंभर इसमाचे हातीं निरोप पाठविले येवढेच नाहीं तर माझ्या तर्फेनें रा. सखाराम बोवा हे समागमे १०-१२ जातवालें पंच घेऊन तुमचे घरी पांच ५ सहा ६ वेळ आले. तुह्मी त्यांना प्रत्येकवेळीं तुमचे मागेच येतो अशी थाप देत आला. ही तुमची वर्तणूक वाईट आहे अशी माझी खात्री झाल्यावरून मजला लाचार होऊन तुह्मास ही नोटीस देणें भाग झाले. या नोटीशीचे खर्चासाठीं सुद्धां मजला लोकांचें कर्ज काढावे लागले. माझा उदर निर्वाह होण्याचें मजला बिलकुल साधन नाहीं. या साठीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मजला घेऊन जावे. न नेल्यास मी तुमचेवर अन्नवस्त्राची फिर्याद करीन व मग तुह्मी कोर्टात मी नेण्यास तयार आहे असें सांगितल्यास तुमची सबब ऐकली जाणार नाहीं ही नोटीस दिली मुक्काम आकोला तारिख १७-१०-१९१६ ई.

सही
गुजी मर्द रावो धोबी नी॥
आंगठा रा० सीवणी तालुका
आकोला पोष्ट आकोला.

नो. नं. ३७९

## नोटीस

नोटीस बेशमी रावव वा॥ राणू पा० खंडारे रा० चिंचोली ता० आकोला. पो० रांजदा

यांसः—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं माझे तुमचे भाईबंदी वैर असून हे मला मागाहून कळले. माझा बाप अज्ञानपणांत वारला. नंतर मला आईनें आत्ताचे येथें वागविले ती ही साल मजकुरी वारली व मला तमासेबाज वाईट लोकांची संगत लागली असतां माझा संभाळ करणारा कोणी नाहीं सबब मी आपण चुलतबंधू ह्मणून तुमचे कडे आलों. तुह्मी मला घरदार [illegible] पुरुषो बापको वगैरे आणून देऊन [illegible] रविवार संभाळ करण्यास प्रतिज्ञा क[illegible] नो. नं. ४ सर्व करण्यास पैसे तु[illegible] जवळ नाहींत . [illegible]

कीं तुझे मालकीचे वडिलोपार्जीत शेत मौजे मजकूर येथील मजला गहाण करून दे ह्मणजे मला कोणी पैसे देईल. मग तूं ते पैसे फेडून टाकावे या करारावर मी तुह्मास ६०० सहाशे रुपयांचें गहाण नासमजपणानें व पारका झाल्यामुळें भांबावल्यानें करून दिले. परंतु कोणतेच ते तुह्मी न करतां त्याचे नोंदणीची तारीख २४-१०-१६ आली आहे. आतां मला तुमचे मनांत दगलबाजी आहे असें दिसते. सबब ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत ६०० सहाशे रुपये पूर्ण भरणा माझे पदरांत घालावा नाहीं तर ते गहाण रद्द आहे त्याचे माझेवर अगर सदर्हू मौजे मजकूर येथील सरवई नं० ४८ चे शेतावर कोणते ही प्रकारचा बोजा राहिला नाहीं, शिवाय विश्वासघात केल्याबद्दल तुमचेवर योग्य कोर्टात फौजदारी केली जाईल. कळावे दा॥ सुकदेव नथु पा॥ भोनगांव

सही
१ दौलत सिवराम पाटील
हल्लीं मु० सोनगांव पोष्ट
जलंब ता० खामगांव दा॥ खुद

नो. नं. ३८०

## नोटीस

रा. रा. गोविंदराम भिकमदास लखोटे मारवाडी राहणार कोथळी ता. मलकापूर

यांसः—

खालीं सह्या करणार यांजकडून या जाहिरलेखानें कळविण्यांत येते कीं, तुह्मी ता. १७ सप्टेंबर १९१६ ची नोटिस 'वऱ्हाडसमाचार' पत्रांतून दिली ती पोचली. त्यांतील पुष्कळसा मजकूर खोटा आहे. तुमच्या खात्रीवरून व तुह्मी स्वतां एक पंचमांश हिश्याचे भागीनदार झाल्यावरून आह्मी तुमच्या शेतीचा कौलपट्टा तुह्मा समवेत करून दिला. आणि तुमच्या आग्रहावरून तुमच्या खातरजमेनें स्वामीत्वाची रक्कम १६१४ रुपये कबूल केली. ही रक्कम फार मोठी असून शेतीच्या उत्पन्नाच्या मगदूरा बाहेर आहे तुह्मी नफानुकसानींत भागीदार राहण्याचा बहाणा करून आह्माला कपटानें फसविलें आहे. आणि आह्मी नेहमीं ह्मणत असतो तरी देखील तुह्मी आमच्या बरोबर शेती वाहण्याला येत नाहीं. आणि आतां आपलें अंग काढून घेतल्याची लटकीच गोष्ट नोटिशींत तुह्मी पुढें आणिली आहे.

फसली १३२३, १३२४ व १३२५ सालीं तीन्ही वर्षे आह्मी शेती वाहिली आणि यंदाचे ४ थे पीक उभें आहे. सालोसाल आमची नुकसानी तुमच्या कपटाच्या कौलपट्यामुळें झाली आहे. आणि आह्मी जमीन सोडण्याला तयार असतां ही तुह्मी कौलपट्याची धमकी दाखवून शेती आमच्या गळ्यांत तशीच बांधली आहे.

१३२३ सालीं पिकाचें उत्पन्न १२३२ रु. ८ आणे असून शेतीचा खर्च ७९४ रु. झाला आहे. ह्मणजे कौलपट्याची रक्कम [illegible]यास ११७६ रुपये ८ आणे आमच्या अंगावर पडले आहेत.

१३२४ सालीं पीकाचें उत्पन्न ९१९ रु. ६ आणे ९ पै असून शेतीचा खर्च ७४१ रुपये आला ह्मणजे १४३९ रु. आणे९ पै ३ नुकसानी लागली आहे

१३२५ फसली मध्यें शेतीचें उत्पन्न रुपये २१४० असून शेतीचा खर्च रुपये ७७८ - ८ आणे झाला. ह्मणजे याही वर्षी नुकसानी थोडी कमी ह्मणजे २५२रु. ८ आणे आहे. तेव्हां तिन्ही वर्षांत एकंदर नुकसानी ३६६९ रुपये झाली आहे.

आजपर्यंत तुह्माकडे आमच्या रकमा जमा झाल्या आहेत त्याचा तपशील असा.:—

| | रुपये | आणे | पै |
|---|---|---|---|
| | ११०० | ० | ० |
| | ५२० | ६ | ९ |
| | ५६७ | ० | ० |
| साऱ्याबद्दल | २४१ | १५ | ० |
| एकूण | २४२९ | ५ | ९ |

नोटिशींत तुह्मी ४६७ रुपये लिहिले आहेत. ते खरोखर ५६७ रुपये जमा पाहिजेत. या शिवाय तुह्मी आमची जवारी ३४ खंडी ३० रुपये खंडी या भावानें खंडून ठेविली आहे. व कडबा ९ हजार पेंडी ४ रुपये भावानें सवदा पक्का केल आहे. तुमच्या ह्मणण्यावरून जवारी व कडबा तुमचा अमानत माल ह्मणून आह्मापाशीं आहे. त्याची किंमत १३८० रुपये आमचे जमा धरावयाला पाहिजेत.

आह्मी कौलपट्याप्रमाणें पूर्ण रक्कम देवाल नाहीं. नुकसानाची हिशोब पाहतां देखील तुह्माकडे आमचीच रक्कम सुमारें ५०९ रुपये निवत आहे. ही रक्कम नोटिस पोचल्यापासून ८ दिवसाचे आंत आह्माला द्यावी. ह्मणजे फक्त कौलपट्याच्या रकमे संबंधानें कोर्टातून आह्माला दाद मागावी लागेल. या नोटिशीचा खर्च व इतर खर्च तुह्मावर पडेल. आणि सर्व नुकसानी तुह्माकडून भरून घेतली जाईल. कळावें. ता. १७ आक्टोबर १९१६ इ

सह्या
त्र्यंबकराव गुलाबराव देशमुख द. खुद्द
आनंदराव बापुराव देशमुख द. खुद्द
लालाजी गणपतराव देशमुख द. खुद्द
हिंमतराव गंगाराम द. लाला गणपतराव

नो० नं० ३८१


## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**— उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ।।।, १, १।, १॥, २, २॥ ते ५ रु. प. **बुद्धीबळ जोड लांकडी**— किंमत ।।। १, १॥, २ ते ४ रु. प **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ।।।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान वाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट.

**डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी**

नो. नं. ३४२



## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. कि. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार लवकरच दूर होतात कि रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. कि ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरुज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. कि. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई याजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 3 Dadar Bombay.



## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर .

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुळाबाचींफुलें, बिल्वदळी टीका, मुद अग्रफुलें साधीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें, न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रेल्वेनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

नो नं ६


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.